
# लोकराज्य

नोव्हेंबर २०१७/पाने ६०/किंमत ₹१०



होय हे माझं सरकार

मी लाभार्थी

केशरबाई तोलाजी दराडे, थाटे (वाडगाव)

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व
वस्त्रोद्योग विभाग, मुंबई

# किमान आधारभूत दराने खरेदी केंद्रे





**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री

## शेतकरी बांधवांना आवाहन

राज्यामध्ये केंद्र शासनाच्यावतीने किमान आधारभूत दराने एफएक्यू प्रतीचे मूग, उडीद व सोयाबीन आणि कापूस खरेदी पणन विभागामार्फत सुरु करण्यात आली आहे. ही खरेदी पणन महासंघ/कापूस उत्पादक पणन महासंघाकडून करण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी...

१. शेतकऱ्यांनी त्यांच्या जवळच्या खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणी करावी. सदर नोंदणी करण्यासाठी ७/१२ उतारा, आधार कार्ड व बँकेच्या पासबुकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स सोबत घेऊन जावे.
२. खरेदी केंद्रावर केंद्रशासनाने निश्चित केलेल्या स्पेसीफिकेशनप्रमाणे एफएक्यू प्रतीचा माल आणावा.
३. शेतकऱ्यांनी मालाची चाळणी करुनच खरेदी केंद्रावर माल आणावा.
४. तसेच माल पूर्णपणे वाळवून आणावा, ज्यामध्ये कमाल आर्द्रता (ओलावा) १२% पर्यंत असावी.
५. शेतमाल खरेदीचा दिनांक व वेळ एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना कळविण्यात येईल. जेणे करून त्यांना प्रतीक्षा करावी लागणार नाही.
६. शेतमालाच्या खरेदीनंतर शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात एका आठवड्याच्या आत रक्कम जमा केली जाईल.

मूग, उडीद व सोयाबीनच्या खरेदीसाठी खरेदी केंद्रे आठवडाभर संपूर्ण दिवस सुरु राहतील. या योजनेचा लाभ सर्व शेतकरी बांधवांनी घ्यावा. खरेदीसंदर्भात अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२३९५२२९४/९८ यावर संपर्क साधावा. तर कापूस खरेदी संदर्भात अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८३५८७८/०२२-२२८५६७६४ यावर संपर्क साधावा.



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री

**श्री. सुभाष देशमुख**
मा. मंत्री, पणन

**श्री. सदाभाऊ खोत**
मा. राज्यमंत्री, पणन

# अंतरंग



## होय हे माझं सरकार
## कथा परिवर्तनाची

### शिवार झाले पाणीदार.. ५

जलयुक्त शिवार अभियानामुळे बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यामध्ये टँकरग्रस्त खामखेड गावात पाणीसाठा वाढला आहे. गावातील शिवारात सात साखळी सिमेंट बंधाऱ्यांची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे दुष्काळाने होरपळणारे येथील शिवार जलयुक्त बनले आहे.

### हिरव्या चादरीचा डोंगर १२



नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील शिंदे या आदिवासीबहुल गावात ग्रामस्थांनी वृक्षारोपणाचा व्यापक कार्यक्रम राबवला. त्यामुळे उघडाबोडका वाटणारा केमचा आणि रोकोडाच्या डोंगरावर 'हिरवाई'ची चादर पांघरली जात आहे.

### केशरबाईस न्याय मिळतो तेव्हा..१५



अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील थाटे (वाडगाव) येथील केशरबाई तोलाजी दराडेबाईंना 'आपले सरकार' या वेबपोर्टलने मिळवून दिला न्याय.

### 'स्मार्ट' सुंदर, सुबक १६



सीसीटीव्ही, पाण्याच्या टाकीवरचे वायफाय संयंत्र, स्वच्छ आणि सुंदर परिसर, सोलर पथदीप यांनी दिंडोरी तालुक्यातील अवनखेड गाव स्मार्ट बनले आहे.

### पाहिजे तेव्हा सातबारा २६

नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयात बसवलेल्या एटीएस सातबारा व्हेंडिंग मशिनमुळे 'पाहिजे तेव्हा सातबारा', मिळणे शक्य झाले आहे.




| | |
|---|---|
| शिवार झाले पाणीदार.. | ५ |
| टँकरमुक्तीचा नवा अध्याय | ८ |
| पुनरुज्जीवन आणि संजीवनी | १० |
| हिरव्या चादरीचा डोंगर | १२ |
| आमचे सेतू केंद्र | १४ |
| केशरबाईस न्याय मिळतो तेव्हा... | १५ |
| स्मार्ट, सुंदर, सुबक | १६ |
| उज्ज्वलाने दिली चुलीपासून मुक्ती | १८ |
| पारदर्शी धान्य वितरण | १९ |
| स्वयंरोजगाराची 'मुद्रा' | २० |
| समृद्धीची ओळख नवी | २४ |
| पाहिजे तेव्हा सातबारा | २६ |
| स्वच्छतेचे सौंदर्य | २८ |
| कापूस ते कापड | २९ |
| वऱ्हाड दुधाचा 'गोडवा' | ३० |
| संधीचे आकाश खुले.... | ३२ |
| करा हॅलो, मिळवा मदत | ३३ |
| बळीराजाला मिळाला आत्मविश्वास | ३४ |
| तिसऱ्या डोळ्याने पुणे सुरक्षित | ३६ |
| टेलिमेडिसिनने जोखीम झाली कमी | ३९ |
| शाळा झाल्या डिजिटल | ४० |
| गाव उजळले... | ४२ |
| घाबरू नका, सुरक्षित राहा.. | ४५ |
| वेचक वेधक | ४६ |
| अभिनव अवजारे बँक | ४८ |
| माझी शाळा, माझा आनंद | ५० |
| हरित महाराष्ट्र देणार नद्यांना नवसंजीवनी | ५२ |
| बळीराजा आनंदला... | ५४ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |

वर्ष ६९ वे | अंक ५ | नोव्हेंबर २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

संपादकीय

# समाधान आणि आनंद

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारला ऑक्टोबर महिन्यात तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. गेल्या तीन वर्षात सरकारने जलयुक्त शिवार, मेक इन महाराष्ट्र, स्वच्छतेची सप्तपदी, आपले सरकार, माझी कन्या भाग्यश्री अशा अनेक योजना राबवल्या आहेत. या योजनांचा लाभ राज्यातील अनेक नागरिकांना झाला आहे.

योजनांच्या अंमलबजावणीतील आकडेवारीची वस्तुनिष्ठता ही नागरिकांना मिळालेला लाभ आणि त्यांच्या जीवनात घडून आलेले बदल यावरून अधिक सिद्ध होत असते. जलयुक्त शिवार योजनेद्वारे राज्यात अनेक गावांमध्ये जलक्रांती घडून आली. त्यामुळे गावातील विहिरींच्या पाणी पातळीत वाढ झाली. नदी, तलावातील पाण्यात वाढ झाली. गावातील शेतीला मुबलक पाणी मिळू लागले. पिण्याच्या पाण्याची टंचाई मिटली. यामुळे नागरिकांच्या हालअपेष्टांमध्ये घट झाली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले, असे अनेक योजनांच्या लाभार्थ्यांच्याबाबत सांगता येते.

एखाद्या गावात रस्ता होतो आणि मुख्य रस्त्याशी गाव जोडले जाते. तेव्हा शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ होतो. या लाभाचे सुख त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते.

बळीराजा चेतना अभियानासारखे अभियान शेतकऱ्यांसाठी वरदान ठरले. विविध कारणांमुळे शेतकऱ्यांमध्ये आलेले नैराश्य आणि नकारात्मकता घालवण्याचे महत्त्वाचे कार्य या अभियानातील विविध उपक्रमांनी केले. यवतमाळ जिल्ह्यात या अभियानाच्या यशस्वितेमुळे शेतकरी आत्महत्येच्या संख्येत ३० टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून येते.

एखाद्या अतिशय गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यास आयआयटी सारख्या शिक्षण संस्थेत प्रवेश मिळतो. पण आर्थिक परिस्थितीमुळे प्रवेश कसा घ्यायचा, ही समस्या उभी ठाकते, तेव्हा शासनाच्या अर्थसाहाय्याची योजना त्याच्या मदतीला येते व या विद्यार्थ्याचा आयआयटीचा प्रवेश सुकर होतो. शासकीय योजनेतून लोकांना हक्काचे घर मिळते. गाव हागणदारीमुक्त होते. गावात वीज येते. गाव स्मार्ट होते. पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वित होते. आरोग्याच्या सोयी सुलभतेने मिळू लागतात. तेव्हा नागरिकांचे जीवन अधिक समृद्ध आणि दर्जेदार होते. लोकराज्यच्या या अंकात अशाच आनंदी, समाधानी आणि समृद्ध झालेल्या नागरिकांच्या यशकथा आहेत. या यशकथा विविध योजनांची फलश्रुती कशी सकारात्मक असते ही बाब सिद्ध करणाऱ्या आहेत. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या गावातील या यशकथा म्हणजे परिवर्तन झाल्याचे दस्तऐवजच आहे.

हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची



## कथा : खांडवा गावाची

जलयुक्त शिवार अभियानामुळे बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यामध्ये टँकरग्रस्त खामखेड गावात पाणीसाठा वाढला आहे. त्यामुळे शेतकरी सिंचन करून पिके घेत आहेत. खामगाव तालुक्यातील तोरणा नदीवर बांधण्यात आलेल्या साखळी सिमेंट नालाबांधमुळे अटाळी, आंबेटाकळी, शिर्ला नेमाने व लाखनवाडा परिसरातील शेतकरी दुबार पीक घेत आहेत. मोताळा तालुक्यातील अवर्षण असलेल्या पट्ट्यामध्ये भूजल पातळीत वाढ झाली आहे. खांडवा गाव पाणीदार बनले आहे. गावातील शिवारात सात साखळी सिमेंट बंधाऱ्यांची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे दुष्काळाने होरपळणारे येथील शिवार जलयुक्त बनले आहे.

# शिवार झाले पाणीदार..

पाणी हे केवळ मानवाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारे संसाधन नसून ते विकासाचे साधन आहे. त्याचा योग्य वापर केल्यास विकास चांगल्या प्रकारे व वेगाने होऊ शकतो. शेतीमध्ये उत्पादन वाढीसाठी, विजेची निर्मिती, कारखानदारी यासाठी पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

दुष्काळ.. या शब्दामध्ये असलेल्या गर्भित अर्थाचे चटके राज्यातील जनतेने अनुभवले आहेत. हे चटके दूर करण्यासाठी.. राज्य शासनाने जलयुक्त शिवार नावाचे जलसंधारण व मृद संधारणामध्ये क्रांती घडवून आणणाऱ्या अभियानाची अंमलबजावणी केली आहे. या अभियानातून झालेल्या कामांमुळे पाणी अडवले गेले, जिरवले गेले आणि पिकांना पुरवलेही गेले. त्यामुळे शिवार झाले पाणीदार..आणि सिंचन होईल जोमदार.. अशी परिस्थिती आहे.

### उत्तम कामगिरी

बुलडाणा जिल्ह्यात या अभियानाने चांगलेच बाळसे धरले आहे. २०१५-१६ मध्ये जिल्ह्यातील ३३० गावे पहिल्या टप्प्यामध्ये समाविष्ट करण्यात आली. या गावांमध्ये जलसंधारणाची विविध प्रकारची ९ हजार १३२ कामे पूर्ण करण्यात आली. या वर्षामध्ये विविध कामांच्या माध्यमातून जिल्ह्यात ४५ हजार २७० टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. ३८ हजार १२१ हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली. २० हजार ६ हेक्टर क्षेत्रावर दोन वेळच्या संरक्षित सिंचन सुविधा निर्माण झाली.

२०१६-१७ मध्ये दुसऱ्या टप्प्यात २४५ गावांचा समावेश करण्यात आला. या टप्प्यातील प्रत्येक गावात शिवारफेरी काढण्यात येऊन, गावांच्या शिवारात कुठे-कुठे जलसंधारणाची कामे होऊ शकतात; याबाबत खात्री करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यातील २४५ गावांमध्ये ३ हजार २९६ कामे पूर्ण करण्यात आली. ८८ कामे प्रगतिपथावर आहेत. या टप्प्यात विविध जलसंधारण कामांच्या माध्यमातून १७ हजार १७२ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. ७ हजार २४१ हेक्टर क्षेत्रावर दोन वेळच्या आणि १२ हजार ६२५ हेक्टर क्षेत्रावर एक वेळचे संरक्षित सिंचन होणार आहे.

२०१७-१८ मध्ये तिसऱ्या टप्प्यात १९५ गावांची निवड करण्यात आली असून, या गावांचे आराखडे तयार करण्यात आले आहेत.

### जनतेला दिलासा

पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील सतत टँकरग्रस्त असणारी ८० गावे प्राधान्याने निवडण्यात आली. जलयुक्त शिवार अभियानामुळे, भूजल कमतरतेमुळे त्रासलेल्या जनतेला दिलासा मिळाला आहे. भूजल स्तर कमी झाल्यामुळे जिल्ह्यात या ८० गावांमध्ये पाणी टंचाईची समस्या 'आ' वासून उभी होती. सतत बाहेरून पाणी आणून या गावकऱ्यांची तहान भागवली जात असे. मात्र आता या गावांमधील जनतेला जलयुक्त शिवार अभियानामुळे साक्षात भगिरथ आल्याचा अनुभव येत आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून झालेल्या कामांमुळे भूजल पातळी निश्चित वाढली आहे.

नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसामुळे जलयुक्त शिवार अभियानातील साठवण बंधारा, तलाव, नाला खोलीकरण व

## जलयुक्त शिवार योजना : प्रयत्न संकल्पाचे...

- ११,४९४ गावे झाली दुष्काळमुक्त
- नाला खोलीकरण, सरळीकरण, गाळ काढणे इत्यादी एकूण कामे : ४,१९,३६४. हेच काम कि.मी.मध्ये मोजायचे तर : ५२९५ कि.मी. (यातील १८४२ कि.मीचे काम हे जनसहभागातून)
- अभियानासाठी आतापर्यंत खर्च २९३६ कोटी. यातील ४८८ कोटी रूपये जनसहभागातून
- परिणाम : १५.७४ लाख टीसीएम इतका पाणीसाठा तयार झाला आणि २१.११ लाख हेक्टर इतकी एकवेळ सिंचनक्षमता निर्माण झाली.
- लोकांचे हे अभियान लोकांच्या हाती सोपवण्यासाठी स्थानिक आमदारांच्या अध्यक्षतेत आढावा आणि समन्वय समिती
- या अभियानाचे अफाट यश पाहता आता गावांतील हे अभियान छोट्या शहरांमध्येही!

### गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार

- धरणांमधून गाळ काढून ती स्वच्छ करायची आणि जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी तो शेतात टाकायचा, यासाठी हे अभियान
- आतापर्यंत ९२ लाख क्युबिक मीटर गाळ धरणांमधून बाहेर काढण्यात आला आहे.

### मागेल त्याला शेततळे

- उद्दिष्ट : १,११,१११ शेततळे, राज्यात ५०,८७८ शेततळ्यांचे निर्माण, ६५७७ प्रगतिपथावर
- लाभार्थ्यांना २०६.२३ कोटी रुपये निधी वितरित
- ९६,००० टीसीएम पाणीसाठा निर्मित, संरक्षित सिंचन क्षमता ९६,००० हेक्टर
- राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट १० नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये पंतप्रधान पुरस्कारासाठी निवड
- ऑनलाइन अप्लिकेशन मॉडेलला स्कॉच अवॉर्ड प्लॅटिनम पुरस्कार

### सिंचन विहिरी

- पूर्व विदर्भात गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर जिल्ह्यात ११,०००

### विहिरींचा धडक कार्यक्रम

- ४३१८ विहिरी पूर्ण, ८७२२ कामे प्रगतिपथावर
- लाभार्थ्यांना १४१.०४ कोटी रुपये वितरित
- ४३१८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण

रुंदीकरण, ढाळीचे बांध, सिमेंट बंधारा आदींमध्ये चांगले पाणी साठले आहे.

## प्रभावी अंमलबजावणी

जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे पावसाने ओढ दिल्यानंतरही अनेक भागात जलसंधारणांच्या विविध कामांमध्ये साचलेले पाणी उपयोगात आणले जात आहे. या बिकट परिस्थितीत जलयुक्त शिवार अभियान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यामध्ये टँकरग्रस्त खामखेड गाव शिवारात, पाणीसाठा जलसंधारणाच्या विविध उपक्रमांमुळे वाढला आहे. परिणामी, शेतकरी सिंचन करून पिके घेत आहेत. खामगांव तालुक्यातील तोरणा नदीवर निर्माण करण्यात आलेल्या साखळी सिमेंट नाला बांधमुळे अटाळी, आंबेटाकळी, शिर्ला नेमाने व लाखनवाडा परीसरातील शेतकरी दुबार पीक घेत आहे. तसेच उपसा सिंचनाद्वारे पीक फुलवत आहेत. मोताळा तालुक्यातील अवर्षण असलेल्या पट्ट्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भूजल पातळीत वाढ झाली आहे. खांडवा गाव पाणीदार बनले आहे. गावातील शिवारात सात साखळी सिमेंट बंधाऱ्यांची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे दुष्काळाने होरपळणारे येथील शिवार जलयुक्त बनले आहे.

खारपाणपट्ट्यामधील जळगाव जामोद व संग्रामपूर तालुक्यांमध्ये भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या माध्यमातून रिचार्ज शाफ्टची कामे झाली आहेत. या पद्धतीमुळे भूजल पातळीत कमालीची वाढ नोंदवण्यात आली आहे. खारपाणपट्ट्यातील या कामांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यात येत आहे. परिणामी, जमिनीतील क्षारही कमी होण्यास मदत मिळत आहे. अशा प्रकारे जलयुक्त शिवार अभियानामुळे जिल्ह्यात जलसमृद्धी येत असल्याचा विश्वास निर्माण झाला आहे.



होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

सध्या जिल्ह्याला पाणीटंचाईचे संकट भेडसावत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने टँकरमुक्तीचे ध्येय समोर ठेवून विविध योजनांतर्गत मृदा व जलसंधारणाची कामे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सर्वच विभागांचा सहभाग प्राप्त करून घेतला आहे. जिल्हा प्रशासनाने मुख्यमंत्री साहाय्यता निधींतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून साखळी सिमेंट नालाबांधची कामे केली आहेत. कोल्हापुरी बंधारे दुरुस्ती व गेट बसवण्याची कामेही करण्यात आली.

## आर्थिक समृद्धी

जलयुक्त शिवार अभियानामध्ये दोन टप्प्यात १२०५ साखळी सिमेंट बंधाऱ्यांची निर्मिती करण्यात आली. ९३८ सिमेंट नालाबांध पूर्ण करण्यात आलेले आहेत. साखळी सिमेंट बांध व पूर्ण झालेल्या सिमेंट नालाबांधामुळे भूजल पातळीमध्ये कमालीची वाढ झाली आहे. यामुळे शेतीसाठी शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण होऊन शेतकऱ्यांना दुबार पीक काढता येणे शक्य झाले आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या आयुष्यात आर्थिक समृद्धी आल्याने शेतकरी संपन्न होत आहेत.

या अभियानाच्या प्रथम, द्वितीय टप्प्यात जिल्ह्यातील ५७५ गावांमध्ये विविध विभागांच्या समन्वयाने १२ हजारांवर कामे पूर्ण करण्यात आली. या कामांमुळे हजारो हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन उपलब्ध झाल्याने पीक उत्पादनात वाढ झाली आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजनेमुळे शेतकरी समाधानी आहे.

**– निलेश तायडे,**
माहिती सहायक, बुलडाणा



# टँकरमुक्तीचा नवा अध्याय

## कथा : बिदाल गावाची

**माण, खटाव, फलटण व कोरेगावचा काही भाग दुष्काळी पट्ट्यात मोडतो. बिदाल गाव दुष्काळाचे केंद्र बिंदू आहे. या गावाच्या परिसरात गेल्या दोन वर्षांपासून टँकर सुरू होता. शासनाने या गावाचा जलयुक्त शिवार योजनेमध्ये समावेश करून जलसंधारणाची कामे केली. पाणी फाऊंडशेनच्या माध्यमातून या गावात जलसंधारणाची चांगली कामे झाली. यामुळे अल्प पाऊस होऊनही हे गाव पाणीदार झाले. कोरड्या विहिरी, विंधन विहिरींची पाणी पातळी वाढल्याने हे गाव टँकरमुक्त झाले.**

सातारा जिल्ह्याच्या पूर्व बाजूला असणाऱ्या माण तालुक्याच्या मुख्यालयापासून ४ कि.मी. अंतरावर बिदाल हे गाव आहे. वॉटरकप स्पर्धेत क्र.२ मध्ये राज्यात तिसरा क्रमांक पटकविणाऱ्या या गावाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्रमदानाला सुरुवात केली. या गावातील लोकांनी पाहुणे, नोकरीसाठी बाहेर असणाऱ्या लोकांना निमंत्रित करून गावातील ४ हजार ५६१ व बाहेरील १ हजार २९९ अशा एकूण ५ हजार ८६० लोकांनी श्रमदान करून एकाच दिवशी २१० लुज बोल्ड बांधून एक विक्रम केला होता.

### चराईबंदी

हिवरे बाजार आणि राळेगण सिद्धीत जशी वृक्षतोडीस बंदी व चराई बंदी करून, प्रत्येक पाण्याचा थेंब कसा जिरवता येईल हे पाहिले जाते, तेच चित्र बिदालमध्येही पाहायला मिळाले. खोकड मळ्यासह जे तीन मोठे पाणलोट क्षेत्र आहेत तिथे मोठ्या प्रमाणात पाणी झिरपले. या पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत कसल्याच प्रकारचे गवत येत नव्हते. मात्र गावाने चराई बंदी केल्यामुळे इथे मोठ्या प्रमाणात गवत दिसते आहे.

गवत आणि गवताच्या मुळ्या ह्या मृद्संधारणाचे अतिशय चांगले काम करतात. त्यामुळे या डोंगर कड्यावरील प्रत्येक थेंब जमिनीत कसा जाईल याचा कटाक्षाने प्रयत्न केला आहे.

### प्रशासनाचा सहभाग

जिल्हा प्रशासनाने बिदाल गावात ग्रामसभा घेऊन जलसंधारणाचे महत्त्व विशद करण्यात आले. या आवाहनाला गावकऱ्यांनी साद दिल्याने मोठी संघटित शक्ती उभी राहिली. या गावासाठी शासनाच्या विविध योजनेतून मोठे अनुदान देण्यात आले. जसे नॅडेपसाठी २१ लाख ५२ हजार ५०० रुपये शोषखड्ड्यांसाठी २८ लाख १० हजार, विहीर पुनर्भरणासाठी ६ लाख ८४ हजार, शेततळ्यासाठी ९ लाख ५० हजार अशा योजनांसाठी व इतर योजनांच्या माध्यमातून ७० लाख रुपयांचे अनुदान या गावासाठी देण्यात आले.

बिदाल गावात ८ एप्रिल ते २२ मे २०१७ या कालावधीत ३० हजार ९६ पुरुषांनी तर ३६ हजार २९३ महिलांनी श्रमदान केले. यंत्राद्वारे सलग समतल चर २८,४८१.१४ घ.मी., कपार्टमेंट बंडिंग ३०,१७९,७७. घ.मी., कंटुर बंडिंग २१,११५,३५ घ.मी.माती नाला बांध ६२,८१८, ओढा रुंदीकरण व खोलीकरण ७,०४७.९९ घ.मी., नदी खोलीकरण व रुंदीकरण १,८८,२२ घ.मी. व सिमेंट बंधारा १,४०० घ.मी. असे एकूण ४,८२,७२०.५७ घ.मी. काम पूर्ण करण्यात आले.

माणगंगा नदीच्या तीरावर वसलेल्या बिदाल गावाची लोकसंख्या ५ हजार ९७४ इतकी आहे. सत्यमेव वॉटर कपमध्ये गावाने राज्यात चमकदार काम केले. गावाच्या एकजुटीचा अभूपूर्व आविष्कार जल चळवळीत परिवर्तित झाला. या बिदाल गावातील लोकांनी श्रमदानातून मातीनाला बांध १०, कंपार्टमेंट बंडिंग २२० हेक्टर, सीसीटी १५ हेक्टर, खोल सीसीटी १३० हेक्टर, शेततळे २२, लुज बोल्डर २०३, खोली करण व रुंदीकरण १५०० मीटर, लहान मातीचे बांध १७, गॅबीयन बंधारा १ आणि सिमेंट नालाबांध १ ही कामे केली. यामुळे ४०१ टीसीएम पाणीसाठा झालेला आहे. यामुळे विहिरींची तसेच विंधन विहिरींची पाणी पातळी एक ते दीड मीटरपर्यंत वाढली आहे.

### संस्थांची मदत

कराड अर्बन बँक, ज्ञानदीप सोसायटी, सिद्धनाथ पतसंस्था, चैतन्य पतसंस्था, प्रिदर्शनी पतसंस्था दहिवडी पत संस्था यांच्यासह इतर संस्था तसेच मान्यवरांनी गावच्या जलसंधारण

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

कामासाठी निधी दिला.

### श्रमदानासाठी पुढाकार

दुष्काळ हा निसर्गाबरोबरच मानवनिर्मित असतो. निसर्गाकडून मिळालेल्या गोष्टींची परतफेड आपण निसर्गाला केली तर तो आपल्याला समृद्ध करतो, दुष्काळमुक्त करतो. मात्र निसर्गाला आपण ओरबाडले तर तो आपल्याला दुष्काळ देतो. त्यामुळे जलसंधारणाच्या विविध उपचार पद्धतीने दुष्काळमुक्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. गावाच्या शिवारात पडणारा पावसाचा प्रत्येक थेंब अडवला पाहिजे, तो जमिनीत जिरवला पाहिजे. गावात एकजुटीने जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात घेणे आवश्यक आहे. जलसंधारणाच्या विविध कामांमुळे हे गाव आता पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले असून टँकरमुक्तही झाले आहे. सुट्टीच्या दिवशी गावातील शासकीय कर्मचारी, डॉक्टर, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच विविध सामाजिक संस्था गावात येऊन श्रमदान करतात.



### अनोखे नियोजन

बिदाल गावातील महत्त्वाच्या ठिकाणी भोंगे बसवले आहेत. पहिला भोंगा ५.३० वाजता होतो. त्यानंतर गावातील लोक उठून घरगुती कामे करतात. दुसरा भोंगा ६.३० वाजता होतो. कामाच्या ठिकाणी जाण्याची तयारी करतात. तिसरा भोंगा ६.४५ वाजता या भोंग्याला लोक एकत्र जमतात व ७ चा चौथा भोंगा झाला की लोक श्रमदानाला लागतात. या काळात गावातील दुकाने सकाळी ६ ते ९ या कालावधीत बंद ठेवली जातात.

गाव म्हटले की, राजकारण आले, गट तट आल्यावर संघर्ष ठरलेलाच असतो. या साऱ्या गोष्टींना फाटा देत यावर्षी ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध झाली. गावची ग्रामपंचायत ही आय.एस.ओ. या नामांकनाने सन्मानित असून संपूर्ण महाराष्ट्रातील ४ थी व सातारा जिल्ह्यातील पहिली आय.एस.ओ. ग्रामपंचायत आहे. ग्रामपंचायतीची स्थापना १९५१ मध्ये झाली आहे. गेली ५० वर्षे ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध होत आहे. बिदाल हे देशातील पहिले महिला विमा ग्राम आहे. या गावाला ग्राम स्वच्छतेचा पुरस्कारही मिळाला आहे.

'बिदालमध्ये पाऊस पडत होता पण पाणी नदी, ओढ्या, नाल्याद्वारे वाहून जात होते. गावामध्ये जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात घेऊन पावसाचा प्रत्येक थेंब जिरवण्यात आला. त्याचे दृष्य परिणाम आज दिसू लागले असून, गाव पाण्याबाबतीत स्वयंपूर्ण झाले आहे.'

**– अशोक इंगवले, शेतकरी**



'जलसंधारणाच्या कामांमुळे गावात कमी पाऊस होऊनही आज आमच्या विहिरींची पाणी पातळी चांगली वाढलेली आहे. भविष्य काळात आम्हाला पाण्याची अडचण भासणार नाही.'

**– विलास पिसाळ, शेतकरी**

माण तालुक्यातील अवर्षणग्रस्त भागातील बिदाल गावच्या घशाची कोरड टँकरशिवाय संपत नव्हती. मात्र आता हे गाव पाण्याने आज स्वंयपूर्ण झाले आहे. गाव टँकरमुक्त झाले आहे. राज्यातील इतर गावांसाठी बिदाल गावाने वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

**– युवराज पाटील,**
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

## कथा : मामा तलावांची

**मागास, दुर्गम, आदिवासीबहुल आणि नक्षलदृष्ट्या संवेदनशील असलेल्या गोंदिया जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक वाढीसाठी, माजी मालगुजारी (मामा) तलावांचे पुनरुज्जीवन महत्त्वाचे ठरत आहे. या तलावांच्या माध्यमातून शेतीला संरक्षित सिंचनाची व्यवस्था निर्माण झाली आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. या तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या विशेष कार्यक्रमामुळे मूळ सिंचन क्षमतेची पुनर्स्थापित करण्यात येत आहे. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना सिंचनासाठी या तलावातील पाण्याचा उपयोग होण्यास सुरुवात झाली आहे. तलावांवर अवलंबून असलेल्या मत्स्य सहकारी संस्थांनादेखील त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या कार्यक्रमाची मदत होत आहे.**

# पुनरुज्जीवन आणि संजीवनी

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हे तलावांचे जिल्हे म्हणून ओळखले जातात. त्यातही गोंदिया जिल्ह्याची ओळख राज्यात तलावांचा जिल्हा म्हणून आहे. ३५० वर्षापूर्वी सोळाव्या शतकात तत्कालीन गोंडराजा हिरशहा यांनी भविष्यातील पाण्याची आवश्यकता लक्षात घेता फर्मान काढले की, जो कोणी जंगले साफ करून शेती करेल त्याला ती बहाल केली जाईल व जो कोणी तलाव बांधेल त्याला त्या तलावाखाली जितकी जमीन असेल ती खुद कास्तकार म्हणून बक्षीस दिली जाईल. या संधीचा उपयोग करून घेत जिल्ह्यातील त्या काळच्या कोहळी व पोवार समाजातील मालगुजारांनी लोकसहभागातून तत्कालीन शाश्वत सिंचन व्यवस्थापनाची एक परंपरागत पद्धत आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तलावांची निर्मिती केली. ब्रिटिश काळात या तलावांची मालकी मालगुजारांकडे होती. १९५० मध्ये शासनाने हे तलाव मालगुजारांकडून ताब्यात घेतले. तेव्हापासून हे तलाव माजी मालगुजारी तलाव म्हणून ओळखले जातात.

### पाण्याची उपलब्धता

जिल्ह्यात मुख्यत: धानाचे पीक मोठ्या प्रमाणात घेण्यात येते. या पिकाला पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या धान शेतीला अनियमित पडणाऱ्या पावसाचा फटका बसून धानाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेल्या माजी मालगुजारी तलावातून सिंचनाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने, माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करून त्यांना संजीवनी देण्याचा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे मूळ सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याचे काम काही वर्षात टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहे. गोंदिया जिल्ह्यातील ४१८ मामा तलावांच्या पुनरुज्जीवन कार्यक्रमात पहिल्या टप्प्यात २०१६-१७ या वर्षात सुरुवात करण्यात आली. यापैकी ३९७ तलावांच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यापैकी ३४७ कामे सुरू होऊन १५५ तलावांच्या पुनरुज्जीवनाची कामे पूर्ण झाली. यामधून ६ लाख ६९ हजार ५८७.६७ घनमीटर गाळ या तलावातून काढण्यात आल्यामुळे तेवढीच पाणीसाठा क्षमता निर्माण झाली आहे. जिल्ह्यात १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे १७४८ मामा तलाव असून याची सिंचन क्षमता ३५,४५८ हेक्टर इतकी आहे. १०० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमतेचे ३८ मामा तलाव असून याची सिंचन क्षमता ६५१० हेक्टर इतकी आहे. मात्र, या तलावातून प्रत्यक्षात अनुक्रमे १६,८२९ हेक्टर व ५८९० हेक्टर सिंचन होते.



गोंदिया जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलाव



माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवनाचे काम

कथा परिवर्तनाची

### तलावांचे पुनरुज्जीवन

या तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या विशेष कार्यक्रमामुळे या तलावांची मूळ सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्यात येत आहे. त्यामुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना सिंचनासाठी या तलावातील पाण्याचा उपयोग होण्यास सुरुवात झाली आहे. तलावांवर अवलंबून असलेल्या मत्स्य सहकारी संस्थांनादेखील त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या कार्यक्रमाची मदत होत आहे.

### सर्वंकष दुरुस्ती

तलावांच्या सर्वंकष दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहे. यामध्ये मामा तलावांच्या जलविमोचकाची दुरुस्ती, आवश्यक त्या ठिकाणी नवीन जलविमोचकाचे बांधकाम करण्यात येत आहे. सांडवा दुरुस्ती व आवश्यक त्या ठिकाणी नवीन सांडव्यांचे बांधकाम करण्यात येत आहे. ज्या तलावाच्या कालव्याद्वारे सिंचन होते, त्या कालव्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. तलावाच्या पाणलोट क्षेत्राची तपासणी करून आवश्यक असल्यास तलावात पाणी येणारे मार्ग मोकळे करण्यात येत आहे. तलावांचे खोलीकरण करून गाळ काढण्यात येत असून, तलावात मत्स्यतळ्यांचे बांधकाम करण्यात येत आहे.

### पिकांना फायदा

५० हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमतेच्या तलावातील पाण्याचा उपयोग या पुनरुज्जीवनाच्या विशेष कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांनी करायला सुरुवातदेखील केली आहे. केवळ एका पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादनात येणारी घट, उपलब्ध पाण्यामुळे भरून निघण्यास मदत झाली आहे. शेतकऱ्यांनी रबी हंगामात धान पिकाव्यतिरिक्त भाजीपाला, हरबरा, गहू ही पिके घेण्यास सुरुवात केली आहे.

तलावातील पाण्याचा उपयोग करणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यात येत आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास सडक/अर्जुनी तालुक्यातील चिचटोला येथील निस्तारधारक शेतकरी समूह तलावाचे सुरक्षित व्यवस्थापन करीत आहेत. पाणी वापर संस्थेच्या नियंत्रणाखाली शेतकऱ्यांना पाणी वाटप करण्यात येते. तलावाची बरीचशी कामे शेतकरी श्रमदान व लोकवर्गणीतून करीत आहेत. लोकवर्गणीतून जमा झालेल्या रकमेतून संस्थेनी २ जलविमोचकाची दुरुस्ती, पाळीची, सांडव्याची, कालव्याची दुरुस्ती केली आहे. याव्यतिरिक्त शेतातील झिरपणारे पाणी इतरत्र व्यर्थ जाऊ नये म्हणून ६ मीटर व्यासाचे व ७ मीटर खोल विहिरीचे अतिरिक्त साठवणकरिता पक्के बांधकामसुद्धा केले आहे. या विहिरीवर पंप लावून या पाण्याचा उपयोग ३० ते ४० हेक्टर अतिरिक्त सिंचनासाठी तसेच शाळेतील परसबागेसाठी करण्यात येत आहे.

**– विवेक खडसे,**
जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया



## सिंचन विहिरी

- **राज्यात एकूण ३६ हजारावर विहिरींचे निर्माण, ७९,६०२ विहिरींचे काम प्रगतिपथावर**
- **पूर्व विदर्भात गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर जिल्ह्यात ११,००० विहिरींचा धडक कार्यक्रम (४३१८ विहिरी पूर्ण, ८७२२ कामे प्रगतिपथावर)**
- **लाभार्थ्यांना १४१.०४ कोटी रुपये वितरित**
- **४३१८ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण**
- **मामा तलावांच्या पुनरुज्जीवनाचे अभियान मोठ्याप्रमाणात हाती**
- **माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी आता २१ हजार रुपये प्रतिहेक्टरवरून ४० हजार रुपये (जलसंपदा विभाग), २८ हजार रुपये प्रतिहेक्टरवरून ४८ हजार रुपये (जलसंधारण विभाग)**







कथा : शिंदे गावाची

**नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील शिंदे या आदिवासीबहुल गावात ग्रामस्थ वृक्षारोपणाचा व्यापक कार्यक्रम राबवत आहेत. त्यामुळे उघडाबोडका वाटणारा केमचा आणि रोकोडाच्या डोंगरावर 'हिरवाई'ची चादर पांघरली जात आहे. केम शिखराच्या परिसरातील हा भाग आपले रूपडे बदलत वनपर्यटनासाठी सज्ज होतोय.**

# हिरव्या चादरीचा डोंगर

वन विभागाची नोकरी सोडलेल्या मोतीराम गावीत यांनी गावात आलेल्या साधूंचा उपदेश प्रमाण मानून डोंगरावर झाडे लावण्यास सुरुवात केली. वयाची पंचाहत्तरी पार केलेल्या गावीत यांनी सरपंच असताना केमचा डोंगरावर वृक्षारोपण करण्याचा ठराव केला. याच डोंगरावरून गिरणा, कादवा, उनंद या पूर्ववाहिनी आणि नार-पार, आमटी, वाझडी या पश्चिमवाहिनी नद्यांचा उगम झाला आहे. बाविसशे लोकसंख्या असलेल्या या गावाने डोंगरावर १० हजार झाडे लावली.

## सुंदर परिसर

आपला परिसर सुंदर आणि पर्यटनासाठी आदर्श करायचा ध्यास ग्रामस्थांनी घेऊन वृक्षसंवर्धनाचे कार्य सुरू केले. शासनाच्या वृक्षलागवड कार्यक्रमाने ग्रामस्थांच्या या उपक्रमाला आणखी गती मिळाली. गतवर्षी गावाने तब्बल २५ हजार झाडे लावली. रोजगार हमी योजनेतून खड्डे खोदण्याचे काम

करण्यात आले. गावातील नागरिकांना यामुळे रोजगार मिळाला.

एका बाजूला समुद्र सपाटीपासून १९०० फूट असलेल्या केम शिखराचे सौंदर्य आणि दुसऱ्या बाजूस चमचा आणि रोकोडा डोंगरामुळे तयार झालेली 'यू' आकाराची रचना आणि मधोमध दरीतील अप्रतिम दृश्य असा हा भाग असल्याने पर्यटन विकासाला येथे संधी आहे. गावीत आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे प्रयत्नही त्याच दिशेने आहेत.

### रोपे जगली

डोंगरावर लावलेल्या रोपांपैकी ९० टक्के रोपे जगली आहेत. काही रोपे तीन ते दहा फुटापर्यंत वाढली असल्याने परिसराच्या सौंदर्यात भर पडली आहे. केमचा डोंगराच्या १७० हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपण झाल्यानंतर आता रोकोडाच्या ७० हेक्टर क्षेत्रात वृक्षारोपण सुरू आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीने ४५ हजार रुपये खर्च करून गुजरातमधून आंबा, जांभूळ, आवळा, पेरू, गुलमोहोर, मोगरा, काजू, सिसव, काशिद, आदी १६ प्रकारची रोपे आणली आहेत.

झाडे जगवण्यासाठी डोंगरावर पाईपलाइन नेण्यात आली असून या वर्षी तळे तयार करून ठिबक सिंचनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. डोंगरावर सुविधेसाठी पेसाअंतर्गत रस्ते तयार करण्यात आले आहेत. वृक्षारोपणासाठी पेसामधून २ लाख ७८ हजार खर्च करण्यात आला आहे. या वर्षी डोंगरावरच नर्सरी तयार करण्यात येणार आहे.

### वनौषधी

डोंगरावर अर्जुन साताडा, निरगुडी आदी वनौषधींची रोपेदेखील लावण्यात आली आहेत. पडिक जमिनीचा योग्य वापर करण्याबरोबर पर्यावरण रक्षण, पर्यटन आणि रोजगार निर्मितीचा दूरगामी विचार करून, या आदिवासी गावाने केम शिखराचा परिसर नयनरम्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या वर्षी गाव हागणदारीमुक्त करण्याचा संकल्पदेखील गावाने केला आहे. एक लघुपाटबंधारे प्रकल्प आणि २३ पाझर तलावाच्या ठिकाणी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' उपक्रम राबवण्यात आला आहे. ग्रामस्थांचे प्रयत्न आणि या भागात होणारी स्ट्रॉबेरीची शेती लक्षात घेता काही वर्षात हा भाग पर्यटकांना निश्चितपणे आकर्षित करेल.

डोंगरावर ५० हजारावर झाडे लावण्यात आली आहेत. प्रत्येक झाडाची नोंद सातबारावर घेण्यात येत आहे. विशेषत: फळझाडे लावून स्थानिकांना भविष्यात रोजगार मिळावा आणि पर्यटकही आकर्षित करण्याचा प्रयत्न आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने झाडे लावल्यास पर्यावरणाचे रक्षण होऊन गावालाही लाभ होईल, असे मोतीराम गावीत यांनी सांगितले.



**– डॉ. किरण मोघे,**
जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक

## तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवड

**राज्यात १ जुलै ते ७ जुलै २०१७ या सात दिवसांच्या वनमहोत्सवाच्या कालावधीत वन विभागाने ४ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला होता. प्रत्यक्षात विभागाने इतर शासकीय विभागांबरोबर लोकसहभागातून तब्बल ५ कोटी ४३ लाख ३५ हजार ४९ वृक्षांची लागवड केली.**

**राज्यात तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. २०१७ मध्ये ४ कोटी, २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात आले आहे.**

**२०१८ च्या पावसाळ्यात राज्यात वन विभागाचा १३ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प आहे. यात वन विभाग ७.५ कोटी, इतर विभाग २.५० कोटी आणि ग्रामपंचायतींना ३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. वृक्षलागवडीसाठी स्थळ निश्चितीचा डेटा बेस तयार करणे, वृक्षारोपणाचा सूक्ष्म कार्यक्रम निश्चित करणे, रोपवाटिकांमधून दर्जेदार रोपांची निर्मिती करणे यासारखे काम आतापासूनच सुरू करण्यात आले आहे.**

**वृक्षलागवडीसाठी रेल्वे, संरक्षण मंत्रालय, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय यांच्याशी वन विभागाने सामंजस्य करार केला असून, राज्यातील रेल्वे मंत्रालयाच्या मोकळ्या जागा, राष्ट्रीय महामार्ग तसेच रेल्वे ट्रॅकच्या दुतर्फा वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात येत आहे.**



# आमचे सेतू केंद्र

## कथा :
## महिला सेतू केंद्राची

बचत गटाच्या महिला केवळ पापड, लोणचे यासारखे पारंपरिक व्यवसाय करण्यातून बाहेर पडत असून, त्या तांत्रिक समजल्या जाणाऱ्या कामाकडेसुद्धा वळल्या आहेत. कारंजा तहसील कार्यालयातील सेतू केंद्र मागील दोन महिन्यांपासून महिला चालवत आहेत. यामुळे कामात पारदर्शीपणासोबतच नागरिकांना वाजवी दरात चांगली सेवा मिळत आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सहयोगिनी सुनीता चोपडे यांनी सेतू केंद्राच्या माध्यमातून रोजगार निर्मिती केली आहे. ५ जुलैपासून हे केंद्र कार्यान्वित झाले असून त्यांनी कांता मेश्राम आणि दुर्गा डोंगरे या दोन महिलांना संगणक परिचालक म्हणून कामही दिले आहे. स्वतः सुनीता चोपडे या पदवीधर असून त्यांनी एम. एस. सी.आय. टी.आणि टॅली हे संगणक प्रशिक्षण घेतले आहे. इतर दोन ऑपरेटर महिला सुशिक्षित असून बचत गटांशी जोडलेल्या आहेत. यातील दुर्गा डोंगरे या माती परीक्षण प्रयोगशाळा चालवतात. या कामामुळे नागरिकांशी संवाद साधण्याचे तंत्र विकसित होत आहे. तसेच रोज नवीन गोष्टी त्यांना शिकायला मिळतात. पहिल्या महिन्यात नवीन असल्यामुळे थोडा त्रास झाला. पण आता सुरळीतपणे नागरिकांना सेवा दिली जाते. यामुळे माझ्यासोबतच आणखी दोन महिलांना रोजगार देता आला याचा आनंद आहे. या सेतू केंद्रामुळे महिलांना ४ ते ५ हजार रुपये प्रतिमहिना मिळत आहे. अशी प्रतिक्रिया सुनीता चोपडे यांनी दिली.

यापूर्वीचे केंद्रचालक सेवांसाठी जास्त दर आकारात असल्याचे एका नागरिकाने सांगितले. मात्र महिलांकडे सेतू केंद्र चालवायला दिल्यापासून शासनाने आकारलेलेच शुल्क घेतले जाते. त्यामुळे कामात पारदर्शकता आली आहे. महिला प्रामाणिकपणे चांगली सेवा देत असल्याचे येथे आलेल्या एका नागरिकाने सांगितले.

'या कामामुळे नागरिकांशी आमचा थेट संबंध येत असून, गावातून येणाऱ्या कोणत्याही नागरिकाला उशीर झाला म्हणून परत पाठवले जात नाही. सकाळी १० ते सायंकाळी ७ पर्यंत सेवा देतो. या कामाचा एक वेगळा अनुभव आहे,' असे दुर्गा डोंगरे या संगणक परिचालकेने सांगितले.

**– मनीषा सावळे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा

## आपले सरकार सेवा केंद्र

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायती राज संस्थांचा सर्व कारभार ई-पंचायत प्रकल्पांतर्गत संगणकीकृत केला जात आहे. त्यामध्ये एकसूत्रता व पारदर्शता आणणे व नागरिकांना विविध प्रकारचे दाखले व सेवा एकाच केंद्रावर त्यांच्या राहत्या क्षेत्रातच उपलब्ध करून देण्यात येत आहे. संग्राम प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करून 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यात एकूण २० हजार २९९ आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्रांमार्फत २५ हजार ५२५ ग्रामपंचायतींचे २०१६-१७ चे लेखे संगणकीकृत करण्यात आले आहेत. ग्रामपंचायत दप्तराचे नमुना १ ते ३३ संगणकीकृत करण्यात आल्याने, नागरिकांना आवश्यक असलेले १९ संगणकीकृत दाखले/प्रमाणपत्र तत्काळ देण्यात येतात.

लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत १३ संगणकीकृत दाखले/प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. याशिवाय नागरिकांच्या उपयोगी रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, पॅन कार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पासपोर्ट, वीज बिल भरणे, पोस्ट विभागाच्या सेवा यासारख्या ऑनलाइन सेवा गावातच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला असून, याअंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज भरावयाची सुविधा या केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेमुळे खेड्यापाड्यांतील लाखो नागरिकांचा वेळ व पैसा वाचत आहे. अनेक ऑनलाइन सेवा गावातच उपलब्ध झाल्याने व्यापक जनहितासह पंचायत राजसंस्थांचे बळकटीकरण होत आहे.

कथा परिवर्तनाची

# केशरबाईस न्याय मिळतो तेव्हा...

## कथा : थाटे (वाडगाव)च्या केशरबाईंची

'उशिरा का व्हईना न्याय मिळाला...माला यातच आनंद हाये' अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त करतांना ७९ वर्षीय केशरबाईच्या एका डोळ्यात हासू, दुसऱ्या डोळ्यात आसू आणि चेहऱ्यावर समाधान दिसत होते. एक प्रदीर्घ लढाई जिंकल्याचा आनंद त्या व्यक्त करत होत्या.

सर्वसामान्य नागरिकांचा दैनंदिन जीवनात प्रशासनाशी संबंध येतो. या नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा अधिक गतिमान आणि सुलभ होण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. अशी जोड या सेवांना देण्यात आल्यामुळे जलद आणि पारदर्शक सेवा देण्यात यश मिळत आहे.

लोकाभिमुख आणि जबाबदार प्रशासन हा शासनाचा जिव्हाळ्याचा आणि प्राधान्याचा विषय राहिला आहे. त्यामुळेच सेवा हमी कायद्याच्या अंमलबजावणीसह इतर अनेक महत्त्वाच्या सेवा ऑनलाइन देण्यास प्रारंभ झाला आहे. या ऑनलाइन सेवेमुळे गतिमानता आणि सर्वसामान्यांना दिलासा मिळत आहे. याचे एक प्रातिनिधीक उदाहरण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील ७९ वर्षीय वृद्धेस मिळालेला न्याय.

केशरबाईंचे पती तोलाजी तात्याबा दराडे यांची मौजे वाडगाव शिवारातील गट नं ३३१/१४ क्षेत्र १.९९ हे. आर ही जमीन १९७७ साली झालेल्या पाझरतलावात गेली. त्यावेळी दराडे कुटुंबीय उपजीविकेसाठी स्थलांतरित झाले होते, त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेविषयी त्यांना कोणतीही माहिती नव्हती. मूळ गावी परतल्यानंतर तलावाविषयी त्यांना माहिती मिळाली. पण तोपर्यंत भूसंपादन आणि निवाड्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती. त्यानंतर १९८४ ते १९९५ या कालावधीत पत्रव्यवहार व चौकशी करून पाठपुरावा केला. तत्कालीन जिल्हा परिषद सदस्या कमल विनायक खेडकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २००६ साली उपोषण केले. त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी व पंचनामा करण्यात आला. त्यामध्ये जमीन गट नं ३३१/१४ क्षेत्र १.९९ हे. आर प्रत्यक्ष तलावात गेलेले आढळून आले व त्यांनी नवीन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. २००७ मध्ये हा प्रस्ताव विशेष



केशरबाई तोलाजी दराडे

**अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील थाटे (वाडगाव) येथील केशरबाई तोलाजी दराडे यांनी पाझरतलावात गेलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा म्हणून 'आपले सरकार' या वेबपोर्टलवर तक्रार केली. मुख्यमंत्री कार्यालयाने त्याची तत्काळ दखल घेत मंत्रालय ऑनलाइन लोकशाही दिनात त्यांच्या तक्रारीचा समावेश केला. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे होणाऱ्या या लोकशाही दिनामध्ये मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आदेशामुळे तत्काळ कार्यवाही झाली. यानंतर या महिलेस जमिनीचा मोबदला म्हणून ३३ लाख ७६ हजार ६९९ रुपये देण्यात आले.**

भूसंपादन अधिकारी कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवल्याचे जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी कळवण्यात आले. पण त्यानंतर नेमकी काय कार्यवाही झाली याची माहिती मिळाली नाही.

दरम्यान, तोलाजी तात्याबा दराडे यांचे २००७ मध्ये आजारपणामुळे निधन झाले. २०१५ मध्ये मोठा मुलगाही (बाबासाहेब) मयत झाला. केशरबाईंकडे मोलमजुरीशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिला नाही. कमल विनायक खेडकर, विकास खेडकर यांच्या मदतीने त्यांनी विविध स्तरावर पाठपुरावा केला. याच दरम्यान, विकासला 'आपले सरकार' या पोर्टलबद्दल माहिती मिळाली. एक आशेचा किरण दिसला. त्यांनी मे २०१६ मध्ये ऑनलाइन तक्रार दाखल केली. मुख्यमंत्री कार्यालयाने तत्काळ या प्रकरणाची दखल घेत त्यांच्या तक्रारीचा समावेश मंत्रालय लोकशाही दिनामध्ये केला. लोकशाही दिनामध्ये मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकारी अहमदनगर आणि विभागीय आयुक्त नाशिक यांनी आवश्यक ती कार्यवाही केली. केशरबाईंच्या बँक खात्यावर पाझरतलावात गेलेल्या जमिनीचा मोबदला म्हणून ३३ लाख ७६ हजार ६९९ रुपये नुकतेच जमा करण्यात आले. सुमारे ४० वर्षांपूर्वीचे भूमिसंपादनाचे प्रकरण मार्गी लागले.

'शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य' ही केवळ उक्ती नव्हे तर ती कृतीतून दाखवून देण्यात आली. माहिती-तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वंचितांना न्याय मिळवून देणारी ही बाब निश्चित आनंददायी आहे.

**- दीपक चव्हाण**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर

ग्रामपंचायतीची सुविधायुक्त आणि तेवढीच सुंदर इमारत....गावात ठिकठिकाणी दिसणारे सीसीटीव्ही, पाण्याच्या टाकीवरचे वायफाय संयत्र, स्वच्छ आणि सुंदर परिसर, सोलर पथदीप.....हे दृश्य आहे दिंडोरी तालुक्यातील अवनखेड गावाचे. तरुण स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकाराने गावाचा कायापालट होत असून, अवनखेड आता खऱ्या अर्थाने 'स्मार्ट' होत आहे.



रस्ते सफाई करताना शाळकरी विद्यार्थी.

# स्मार्ट, सुंदर, सुबक

नागरिकांच्या मानसिकतेत झालेले परिवर्तन आणि गावाच्या विकासातला वाढता लोकसहभाग यामुळे हे गाव संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानात राज्यस्तरावर पोहोचले आहे. या अभियानांतर्गत विभागीय स्तरावरील द्वितीय पुरस्कार अवनखेडला जाहीर झाला आहे.

अस्वच्छता, अतिक्रमण आणि काहीसे व्यसनाधीनतेने हे गाव त्रस्त असताना स्वामी पद्मानंद सरस्वती यांच्या वास्तव्याने गावात आमूलाग्र बदल झाला. त्यांनी गावाच्या विकासात प्रसंगी श्रमदान करून ग्रामस्थांना मार्गदर्शन केले, गावाला पावित्र्याचा आणि मांगल्याचा मार्ग दाखविला.

गावातील नागरिकांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असतानादेखील सवयीमुळे शौचालय बांधण्यास नागरिक पुढे येत नव्हते. तरुण मंडळीने पुढाकार घेऊन ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. गावकऱ्यांनीदेखील एकत्र येऊन गावाला हागणदारीमुक्त करण्याचा निश्चय केला. गाव २०१४ मध्ये हागणदारीमुक्त झाले.

### उत्तम स्वच्छतागृहे

कादवा नदीच्या काठावर वसलेल्या साधारण अठ्ठावीसशे लोकसंख्येच्या या गावात ४१४ कुटुंबे असून, प्रत्येकाने वैयक्तिक शौचालय बांधले आहे. ग्रामपंचायतीच्या सुंदर इमारतीसमोर तेवढेच



## कथा : अवनखेड गावाची

**ग्रामपंचायतीची सुविधायुक्त आणि तेवढीच सुंदर इमारत.... गावात ठिकठिकाणी दिसणारे सीसीटीव्ही, पाण्याच्या टाकीवरचे वायफाय संयंत्र, स्वच्छ आणि सुंदर परिसर, सोलर पथदीप.....हे दृश्य आहे दिंडोरी तालुक्यातील अवनखेड गावाचे. विविध उपक्रमांनी गावाचा कायापालट झाला आहे.**



स्वच्छ व पक्के रस्ते

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

उत्तम प्रकारचे स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. उद्योजक सामाजिक दायित्व उपक्रमामधून लाभार्थींना वैयक्तिक शौचालये बांधून देण्यात आली आहेत.

गावात शिरताच भव्य सभामंडप, रस्त्याच्या कडेला असलेली 'पिकअप शेड' आणि परिसरातील स्वच्छता लक्ष वेधून घेते. प्रत्येक घरासमोर स्वतंत्र न्हाणीजोड ठेवण्यात आले असून त्याचे पाणी भूमिगत गटारात सोडण्यात आले आहे. गावात अडीच हजार मीटर लांबीची भूमिगत गटारे तयार करण्यात आली आहेत. नैसर्गिक उतारानुसार गावाच्या चारही बाजूस शोषखड्डे बनवण्यात येऊन त्यात गटाराचे पाणी जिरवण्यात आले आहे.

स्थिरीकरण तळे बनवण्याचे कामदेखील हाती घेण्यात आले आहे. कचरा व्यवस्थापनासाठी सुला वाईनतर्फे उद्योजक सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत प्रत्येक कुटुंबाला कचराकुंडीचे वाटप करण्यात आले आहे. घंटागाडीद्वारे बुधवार आणि रविवारी कचरा संकलन करण्यात येते. कचरा साठवणुकीसाठी कंपोस्ट टाकी बनवण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी कचराकुंड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. गाव स्वच्छतेसाठी शाळेतील विद्यार्थी आणि महिलांचा सहभाग विशेष असाच आहे.

### ग्रामस्थ एकत्र

निसर्गाच्या सान्निध्यात वसलेल्या या गावाला अधिक स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी ग्रामस्थ एकत्र आले आहेत. लोकसहभागामुळे गावात शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची सुंदर इमारत उभी रहात आहे. गावात ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. प्रत्येक घरात पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन देण्यात आले असून, जलशुद्धीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. गावातील वस्तीवर दुहेरी सोलर पंप वापरून पाणीपुरवठ्याची सुविधा करण्यात आली आहे. डिजिटल अंगणवाडी, सीसीटीव्ही, ऑनलाइन दाखले वितरण, वायफाय, भव्य सभागृह, बांधलेला नदीघाट, ग्रामपंचायत इमारतीतील अभ्यागत कक्ष, सोलर पथदीप, वैकुंठ रथाची सुविधा आदीच्या माध्यमातून गाव 'स्मार्ट' करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

– टीम लोकराज्य





## डिजिटल ग्रामपंचायत

- **राज्यातील सर्व ग्रामपंचायती डिसेंबर २०१८ पर्यंत डिजिटल करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम**
- **आतापर्यंत २९ हजारपैकी ७ हजार ग्रामपंचायती डिजिटल**
- **जानेवारी २०१८ पर्यंत पहिल्या टप्प्यात १४ हजार ग्रामपंचायती जोडणार**
- **या सुविधेमुळे जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या शाळा डिजिटल, तसेच अनेक सेवा गावांपर्यंत ऑनलाइन देण्यात मोठे योगदान**
- **हरिसाल हे पहिले डिजिटल ग्राम**
- **ग्रामीण भागात २०,२९९ आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना**
- **या केंद्रांच्या माध्यमातून २५,५२५ ग्रामपंचायतींचे लेखे संगणीकृत**
- **ग्रामपंचायतींचे नमुना १ ते ३३ संगणीकृत झाल्याने नागरिकांना आवश्यक १९ दाखले/प्रमाणपत्र तत्काळ देण्यात येतात**
- **रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, पॅन–आधार नोंदणी, विमा हप्ते, पासपोर्ट, वीजदेयक भरणा, पोस्ट सेवा आदी सर्व सेवा गावातच ऑनलाइन उपलब्ध**

# उज्ज्वलाने दिली चुलीपासून मुक्ती

## कथा : बोंडे गावाची

**स्वयंपाक करताना महिलांना होणारा त्रास प्रधानमंत्री उज्जवला योजनेमुळे कमी झाला आहे. गोंदिया जिल्ह्यातील ३५ हजार ४०१ महिलांच्या घरातील गॅस प्रधानमंत्री उज्वला योजनेमुळे पेटण्यास मदत झाली आहे.**

स्वयंपाकासाठी महिलांचे चुलीवर असलेले अवलंबित्व कमी करून त्यांचा त्रास कमी करण्यासाठी, केंद्र सरकारने मे २०१६ पासून प्रधानमंत्री उज्ज्वला योजना सुरू केली. चुलीवर स्वयंपाक करताना चुलीतील फुंकर मारताना निघणाऱ्या धुरामुळे महिलांना डोळ्यांचे विकार होतात. स्वयंपाक करताना महिलांना होणारा त्रास प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमुळे कमी झाला आहे. गोंदिया जिल्ह्यातील ३५ हजार ४०१ महिलांच्या घरातील गॅस प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेमुळे पेटण्यास मदत झाली आहे.

काबाडकष्ट करणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दुर्बल घटकातील महिलांना या योजनेचा प्राधान्याने लाभ देण्यात येत आहे. ज्यांच्याकडे गॅस कनेक्शन नाही अशा १८ वर्षे पूर्ण केलेल्या विवाहित महिलेच्या कुटुंबाला या योजनेंतर्गत गॅस कनेक्शन देण्यात येत आहे.

प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेंतर्गत गॅस कनेक्शन घेणाऱ्या कुटुंबाला सिलेंडरचे १२५० रुपये, रेग्युलेटरची सुरक्षा ठेव राशी १५० रुपये, १०० रुपये सुरक्षा होज, गॅस पासबूकचे २५ रुपये आणि तपासणी शुल्क, इस्टॉलेशन व प्रशासनिक शुल्क ७५ रुपये असे एकूण १६०० रुपये भरावे लागतात. हे पैसे केंद्र सरकारकडून लाभार्थ्याला कर्जस्वरूपात दिले जातात. २ बर्नर असलेली शेगडी ९९० रुपयांमध्ये दिले जाते. रिफिल गॅस हा कंपनीकडून ग्राहकाला कर्जस्वरूपात दिला जातो. गॅसमुळे जर अपघात होऊन व्यक्तीचा मृत्यू झाल्यास प्रतिव्यक्ती ६ लाखाचा विमा काढण्यात येतो. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा लाभ मिळण्यासाठी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ५ लाख ८९ हजार ८३ कुटुंबांनी तर शहरी भागातील १४ हजार ८५ कुटुंबांनी नोंदणी केली आहे. १ लाख ४२ हजार २१९ कुटुंबांचे सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले असून, या योजनेसाठी ७१ हजार १४० कुटुंबे पात्र ठरली



**गॅस ओटा बांधकाम, लाभार्थी रानाबाई गावतू नरेती (वनपरिक्षेत्र-बोंडे, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र) गोंदिया**

आहेत. ३५ हजार ५७० कुटुंबाकडे पूर्वीचेच गॅस कनेक्शन असल्यामुळे उर्वरित ३५ हजार ४०१ कुटुंबांना गॅस कनेक्शन देण्यात आले आहे. ग्रामीण महिला या शेतीची कामे करतात.

जंगल व शेत परिसरातून आणलेल्या जळतणावर दोन्ही वेळचा स्वयंपाक करताना धूर निघत असल्याने, त्यांना डोळ्यांच्या विकारांना सामोरे जावे लागत होते.

प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतून त्यांना गॅस कनेक्शन मिळाल्यामुळे स्वच्छ इंधन प्राप्त झाले. हजारो घरी उज्जवला योजनेतून गॅस पेटला. चुलीपासून महिलांना मुक्ती मिळाली.

**– टीम लोकराज्य**

## श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना

**श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात तसेच इतर अभयारण्यामधील वनालगतच्या ५०८ गावात राबवण्यात येत आहे. स्थानिकांचे वनांवरचे अवलंबित्व कमी करून त्यांना पर्यायी रोजगार साधने उपलब्ध करून देणे, त्यांच्या जीवनमानात बदल घडवून आणणे या उद्देशाने ही योजना राबवली जाते. दोन वर्षात १५ हजार ३४३ लाभार्थींना (एलपीजी सिलेंडर) गॅसचे वाटप करण्यात आले आहे. योजनेसाठी चालू वर्षात १०० कोटी रुपयांची वित्तीय तरतूद करण्यात आली आहे.**

कथा परिवर्तनाची



पारदर्शक धान्यवितरणासाठी ई-पॉस मशीनचा उपयोग.

# पारदर्शी धान्य वितरण

मूलभूत गरजांपैकी एक असलेल्या अन्नापासून शेवटच्या घटकातील व्यक्ती वंचित राहू नये याची काळजी शासन घेत असते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना ही सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत रास्त भाव दुकानाच्या माध्यमातून राबवण्यात येते. गोंदिया जिल्ह्यात शिधापत्रिका धारकांना रास्त भाव दुकानातून एप्रिल २०१७ पासून ई-पॉस (पॉईंट ऑफ सेल) मशीनद्वारे धान्याचे वितरण करण्यात येत आहे. शिधापत्रिकेवरील सदस्यांची आधार क्रमांकाशी ओळख पटवून, धान्य वितरण करण्यात येत आहे. जिल्ह्यातील एकूण ९९७ रास्तभाव दुकानातून ई-पॉस मशीनच्या माध्यमातून धान्याचे वितरण होत आहे. त्यामुळे बोगस रेशनकार्ड वापरून काळाबाजार करण्यास आळा बसला आहे.

## खरे लाभार्थी


जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे ७७ हजार १८१ लाभार्थी असून या लाभार्थ्यांना ३५ किलो धान्य देण्यात येत आहे. यामध्ये २ रुपये प्रतिकिलो दराने गहू आणि ३ रुपये प्रतिकिलो दराने तांदूळ व २० रुपये प्रतिकिलो दराने साखर तर प्राधान्य गटातील १ लाख २३ हजार ३३९ लाभार्थ्यांना प्रतिव्यक्ती ५ किलो धान्य वरीलप्रमाणे देण्यात येत आहे. सप्टेंबर २०१७ पर्यंत जिल्ह्यातील १ लाख ७५ हजार ४० शिधापत्रिकाधारकांना ई-पॉस मशीनद्वारे धान्याचे वितरण करण्यात आले आहे.

रास्तभाव धान्य दुकानातून ई-पॉस मशीन वापर करण्यात येत असल्यामुळे सार्वजनिक वितरण प्रणाली मजबूत झाली. ई-पॉसच्या वापरामुळे शिधापत्रिका बायोमॅट्रिक झाल्या आहेत. त्यामुळे पात्र असलेल्या शिधापत्रिकाधारकांना शिधावस्तूंचे वितरण नियमीतपणे होत आहेच सोबत पारदर्शकता आली आहे.

**- टीम लोकराज्य**

## ग्राहकहिताचे सरकार

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आमूलाग्र बदल
- रेशनकार्डचे वितरण आणि विश्वासार्हता तपासण्याची पूर्वी सोय नव्हती, आता रेशनकार्डांसह सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण. तसेच द्वारपोच योजना.
- बोगस रेशनकार्डांमुळे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होते, आता बायोमेट्रिक पद्धतीने ओळख पटवून पीओएस मशीनच्या साहाय्याने धान्यवाटप. सर्व ५१ हजार ३६३ दुकानांमध्ये पीओएस उपलब्ध.
- प्रत्यक्ष लाभार्थ्यालाच धान्यवाटपाची खातरजमा करण्याची व्यवस्था नव्हती, १० लाख रेशनकार्ड बोगस असल्याने रद्द. अंदाजे १० टक्के धान्याची बचत होऊन नवीन ९२ लाख पात्र लाभार्थ्यांचा समावेश शक्य झाला.
- विकेंद्रित आधारभूत किंमत खरेदी योजनेचे सक्षमीकरण
- पूर्वी केंद्र शासनाच्या अन्न महामंडळामार्फत धान खरेदी, आता विकेंद्रित खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून हमी भावाने धान खरेदी.
- पूर्वी बाहेरील राज्यातील तांदूळ रास्तभाव धान्य दुकानांमध्ये उपलब्ध होता, आता स्थानिक भागातील तांदूळ स्थानिक दुकानात उपलब्ध. अतिरिक्त होणाऱ्या तांदळाचा अन्य जिल्ह्यांना पुरवठा.
- पूर्वी भरडाईची सक्षम यंत्रणा नसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान, आता भरडाईच्या सक्षम यंत्रणेमुळे धानाच्या नुकसानीस प्रतिबंध. भरडाईचे दर वाढवून ते ४० रुपये प्रतिक्विंटल.
- पूर्वी धानाची किमान आधारभूत किंमत १०८० ते १३१०, आता धानाची किमान आधारभूत किंमत १५५० प्रति क्विंटल आणि २०० रुपये प्रोत्साहन राशी. चालू वर्षी ४६ लाख क्विंटल एवढी उच्चांकी धान खरेदी.
- पुरवठा व्यवस्थेचे बळकटीकरण. अन्नधान्य गावांत येताच ग्राहकाला एसएमएस
- थेट रास्तभाव दुकानांमध्येच धान्य पोहोचते, याची हमी, तसेच २८ जिल्ह्यांमध्ये द्वारपोच योजना. पुरवठ्यातील गैरप्रकारांना पूर्णत: आळा. दुकानदारांच्या कमिशनमध्ये १५० रुपयांपर्यंत वाढ.
- रास्तभाव दुकानदारांना बँकेचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून काम करण्यासह गॅस सिलिंडर, फ्री-सेल केरोसिन, बी-बियाणे आणि इतर वस्तूंच्या विक्रीस परवानगी.




## कथा : ठाणे जिल्ह्याची

**केंद्र शासनाने मुद्रा बँक योजना सुरू केल्याने; सुशिक्षित बेरोजगार, लहान व्यावसायिक यांची स्वप्ने साकार होण्याचा मार्ग खुला झाला.**

# स्वयंरोजगाराची 'मुद्रा'

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुद्रा बँक योजना ८ एप्रिल २०१५ रोजी कार्यान्वित केली. या योजनेनुसार कुठल्याही प्रकारचे तारण किंवा जामीनदाराशिवाय होतकरू, बेरोजगार यांना कर्जपुरवठा करून, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी या योजनेंतर्गत अर्थसाहाय्य देण्यात येते. देशामध्ये होतकरू, बुद्धिमान आणि जीवनामध्ये यशस्वी उद्योजक होण्याचे स्वप्न बाळगणारे लाखो तरुण आहेत. परंतु आर्थिक पार्श्वभूमी चांगली नसल्यामुळे एखादा लहान उद्योग / व्यवसाय नव्याने उभारण्यासाठी त्यांना काही अडचणी येतात. मुख्य अडचण ही भांडवलाची असते. कोणताही उद्योग, व्यापार आणि व्यवसाय उभारावयाचा असेल तर कमी व्याजदरामध्ये पतपुरवठा ही मूलभूत गरज आहे. या सर्व बाबींचा विचार करून, अशा तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यातून उद्योजक निर्माण व्हावेत, या हेतूने ही योजना सुरू करण्यात आली आहे. यामुळे सुशिक्षित बेरोजगार, लहान व्यावसायिकांची स्वप्ने साकार होण्याचा मार्ग खुला झाला. या योजनेमार्फत बेरोजगारांना कर्ज पुरवठा करून त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहित केले जाते. या योजनेंतर्गत कर्ज मिळण्यासाठी खालील तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

**शिशुगट :** रु.१०,००० ते ५०,००० **किशोरगट :** रु. ५०,००० ते ५ लक्ष **तरुणगट :** रु. ५ लक्ष ते १० लक्ष.

या योजनेंतर्गत संबंधित व्यक्तींना जिल्हा सहकारी बँका, राष्ट्रीय बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, बिगर बँक वित्तीय संस्था इत्यादींमार्फत कर्ज देणे अपेक्षित आहे.

यामध्ये सुतार, गवंडीकाम, कुंभार, शिंपी, धोबी, भाजीपाला व फळविक्रेते व्यावसायिक इत्यादी लहान स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनादेखील कर्ज देण्याची तरतूद आहे. कर्जाचा व्याजदर केंद्र शासन वेळोवेळी ठरवेल त्याप्रमाणे राहील.

## वैशालीची बेकरी

नाचणीचे टोस्ट, गव्हाची लादी, गव्हाची खारी, गव्हाचे बटर... वैशालीताई त्यांच्या नव्या बेकरीत काय काय प्रॉडक्ट तयार होते त्याची माहिती उत्साहाने देत होत्या. बेकरी म्हटले की मैद्याचे पदार्थच पाहायला मिळतात पण वैशाली सतीश भावसार यांच्या बेकरीत मैद्याचे तर नेहमीचे पदार्थ असतातच पण गव्हापासून तयार केलेले बेकरी पदार्थही तयार होतात. अल्पावधीतच त्याची लोकप्रियता अंबरनाथ-बदलापूर मध्ये पसरली आहे.

'गजलक्ष्मी बेकरी' या नावाने वैशालीताईंनी बेकरीचा व्यवसाय सुरू केला खरा पण फार काही साहित्य त्यांच्याकडे नव्हते. त्या मूळच्या जळगावच्या. सतीश भावसार हे जैन इरिगेशनमध्ये


वैशाली भावसार

**होय हे माझं सरकार**

**कथा परिवर्तनाची**

नोकरीला होते. दोन वर्षांपूर्वी ते ठाण्याला वागळे औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत रुजू झाले. दरम्यान वैशाली ताईंनी, बेकरीच्या पदार्थांची आवड असल्याने थोडेफार शिकून घेतले होते. जळगावला त्या घरगुती स्वरूपात व्यवसाय करायच्या. ऑर्डर्स घ्यायच्या पण याला मोठे स्वरूप काही त्यांनी दिले नव्हते.

ठाण्याला आल्यावर भांडुपला बेकरीचा व्यवसायिक कोर्स त्यांनी करून घेतला. याच दरम्यान कल्याणला असलेल्या 'आम्ही उद्योगिनी', या एका महिला व्यवसायिकांच्या गटात त्यांनी शिरकाव केला आणि उद्योगाचे धडे गिरवायला सुरुवात केली. अजूनही भांडवल आणि इतर साधनसामग्री कशी जमवायची हा प्रश्न होताच. या मंडळात येणाऱ्या काही ज्येष्ठ महिलांकडून महाबँकेविषयी कळले तेव्हा त्या ठाण्याला बँकेच्या ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रात एकदा जाऊन आल्या. बेकरीचा व्यवसाय करायचाच हे तोपर्यंत त्यांनी मनोमन ठरविले होते. या उद्योजकता विकास केंद्रात ७ दिवसांचे प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या वैशालीताईंनी आता आर्थिक गणिताची जुळवाजुळव करायला सुरुवात केली. १३ लाख रुपये साहित्यासाठी आणि ३ लाख फर्निचर वगैरे असा १६ लाखांचा प्रस्ताव होता मात्र, ऑक्टोबर २०१६ मध्ये बँकेने 'स्टॅन्ड अप इंडिया'मध्ये १० लाख ५० हजार मंजूर केले आणि बेकरीची मुहूर्तमेढ झाली.

कर्ज मंजूर झाल्यावर वैशालीताईंनी ५ लाख रुपये किंमतीचा मोठा ओव्हन घेतला, २१ ट्रे घेतले, बेकरीसाठी लागणारे इतर आवश्यक साहित्य घेतले. अंबरनाथ सारख्या झपाट्याने विकसित होत असलेल्या शहरामध्ये 'गजलक्ष्मी बेकरी'ची लोकप्रियता पसरायला वेळ लागला नाही. व्यवसाय वाढत गेला, विविध ऑर्डर्स मिळू लागल्या. आता बेकरीत ३ ते ४ कारागीर आहेत. पती सुरेश हेसुद्धा पूर्ण वेळ त्यांना बेकरीच्या कामात मदत करतात. दिवसाकाठी ४-५ हजार रुपयांची सहज विक्री होते. नावीन्यपूर्ण बेकरी उत्पादने हे 'गजलक्ष्मी बेकरी'चे वैशिष्ट्य आहे. विविध प्रकारची बिस्किटे, टोस्ट, खारी, स्वीट बन, केक असे पदार्थ लोकप्रिय आहेत. हळूहळू या उत्पादनाचे मार्केटिंग मोठ्या प्रमाणावर करण्याचे नियोजन आहे. पण ही सगळी सुरुवात 'स्टॅन्ड अप इंडिया'च्या कर्ज योजनेतून झाली हे सांगायला वैशालीताई विसरत नाहीत, ते अर्थसाहाय्य मिळाले नसते तर आज इथपर्यंत येता आले नसते हे सांगतांना त्या भारावून गेल्या होत्या.

## कांचनच्या पिशव्या



कांचन तेली

मी काहीतरी बिझिनेस वगैरे करीन असे कधी वाटले नव्हते. मी सिन्नरची. वडिलांचे छोटेसे किराणा सामानाचे दुकान होते, लहानपणी त्यांना मदत करण्यासाठी दुकानावर बसायची. त्या वेळी कागदी पुड्या बांधता बांधता मी कधीतरी पेपर बॅगचा उद्योग सुरू करेन असे कधीही स्वप्नात देखील वाटले नव्हते.. ठाण्याच्या कांचन तेली अगदी भरभरून बोलत होत्या. आपण एक लहानसा उद्योग टाकला आहे आणि तो व्यवस्थित सुरू आहे. याचा आनंद त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रगट होत होता. कांचन तेली लग्नानंतर १६ वर्षांपासून ठाण्यातच आहेत. चर्चगेटच्या एसएनडीटीमधून कमर्शिअल आर्टमध्ये पदवी शिक्षण त्यांनी घेतले. चित्रकलेची आवड तर होतीच. संगणकाचे महत्त्व लक्षात घेता मुंबईत एका नामांकित संस्थेतून ॲनिमेशनचा अभ्यासक्रमही केला.त्याच बळावर मायक्रोसॉफ्टच्या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर टाटा इंटरॲक्टीव सर्व्हिसेसमध्ये ई-लर्निंग प्रकल्पात काम केले. ती नोकरी वेळेच्या समस्येमुळे सोडली आणि पनवेलच्या प्रिंटिंग कॉलेज मध्ये अध्यापक म्हणून नोकरी केली. पण आकाशाला गवसणी घालण्याचे मनोमन ठरविलेल्या तेली यांना तिथे स्वस्थता नव्हती. डिझाईनिंगमध्ये प्रावीण्य असताना आपण स्वत:च काही का सुरू करू नये असे सारखे वाटत होते. फावल्या वेळात शुभेच्छा पत्रे, माहिती पत्रिका, पुस्तिका तसेच इतर आरेखनाची कामे सुरू होतीच. लेक्चररची नोकरी सोडून

तेली यांनी पेपर बॅगचा व्यवसाय करायचा असे ठरवले.

प्लास्टिक बंदी तसेच पर्यावरणामुळे प्लास्टिक पिशव्यांच्या वापरास येत असलेली मर्यादा लक्षात घेऊन कागदी पिशव्यांना मागणी वाढत होती हे त्यांच्या लक्षात आले. पण विविध प्रकारच्या कागदी पिशव्या किंवा बॅग तयार करण्यासाठीची यंत्रसामग्री त्यांच्याकडे नव्हती. म्हणून त्याची तजवीज होईस्तोवर त्यांनी केवळ कागदी पिशव्यांचे उत्पादन न करता केवळ ट्रेडिंग करायचे ठरवले. त्यात त्यांना नफा होऊ लागला. परंतु या पिशव्यांची मागणी लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर आपणच उत्पादन केले तर अधिक चांगली उलाढाल होईल व नफा मिळेल हे त्यांच्या लक्षात आले. मग प्रत्यक्ष उद्योगात उतरायची तयारी सुरू केली.

कांचन तेली यांचे यजमान मुद्रण व्यवसायातलेच. एका जर्मन कंपनीत कामाला आहेत. त्यांची मदत आणि प्रोत्साहन होतेच. सुरुवातीला आवश्यक ते कर्ज घेऊन कच्चा माल, तसेच जागा व इतर आवश्यक गोष्टींची उभारणी झाली.

दरम्यान प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे कर्जही अतिशय कमी कालावधीत मंजूर झाले. यंत्रसामग्री आणण्याचा प्रश्न सुटला. भिवंडी- माणकोली भागात आरकेजी औद्योगिक संकुलात जेके पेपर बॅग या नावाने त्यांनी आपल्या छोट्या उद्योगास सुरुवात केली. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून पाठबळ मिळाले होतेच. बँक ऑफ महाराष्ट्रने त्यांना सुमारे १८ लाख कर्ज दिले. महिला उद्योजक म्हणून त्यांना सबसिडी वगैरे अद्याप मिळायची आहे, परंतु ती प्रक्रिया सुरू आहे. त्याचा पाठपुरावा त्या करताहेत.

तेली यांच्यासमोर आपल्या या उत्पादनासाठी बाजार शोधणे एक आव्हान होते, मात्र ऑनलाइन कंपन्यांचा उपयोग झाला. सुरुवातीच्या काळात 'जस्ट डायल'च्या माध्यमातून ग्राहकांची विचारणा सुरू झाली. इतरही विपणनाचे पारंपरिक मार्ग होते. ठाणे जिल्हा तसेच परिसरातील घाऊक तसेच किरकोळ ग्राहकांच्या ऑर्डर्स मिळायला सुरुवात झाली.

आज महिन्याकाठी १५ टनापेक्षा जास्त उत्पादन विकले जाते असे कांचन तेली सांगत होत्या. विविध आकाराच्या आणि विविध कारणांसाठी लागणाऱ्या कागदी छोट्यामोठ्या पिशव्या त्यांच्या कारखान्यात बनतात. नोकरीच्या तुलनेत आज कितीतरी जास्त पैसा या व्यवसायात मिळत असून 'आपणच आपले बॉस', आहोत ही भावना सुखावह आहेच असे सांगून तेली म्हणाल्या की आज त्यांच्याकडे १० महिला आणि ५ पुरुष असे १५ कर्मचारी आहेत. ठाण्यातही त्यांनी एक ऑफिस थाटले असून हळूहळू या उद्योगाचा विस्तार करायचा मानस आहे.

## लसूण घ्या..लसूण....


पिंकी शेवडे

तरुणाईला रोजगार देण्यासाठी आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढवण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना सुरू झाली आहे. ही योजना केवळ शासनाची एक योजना नाही, तर लोकांची आयुष्ये घडवणारी एक चळवळ आहे.

ठाण्यातील कळवा येथील पिंकी शेवडे या तरुणीने हॉटेल्सना व चायनिज सेंटर्सना सोललेला लसूण पुरवठा करण्याचा कल्पक व्यवसाय निवडला. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून प्रथम ५० हजार रुपयांचे कर्ज मिळाले. तिने त्याची परतफेडही केली. पिंकीची जिद्द आणि चिकाटी पाहून आणखी ५० हजार रुपयांचे खेळते भांडवल कर्ज रूपाने उपलब्ध झाले. या व्यवसायासाठी पिंकीला आई आणि पती जयेश यांच्याकडून प्रेरणा मिळाली. दिवा येथे स्वतंत्र गाळा घेऊन, लसूण सोलण्याकरिता १५ ते २० महिलांची मदत घेतल्याने त्या महिलांनाही रोजगार प्राप्त झाला आहे. पिंकी यशाच्या शिखरावर कशी पोहोचली त्याची यशोगाथा....

स्त्री एक उत्तम व्यवस्थापक असते, कारण घरच्यांकडून तिच्यावर जे संस्कार केले जातात त्यात वेळेचे व्यवस्थापन कसे करावे त्याचे बाळकडूही तिला दिले जाते. आवड असेल तर सवड मिळते. मग आपण योग्य व्यवसायाची निवड करू शकतो. त्याचे जिवंत आणि उत्तम उदाहरण म्हणजे पिंकी शेवडे. या तरुणीने स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी एक कल्पक व्यवसाय निवडला. पिंकी शिकत असताना त्यांची आई आणि भावांचा हॉटेल्सना ताजी भाजी पुरवण्याचा व्यवसाय होता. हा व्यवसाय करीत असताना हॉटेलवाल्यांची एक छोटीशी गरज पिंकीच्या कायम लक्षात राहिली. त्यांना खाद्य पदार्थात टाकण्यासाठी, मसाले बनवण्यासाठी आवश्यक असतो सोललेला लसूण. चायनीज खाद्य पदार्थाला लसणाशिवाय कशी चव येणार? हॉटेलमध्ये लसूण सोलायला वेळ कुणाला आहे? हे किचकट आणि जटील काम त्यांच्यासाठी कुणी

कथा परिवर्तनाची

सहजतेने उपलब्ध करून दिले तर बाजारातील लसणापेक्षा सोललेल्या लसणाला हॉटेल्स आणि चायनिजवाले जास्त किंमत मोजायला तयार असतात. नेमकी हीच गरज लक्षात घेऊन पिंकी यांनी पूर्ण करण्याचे ठरवले.

कुठलाही छोटासा व्यवसाय सुरू करायचा म्हणजे भांडवल, यंत्रसामग्री, मजूर यांची निकड भासते. त्यात कर्ज देणार कोण ? मार्केटिंग कसे करायचे? बाजारपेठ कुठे व कशी उपलब्ध आहे? नफा तोट्याचा हिशोब कसा करायचा! वस्तूंच्या बाजारात किमान व कमाल किमती काय आहेत! आपल्या प्रॉडक्टची किंमत कशी ठरवायची? हा प्रश्नदेखील उभा ठाकला होता.

पिंकी राहायला पारसिक कळवा येथे असून तेथून जवळच दिवा गावात एक छोटासा गाळा घेऊन पिंकी यांनी लसूण सोलून पाकिटबंद करून विकण्याचा व्यवसाय सुरू केला. वास्तविक पाहता लसूण सोलून देण्याचे यंत्र ७ ते ८ लाखात मिळते. यातून तासाला १००किलो लसूण सोलून मिळतात. पण यांत्रिकी प्रक्रियेमुळे लसणाचा रंग काळपट होऊन त्याचा टिकाऊपणा कमी होतो. हाताने सोललेला लसूण चांगल्या अवस्थेत राहतो. त्याचा रंगही खराब होत नाही. दर्जाही चांगला राहतो. हे लक्षात घेऊन पिंकी यांनी आजूबाजूच्या गरजू महिलांची मदत घेण्याचे ठरवले. कौटुंबिक परिस्थिती बेताची असणाऱ्या महिला दिवसभर नुसते बसून राहण्यापेक्षा चार पैसे पदरी मिळतील असे काम करण्यास नेहमी तयार असतात. त्यातही लसूण सोलायचे काम म्हणजे बैठे काम कमी मेहनतीचे, घरापासून जवळच आणि इतर श्रमिक कामापेक्षा जास्त पैसे मिळवून देणारे.

एके दिवशी वृत्तपत्राच्या माध्यमातून पिंकी यांना प्रधानमंत्री मुद्रा योजनेबद्दल समजले. तिने बँक ऑफ महाराष्ट्र येथे जाऊन या योजनेचा अर्ज घेऊन लगेच कागदपत्रांची पूर्तता केली. बँक ऑफ महाराष्ट्रने ५० हजारांच्या कर्जास त्वरित मंजुरी दिली. या ५० हजारात पिंकी यांनी वाशीच्या कृषी उत्पन्न बाजार समितीतून मोठ्या प्रमाणावर लसूण खरेदी केला. आता लसणाचे पोते आणले की १५ ते २० महिला त्यातील लसणांचे वाटे करून सोलायला सुरुवात करतात. प्रतिमहिला, प्रतिदिन ३ ते ४ किलो लसूण सोलतात. प्रत्येक किलोमागे त्या महिलांना १३ ते १५ रुपये मोबदला मिळतो. या महिला बसल्या बसल्या टीव्ही पाहत लसूण सोलून आणि तो योग्य वजन करून पिशवी बंद करून ठेवतात. हा व्यवसाय इतका चांगला सुरू झाला की, अवघ्या काही महिन्यातच पिंकी यांनी सर्व कर्ज फेडले. पिंकी यांचे पती जयेश एका पर्यटन कंपनीत असून त्यांनीही पत्नीला याबाबत संपूर्ण साहाय्य करायचे ठरवले. आणखी ५० हजारांचे खेळते भांडवल म्हणून सेंट्रल बँकेकडून प्रधानमंत्री मुद्रा योजनामधून मागणी केली. बँकेच्या अधिकाऱ्यांनी पिंकी यांचे यश, काम करण्याची जिद्द, व्यवसायातील बळकटी व वेगाने उद्योग व्यवसायाची होत असलेली प्रगती आणि सर्वात महत्त्वाचे अत्यंत कमी कालावधीत पूर्वीचे फेडलेलं कर्ज याची दखल घेऊन या कर्जास विनाविलंब मंजूरी दिली. आज दररोज पिंकी ३० ते ४०किलो सोललेला लसूण ठाणे, कळवा, कल्याण, डोंबिवली येथील हॉटेल्सना आणि चायनिज सेंटर्सना पुरवतात व त्यातून मुद्दलवजा जाता चांगला नफा होत आहे.

चिकाटी, जिद्द, ध्येय, दूरदृष्टी, मेहनत आणि अभ्यासूवृत्ती आणि'प्रधानमंत्री मुद्रा योजना'या महत्त्वाकांक्षेमुळे उद्योग सुरू केल्याने; वेगळाच व्यवसाय करायचे माझे स्वप्न प्रत्यक्षात साकार होऊन मी यशस्वी उद्योगिनी बनले असे पिंकी मोठ्या अभिमानाने सांगतात. आपल्या आवडीचा व्यवसाय निवडून आपणही उद्योगिनी बनू शकता.

**– अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

**वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी १८ मार्च २०१६ रोजी विधीमंडळाच्या अधिवेशनात राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी केलेल्या भाषणामध्ये मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीतजास्त तरुणांना मिळावा यासाठी या योजनेचा प्रचार, प्रसार व समन्वय करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून युवकांना मार्गदर्शन करून बँकांशी समन्वय साधण्यात येत आहे.**




शिर्डीपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर डाऊच बुद्रुक नावाचे छोटे गाव आहे. नगर- मनमाड महामार्गावर मुख्य रस्त्यापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर वसलेले डाऊच जवळपास १२५० लोकसंख्येचे गाव. गावातील ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. गावचे ६०९ हेक्टर भौगोलिक क्षेत्र असून १९७२ पूर्वी गावातील शेतकरी कायम ऊसाचे पीक घ्यायचे. त्यानंतर मात्र पीक पद्धतीत कमालीचा बदल झाला. सातत्याने कमी होत गेलेल्या पावसाने डाऊचचे शेतकरी कापसासोबत आता कमी पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी २५ पैसे प्रति लीटर दराने उपलब्ध करून दिले आहे. गावांतर्गत सिमेंट रस्ते, पाणंद रस्ते तयार करण्यात आले आहेत. जलसंवर्धनासाठी दोन वनराईबंधारे व एक नालाखोलीकरण करण्यात आले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून, स्मशानभूमीत विधींसाठी शेडची उभारणी करण्यात आली आहे. बंदिस्त गटारीसोबतच 'घर तेथे शोषखड्डे' अभियान राबवण्यात आले. यातून गाव सांडपाणीमुक्त करण्यात यश आले आहे.

कथा : डाऊच गावाची

# समृद्धीची ओळख नवी

**अहमदनगर जिल्ह्यातील डाऊच (ता. कोपरगाव) गावातील ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्नांतून गावाला नवे रूप दिले आहे. लोकसहभागातून जलसंवर्धनाच्या कामाने प्रारंभ केलेल्या गावात पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, निर्मल ग्राम, कृषिविषयक योजना प्रभावीपणे राबवल्या आहेत. स्मार्ट ग्राम योजनेच्या सहभागाने गावाची सर्वांगीण ग्रामविकासाकडे यशस्वी वाटचाल सुरू आहे. दुग्धव्यवसायाच्या आधाराने गावाचे अर्थकारण बदलू लागले आहे. तंटामुक्त, सांडपाणीमुक्त, हागणदारीमुक्त, कुपोषणमुक्त, धूरमुक्त गावासोबतच बायोगॅसचे गाव अशी या गावाची नवी ओळख निर्माण झाली आहे.**

पाण्यात येणाऱ्या मका, गहू, सोयाबीन आदी पिकांकडे वळले आहेत. २०१६ मध्ये गावाने स्मार्ट ग्रामयोजनेत सहभाग घेतला.

## गावातील विकासकामे

ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढावे यासाठी लोकसहभागातून जलशुद्धीकरण प्रकल्पाची उभारणी करण्यात आली आहे. डाऊच गावाच्या जवळ असलेल्या दोन गावांनाही

गावात रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उंच नारळाची २५० झाडे तर इतरही ३५०० झाडांची लागवड करण्यात आली आहे. गावातील २३० कुटुंबांपैकी २२० कुटुंबांकडे शौचालये आहेत.

गावात सामूहिक शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे. स्मार्ट ग्राम योजनेतून गावातील अनेक विकामकामे प्रगतिपथावर आहेत.



कथा परिवर्तनाची

### सेंद्रिय शेती योजनेत सहभाग

गावातील सुमारे ६०९ हेक्टर एकूण क्षेत्रापैकी ५८० हेक्टर क्षेत्रावर कापूस, मका, गहू, ऊस अशा उत्पादनांसोबतच चाऱ्यासाठी लसूणघासही घेण्यात येतो. सेंद्रिय शेती प्रकल्पांतर्गत १६ प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे. गावातील सर्व जनावरांची मोफत तपासणी करण्यात आली असून, त्यांना जंतुनाशके, चारा व बियाणे वाटपासोबतच कडबाकुट्टी सयंत्र, मुरघास युनिटचे वाटप करण्यात आले आहे. प्रत्येक शेतकऱ्याला मोफत माती तपासणी करून शेतीची आरोग्यपत्रिका देण्यात आली आहे.

### अर्थव्यवस्थेला बळकटी

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी गावात १० बचतगट स्थापन केले आहेत. या गटांच्या माध्यमातून छोट्या व्यवसायाला सुरुवात झाली आहे. बचतगटांमुळे गावातील कौटुंबिक अर्थव्यवस्था सुधारू लागली आहे.






### दुग्धव्यवसायाचा आधार

शेतकऱ्यांनी पाणी व्यवस्थापन केल्याने जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था प्रत्येकाला करता येऊ लागली. आजघडीला गावात ६६८ दुभत्या व ९० भाकड अशा एकूण सुमारे ७५८ संकरित गाई, तर काही कालवडी आहेत. गावात दररोज सुमारे साडेचार हजार लिटर दुधाचे संकलन होते. सहकारी व खासगी संस्थांच्या माध्यमातून दूध संकलन होते. दुधाला प्रतिलीटर सरासरी ३० रूपयांपर्यंत दर मिळतो. दूध विक्रीतून गावात दररोज सव्वा लाख रुपयांचे उत्पन्न येते. महिन्याकाठी ३५ लाख रुपयांचे उत्पन्न दुध व्यवसायाच्या रूपाने गावात येते.

### संपूर्ण गावाचा सहभाग

स्मार्ट ग्राम योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी ग्रामस्तरीय समिती, ग्रामपंचायत, सेवा सहकारी सोसायटी, दूध संस्था, बचतगट, शेतकरी मंडळ व गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, तरुणांसह स्त्रियांचाही सहभाग महत्त्वाचा ठरला. सरपंच, उपसरपंच, सोसायटीचे अध्यक्ष, ग्रामस्तरीय समितीचे अध्यक्ष यांच्यासह संपूर्ण गावातील प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा ठरतो आहे. स्मार्ट ग्राम योजनेंतर्गत १० लाख रुपयांचा निधी गावाला मंजूर झाला आहे.

'इको व्हिलेज' योजनेत सतत तीन वर्षे सहभाग नोंदवल्याने गावाला या योजनेचाही निधी मिळाला. त्याचवेळी ग्रामविकासाचा हुरूप वाढलेल्या ग्रामस्थांनी उर्वरित विकासकामे स्मार्ट ग्राम योजनेतून पूर्ण करण्याचा संकल्प केला.

### गावकऱ्यांनी उभा केला ८ लाखांचा निधी

गावात विकासकामे करताना लोकसहभाग महत्त्वाचा आहे, ही बाब थेट कृतीत उतरवत गावात शाळा खोली बांधकाम, जलशुद्धीकरण प्रकल्प, मंदिर सुशोभीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. जवळपास ८ लाखांचा निधी लोकसहभागातून उभा राहिला आहे. दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गावात सिमेंटचे रस्ते करण्यात आले आहेत. डाऊच गावातील संपूर्ण सांडपाणी भूमिगत गटार योजनेद्वारा गावाबाहेर काढले आहे.

### गावातील विकासकामे

गावातील जवळपास सर्वच रस्ते सिमेंटचे आहेत. सुसज्ज ग्रामपंचायत भवन उभे झाले आहे. गाव ९८ टक्के गाव हागणदारीमुक्त असून १०० टक्के हागणदारीमुक्तीकरिता गावकऱ्यांचे प्रयत्न सुरू आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजेनेंतर्गत १० किलोमीटरचा रस्ता झाल्याने, गाव मुख्य रस्त्याशी जोडण्यास मदत झाली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २९ आदिवासी बांधवांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे.

### मुलीच्या जन्माचे स्वागत

डाऊच गावात बेटी बचाव, बेटी पढाव, अभियानांतर्गत मुलीच्या जन्माचे स्वागत केले जाते. ग्रामपंचायत स्वउत्पन्नातून एक हजार रुपयांच्या बचत प्रमाणपत्राचे वाटप करते. गावात ६३९ पुरुषांमागे ६३२ मुलींचे प्रमाण आहे. २०१५ नंतर सुरू केलेल्या या उपक्रमाचा ३५ मुलींना लाभ देण्यात आला आहे.

### बायोगॅसचे गाव

गावात दुग्धव्यवसाय करणाऱ्या ६१ कुटुंबाकडे बायोगॅस बसवण्यात आला आहे. यामुळे जळाऊ इंधनाची बचत झाली असून धूरमुक्त गावासोबतच बायोगॅसचे गाव अशी गावाची नवी ओळख निर्माण झाली आहे.

**– गणेश फुंदे,**
प्रभारी माहिती अधिकारी, शिर्डी



# पाहिजे तेव्हा सातबारा

## कथा : नागपूर जिल्ह्याची

'शेतात विहीर नसल्यामुळे सिंचनाच्या सुविधा नाहीत. पारंपरिक पीक घेताना उत्पादन खर्चाचा ताळमेळ बसत नसल्यामुळे शेतात सिंचनाची सुविधा मिळावी यासाठी तहसीलदारांनी अर्ज करायला सांगितले. या अर्जासोबत सातबारा जोडणे आवश्यक होते. परंतु तलाठ्याकडे पाच गावांचा कारभार त्यामुळे सातबारा कसा मिळेल या विवंचनेत होतो. तहसील कार्यालयातच एटीएस व्हेंडिंग मशीन असल्यामुळे डिजिटल सही असलेला सातबारा मिळाला आणि मला एमआरईजीएसअंतर्गत विहीर मंजूर झाली. त्यामुळेच शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली.' नागपूर जिल्ह्यातील व्याहळ या गावाचे शेतकरी ज्ञानेश्वर विठोबा टापरे यांची ही बोलकी प्रतिक्रिया. त्याचप्रमाणे माडापाजरी येथील प्रगतिशील महिला शेतकरी सौ. संध्या दिलीप गायकवाड यांनाही एटीएस व्हेंडिंग मशीनमधून मिळालेल्या सातबारामुळे धडक सिंचन योजनेचा लाभ मिळाला.

शासकीय योजनांच्या लाभासाठी आवश्यक दस्तऐवज सादर करताना एकाच ठिकाणी अधिकृत सातबारासह इतर प्रमाणपत्रे उपलब्ध झाल्यास लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेणे सुलभ होऊ शकते. हे नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयात बसवलेल्या एटीएस सातबारा व्हेंडिंग मशीनमुळे शक्य झाले आहे. शासनाच्या योजनांच्या लाभासाठी एटीएस व्हेंडिंग मशीन किती उपयुक्त ठरू शकते हे व्याहळच्या ज्ञानेश्वर विठोबा टापरे यांनी सांगितले.

'स्वत:ची चार एकर शेती हिंगणा तालुक्यातील चिंचोली या गावात आहे. शेतात कपाशी, ज्वारी, तूर आदी परंपरागत पिके दरवर्षी घेत होतो. शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २ लक्ष ८५ हजार रुपये मंजूर केले. त्यातून विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.'

### एनी टाइम सातबारा

शेतकऱ्यांना शेतीसह सर्वच कामासाठी शेतीचा सातबारा उताऱ्याची नेहमी आवश्यकता असते परंतु वेळेवर तलाठी मिळत नाही. त्यासाठी लागणारा वेळ शेतकऱ्यांनाही परवडत नसतो. शेतकऱ्यांना महसूल कार्यालयात अर्ज अथवा विनवणी न करता एटीएस मशीनसारख्या व्हेंडिंग मशीनमधून केवळ वीस रुपये टाकून अधिकृत सातबारा उपलब्ध होत असेल ही कल्पनाच कोणी करू शकत नाही.

### पहिला जिल्हा

नागपूर जिल्हा प्रशासनाने शेतीचा सातबारा देणारी एटीएस मशीन ही संकल्पना प्रत्यक्षात

**शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक दस्तऐवज सादर करताना एकाच ठिकाणी अधिकृत सातबारासह इतर प्रमाणपत्रे उपलब्ध झाल्यास लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेणे सुलभ होऊ शकते. हे नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसील कार्यालयात बसवलेल्या एटीएस सातबारा व्हेंडिंग मशीनमुळे शक्य झाले आहे. नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यात एटीएस मशीनद्वारे सातबारा उपलब्ध करून देण्याची सोय झाली आहे. या आधुनिक पद्धतीने जिल्ह्यातील १६ हजार ४६३ शेतकऱ्यांनी एटीएसमधून सातबारा मिळवला आहे.**



### तत्काळ सातबाराने मिळाली विहीर

**हिंगणा तालुक्यातील माडापाजरी या गावातील संध्या दिलीप गायकवाड यांच्याकडे अडीच एकर शेती असून शेतात धडक सिंचन योजनेंतर्गत विहीर खोदण्यासाठी अर्ज करताना एटीएस मशीनमधून तत्काळ सातबारा मिळाल्यामुळे विहीर मंजूर झाली. सातबारा या दस्तऐवजासाठी तलाठ्याकडे चकरा माराव्या लागल्या नाही. एका तलाठ्याकडे चार ते पाच गावाची जबाबदारी असल्यामुळे सातबारा मिळायला निश्चित वेळ लागतो. शासनाने धडक सिंचन विहिरीसाठी अडीच लाख रुपये मंजूर केले असून विहिरीला ३८ फूट पाणी लागले आहे. विहिरीवर विद्युतपंप बसवण्यासाठी अर्ज करताना एटीएस मशीनद्वारे मिळालेला सातबारा सहज उपलब्ध झाला. त्यामुळे वीज वितरण कंपनीची डिमांड नोटसुद्धा तत्काळ मिळाली. शेतात सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पारंपरिक पिकाऐवजी फळबाग आणि भाजीपाला आदी पिके घेणे सुलभ होणार असल्याचे संध्या गायकवाड यांनी सांगितले. त्यांचे पती दिलीप गायकवाड हेसुद्धा शेतकरी असून त्यांचा आधुनिक पद्धतीने शेती करण्याकडे विशेष कल आहे. साडेसात एकरात फळबाग फुलवण्यासाठी या कुटुंबाला कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ मिळत असल्याचे संध्या गायकवाड यांनी सांगितले.**

राबवली आहे. अशा प्रकारची यंत्रणा बसवणारे नागपूर हे देशातील पहिले केंद्र ठरले आहे. सरळ आणि सोप्या पद्धतीने शेतकऱ्यांना संगणकीकृत सातबारा केवळ वीस रुपयात उपलब्ध होत आहे. एटीएस मशीनमधून निघणारा सातबारा हा डिजिटल सही केलेला असल्यामुळे कोणाकडेही साक्षांकित करण्यासाठी जाण्याची आवश्यकता नाही.

### योजनांचा लाभ

नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांत एटीएस मशीनद्वारे सातबारा उपलब्ध करून देण्याची सुविधा आहे. या आधुनिक पद्धतीने जिल्ह्यातील १६ हजार ४६३ शेतकऱ्यांनी एटीएसमधून सातबारा मिळवला असून, यासाठी ३ लाख १८ हजार ५४० रुपयाचा महसूल गोळा झाला आहे. यामध्ये सर्वाधिक सातबारा भिवापूर या अत्यंत टोकावर असलेल्या तालुक्यात ६ हजार ८१६ शेतकऱ्यांनी एटीएस मशीनद्वारे सातबारा घेतला आहे. त्यासोबतच पारशिवनी या आदिवासीबहुल तालुक्यातील ३ हजार ८५४ शेतकऱ्यांनी सातबारा या मशीनद्वारे घेतला आहे. त्यानंतर नागपूर ग्रामीण तालुक्यात १ हजार ९३, कामठी १ हजार २०५, उमरेड १ हजार ६५८ शेतकऱ्यांनी एटीएस मशीनवरील सातबारानुसार विविध योजनांचा लाभ घेतला आहे. परिश्रमाने शेती पिकवित असताना शासनाच्या विविध योजनांच्या लाभासाठी सहज आणि सुलभपणे सातबारासारखे प्रमाणपत्र उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात निश्चितच परिवर्तन घडू शकते. नागपूर तालुक्यातील सोनेगाव लोधी येथील तरुण शेतकरी अजय भरत ठाकूर यांनासुद्धा मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी सातबाराची आवश्यकता होती.

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची


गावात तलाठी कार्यालयात जाऊन सातबारा मिळवण्यासाठी लागणारा वेळ पाहता थेट तहसील कार्यालयात जाऊन सातबारा एटीएसमधून तत्काळ मिळाला. त्यामुळे अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशीसुद्धा मागेल त्याला शेततळ्यासाठी अर्ज भरणे शक्य झाले अशी प्रतिक्रिया अजय ठाकूर यांनी दिली.

**– अनिल गडेकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर

# शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन ७/१२

**राज्यातील** ग्रामीण भागातील सर्वात महत्त्वाचा कागद म्हणजे जमिनीचा सातबारा होय. पीक कर्ज काढायचे असो की, बँकेचे कोणतेही काम त्यासाठी सात बारा हा आवश्यक पुरावा म्हणून लागत असे. हा सात बारा मिळवण्यासाठी तलाठी अथवा महसूल कार्यालयात वारंवार हेलपाटे घालावे लागत होते. ही अडचण सोडवण्यासाठी राज्य शासनाने ऑनलाइन सेवा देण्याचा निर्णय घेतला. यानुसार सातबारासुद्धा ऑनलाइन देण्यात येत आहे. यासाठी शासनाने विशेष प्रकल्प हाती घेतला आहे.

राज्यात ७/१२ ची संख्या एकूण २ कोटी ४७लाख ५६ हजार ४४० इतकी असून शेतकऱ्यांना वेळेवर ७/१२ उपलब्ध होत नाहीत, अशी वारंवार तक्रार उपस्थित होत असते. ही तक्रार समूळ नष्ट करण्यासाठी संगणकीकृत ७/१२ ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम सुमारे १५ वर्षे रेंगाळला होता. या प्रकल्पास गती देऊन मागील १ वर्षात एडीट मोड्यूलद्वारे २,३०,२९,०६४ एवढ्या ७/१२ उताऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली. एकूण ४३,९४२ गावांपैकी ४०,६२२ गावांचे चावडी वाचन मोहीम स्वरूपात करण्यात आले जेणेकरून दुरुस्त ७/१२ उताऱ्यांमध्ये देखील त्रुटी राहिल्या असतील शेतकऱ्यांना त्याबाबत लागलीच दाद मागता येईल. चावडी वाचनात प्राप्त झालेल्या त्रुटी दुरुस्त करून १३,८४५ गावांचे अभिलेख आजपर्यंत अद्ययावत करण्यात आलेले आहेत. ऑक्टोबर-२०१७ अखेर रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग वगळता इतर सर्व जिल्ह्यांचे ७/१२ उतारे ऑनलाइन व डिजिटली स्वाक्षरीसहित उपलब्ध करून देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.




**महाराजस्व अभियान –** राज्यात १ ऑगस्ट २०१६ ते ३१ जुलै २०१७ या कालावधीत महाराजस्व अभियान राबवण्यात आले. याअंतर्गत विविध १२ लोकाभिमुख विषयांवर विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत ३८ लाख ९६ हजार ५९४३ एवढे विविध (उदा. जात, रहिवास, उत्पन्न इ.) दाखल्यांचे वाटप करण्यात आले आहे.

२ हजार ३९० अर्धन्यायिक प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. १,५३,८३८ प्रकरणे ई-फेरफार अदालत घेऊन निकाली काढण्यात आली आहेत. ११ हजार ७८७ गाव दप्तरी नोंदी अद्ययावत करण्यात आल्या आहेत. तसेच या अंतर्गत ७ हजार ४५६ कि.मी. लांबीचे ५ हजार ०८० पाणंद रस्ते मोकळे करण्यात आले आहेत.

**नाशिक जिल्ह्यातील राजदेरवाडी गावाला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी गाव हागणदारीमुक्त करण्याचा निश्चय ग्रामस्थांनी केला. घराघरात शौचालय उभारण्यात आले. उर्वरित नागरिकांसाठी सार्वजनिक शौचलयाची सुविधा करण्यात आली गतवर्षी गाव हागणदारीमुक्त झाले.**

## कथा : राजदेरवाडीची




# स्वच्छतेचे सौंदर्य

**'राजदेरवाडी गावाला निसर्गाचे वरदान लाभले आहे. त्यामुळे सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचे प्रयत्न करतात. राजदेर आणि इंद्राई किल्ला आणि सभोवतालचा निसर्ग पर्यटकांना आकर्षित करणारा आहे. दरवर्षी साधारण पाच हजार पर्यटक येथे येतात. पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. स्वच्छता हे त्या दृष्टीने पहिले पाऊल आहे.'**

**– मनोज शिंदे, उपसरपंच**

नाशिक जिल्ह्यात चांदवडपासून साधारण १० किलोमीटर अंतरावर असलेल्या राजदेरवाडी गावात पावसाळ्यात जाणे हा आनंददायी अनुभव आहे. सातपुड्याच्या राजदेर, कोळदेर आणि इंद्राई किल्ल्याचे सौंदर्य, डोंगररांगांमधून कोसळणारे धबधबे आणि हिरवागार निसर्ग हे सर्व अद्भूत चित्र इथे पाहायला मिळते. हे सौंदर्य जपताना गावाला स्वच्छ, सुंदर पर्यटनस्थळ करण्याचा प्रयत्न ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्नातून सुरू केला असून, त्याला यशही येत आहे.

साधारण चौदाशे लोकसंख्येच्या या गावात २७० घरे आहेत. निसर्गाचे वरदान लाभलेल्या या गावाला, पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी; गाव हागणदारीमुक्त करण्याचा निश्चय ग्रामस्थांनी केला. घराघरात शौचालय उभारण्यात आले. उर्वरित नागरिकांसाठी सार्वजनिक शौचलयाची सुविधा करण्यात आली आणि गतवर्षी गाव हागणदारीमुक्त झाले.

केवळ शौचालयापुरती स्वच्छता मर्यादित न ठेवता सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने देखील प्रयत्न करण्यात येत आहेत. ठिकठिकाणी कचराकुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. कचऱ्याचे रूपांतर खतात करण्यासाठी एकूण १९ ठिकाणी घनकचरा नडेप खड्डे तयार करण्यात आले आहेत. गावात गाई-म्हशींची संख्या अधिक असल्याने चांगले शेणखत तयार करण्यासाठी या खड्ड्यांचा उपयोग होतो.

सांडपाण्याचा योग्य प्रकारे निचरा होण्यासाठी नळकोंडाळ्याच्या ठिकाणी शोषखड्डे बांधण्यात आले असल्याने, सांडपाण्याची समस्या दूर होण्यास मदत झाली आहे. काही घरांभोवती सांडपाण्याच्या माध्यमातून परसबागा फुलवण्यात आल्या आहेत. गावात प्लास्टिकमुक्तीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

गाव स्वच्छ करण्याबरोबरच ते विकसित होण्यासाठी ग्रामस्थ एकत्रित प्रयत्न करीत आहेत. ग्रामपंचायत इमारतीतील विश्रामकक्ष इथल्या सुंदर निर्मितीचे जणू प्रतीक आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून जिल्हा परिषद शाळेत ई-लर्निंगच्या सुविधेसोबतच शाळेला आयएसओ मानांकन मिळाले आहे. ग्रामपंचायतीतील माती परीक्षण युनिट, वायफाय सुविधा, एसएमएस सुविधेद्वारे ग्रामस्थांना दिली जाणारी माहिती, गावातील सौर दिवे गावाच्या विकासाची साक्ष देतात.

गावाने सामूहिक कामगिरीच्या बळावर निर्मलग्राम, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम, घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन आदी पुरस्कार मिळविले आहेत. नुकताच तालुका स्तरावरील स्मार्ट ग्राम पुरस्कारदेखील ग्रामपंचायतीने मिळवला. आमदार डॉ.राहुल आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली गाव पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याचे प्रयत्न होत आहेत. नुकतीच गावाची निवड वनपर्यटन स्थळ म्हणून करण्यात आली आहे. लोकसहभाग आणि ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे त्या दिशेने गावाची वेगाने वाटचाल होत आहे.

**– टीम लोकराज्य**

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

## कथा : साटोडा गावाची

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या पांढऱ्या सोन्याला कापसाला चांगला भाव मिळवून द्यायचा असेल तर कापसावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारण्याशिवाय पर्याय नाही. याला मूर्तरूप देण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला आहे. याची सुरुवात वर्धा जिल्ह्यातील साटोडा या गावापासून झाली आहे. गावातील १६ महिलांनी कापसापासून खादी कापड तयार करण्याच्या कामाला सुरुवात केली असून त्यांना रोजगाराचे नवीन साधन उपलब्ध झाले आहे. 'कॉटन टू क्लाथ' ही संकल्पना साकारणारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी निश्चित वरदान ठरणारा आहे.

# कापूस ते कापड

विदर्भात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते.पण शेतकऱ्यांना कापूस हा कच्चा माल म्हणून विकण्याशिवाय पर्याय नाही.कारण शेतकऱ्यांच्या मालकीच्या सूतगिरण्या किंवा वस्त्रोद्योग नाहीत. त्यामुळे पिकवलेला कापूस आहे त्या भावाने व्यापाऱ्यांना देण्यापलीकडे त्यांच्याकडे दुसरा पर्याय नाही. वर्षानुवर्षे सुरू असलेली ही प्रथा आजही कायम आहे. शेतकऱ्यांच्या या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी कृषी समृद्धी समन्वयित कृषी विकास प्रकल्पाद्वारे विविध योजना राबवण्यात येत आहेत. यामध्ये शेतकरी बचत गटाच्या दालमील, शेळीपालन, मशरूम शेती, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे आणि शेतकऱ्यांनी कापूस व्यापाऱ्यांना विकता कापूस गाठी तयार करण्यासाठी प्रोत्साहन व सहकार्य यांचा समावेश आहे. मागील दोन वर्षांपासून १० गावातील शेतकरी स्वत:च कापूस गाठी तयार करून विकत आहेत. पण यातील नफ्याचे खरे गणित कापड आणि वस्त्रे तयार करण्यात आहे, हे लक्षात घेऊन कॉटन टू क्लाथ या संकल्पनेवर काम करण्यात येत आहे.

वर्धा शहराला लागून असलेल्या साटोडा या गावातील विठाई, संस्कृती, महालक्ष्मी, भिमाई या महिला बचत गटाच्या २० महिलांना हातमाग चालवण्याचे प्रशिक्षण दिले. मुख्य म्हणजे यातील महिला या शेतकरी व शेतमजूर कुटुंबातील आहेत. निलयम संस्थेचे किशोरभाई यांनी या महिलांना हातमाग चालवण्याचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच



**वर्धा जिल्ह्यातील साटोडा गावातील १६ महिलांनी कापसापासून खादी कापड तयार करण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे त्यांना रोजगाराचे नवीन साधन उपलब्ध झाले आहे. 'कॉटन टू क्लॉथ' ही संकल्पना साकारणारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी निश्चितच वरदान ठरणार आहे.**

हातमाग युनिटही तयार करून दिलेत. या गावात ३० टक्के अनुदानावर ४ हातमाग युनिट या गावात स्थापन करण्यात आले आहेत.

दोन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ऑगस्ट महिन्यापासून १६ महिलांनी ५०० मीटर खादी कापड तयार केले आहे. मुख्य म्हणजे समन्वित शेतकरी उत्पादक कंपनी आणि ग्लोबल इंटरप्रयजेस या कंपनीला तयार कापड विकण्याचा करार केल्यामुळे १५० रुपये प्रतिमीटरने खादी कापड विकले जात आहे. यामध्ये महिलांना २०० रुपये प्रतिदिन मजुरी सोबतच कापड विक्रीतून होणाऱ्या नफ्यातील हिस्सा मिळणार आहे.

शेतकऱ्यांना १ क्विंटल कापसाचे हमीभावाप्रमाणे ५ ते ६ हजार रुपये मिळतात. पण त्यावर प्रक्रिया करून थेट खादी कापड विकले तर याच्या चारपट म्हणजे सुमारे २३ हजार रुपये नफा खर्च वजा जाता मिळू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी याचा फायदा घेतला पाहिजे.

– **निलेश वावरे,**
समन्वयक, कृषी समृद्धी समन्वित कृषी विकास प्रकल्प, वर्धा




भामदेवी हे वाशिम जिल्ह्यातील सुमारे साडेचारशे लोकवस्तीचे गाव. शेती हाच गावकऱ्यांचा मुख्य व्यवसाय. सिंचनाची सोय नसल्याने बहुतांशी शेती पावसावरच अवलंबून. एखाद्या वर्षी पाऊस कमी झाला तर पिण्याच्या पाण्याची सुद्धा वानवा. अशा या गावात आता बदल घडत आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून जिल्ह्याला मिळालेल्या २ कोटी रुपयांमधून भामदेवी गावामध्ये विविध विकास कामे राबवली जात आहे. गावातील भामदेवी दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या माध्यमातून संकलित होणारे 'वऱ्हाड दूध' हे भामदेवीतील शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीचे साधन ठरत आहे...

मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून विविध विकास कामे राबवण्यासाठी भामदेवी गावाची निवड करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत गावामध्ये शेतीला पूरक जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामस्थांना राहुरी विद्यापीठ, अहमदनगर जिल्ह्यातील प्रभात दूध प्रकल्प येथे नेऊन दुग्ध व्यवसाय, दुधाळ जनावरांचे संगोपन याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर गावातील एकूण ५६ लाभार्थ्यांना १७२ म्हशींचे अनुदानावर वाटप करण्यात आले. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील लाभार्थ्यांना ७५ टक्के व इतर मागास प्रवर्गातील ५० टक्के अनुदान उपलब्ध करून देण्यात आले.

उत्पादित होणाऱ्या दुधाला चांगला मोबदला मिळावा, याकरिता गावातच दूध प्रक्रिया केंद्र उभारण्याची संकल्पना जिल्हा प्रशासनाने ग्रामस्थांसमोर मांडली. ग्रामस्थांनी याकरिता तयारी दर्शवल्यानंतर भामदेवी दूध उत्पादक सहकारी संस्थेची स्थापना करून,

## कथा : भामदेवी गावाची

**मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून जिल्ह्याला मिळालेल्या २ कोटी रुपयांमधून वाशिम जिल्ह्यातील भामदेवी गावामध्ये विविध विकास कामे राबवली जात आहेत. याच अनुषंगाने दुग्ध व्यवसायाला चालना देण्यात आली आहे. गावातील भामदेवी दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या दुधाची विक्री 'वऱ्हाड दूध' या ब्रॅण्ड नेमखाली करण्यात येत आहे. या दुधाला ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिल्याने; संस्थेने आता तूप, दही, पनीर, खवा, चक्का आदी पदार्थ बनवण्यास सुरुवात केली आहे. त्यालाही ग्राहकांची वाढती मागणी आहे. दुग्धव्यवसायातून गावामध्ये दरमहा १५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.**

# वऱ्हाड दुधाचा 'गोडवा'




मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून तयार झालेले 'वऱ्हाड दूध' आणि इतर दुग्धजन्य पदार्थ.

## शेतीसंलग्न उद्योग

- राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या माध्यमातून (एनडीडीबी) विदर्भ मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त ११ जिल्ह्यात ३०२३ गावांमध्ये ३४० कोटींचा प्रकल्प (नागपूर, अमरावती, बुलडाणा, वर्धा, अकोला, चंद्रपूर, यवतमाळ, उस्मानाबाद, जालना, लातूर, नांदेड)
- दररोज २.५ लाख लीटर दुधाचे संकलन, दूध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार २५० कोटींचे अतिरिक्त उत्पन्न
- प्रतिलीटर दुधामागे शेतकऱ्यांना मिळू लागले अधिकचे ७ रूपये
- ७ जिल्ह्यामध्ये ९१६ गावांमध्ये १०,८४७ दूध उत्पादकांकडून दररोज ७० लीटर दूधसंकलन सुरू

त्यामाध्यमातून दूध प्रक्रिया केंद्र उभारण्याची प्रक्रिया सुरू झाली. मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयाच्या माध्यमातून ३० लाख रुपयांचा १००० लिटर क्षमतेचे दूध प्रक्रिया केंद्र भामदेवी येथे उभे राहिले. मार्च २०१७ मध्ये याठिकाणी गावात संकलित होणाऱ्या सुमारे ४०० लिटर दुधावर प्रक्रिया करण्यास सुरुवात झाली. प्रक्रिया केलेले दूध अमरावतीसह इतर ठिकाणी खासगी डेअरीना पुरविण्यात येऊ लागले. मात्र केवळ प्रक्रिया केलेले दूध विक्री करून अपेक्षित नफा मिळत नसल्याने भामदेवी दूध उत्पादक सहकारी संस्थेने थेट ग्राहकांना दूध व दुधापासून बनलेल्या पदार्थांची विक्री करण्याचा निर्णय घेतला.

### ‘वऱ्हाड दूध’ ब्रँड

जुलै २०१७ मध्ये भामदेवी दूध उत्पादक सहकारी संस्थेने स्वतःचा ‘वऱ्हाड दूध’ हा ब्रँड तयार केला. तसेच त्याला भारतीय अन्न सुरक्षितता आणि प्रमाणन प्राधिकरण अर्थात ‘एफएसएसएआय’ (FSSAI) परवाना प्राप्त करून घेतला. ‘वऱ्हाड दूध’ नावाने प्रक्रिया केलेल्या दुधाची पॅकिंग करून विक्री करण्यास सुरुवात केली. कारंजा लाड या तालुक्याच्या ठिकाणी संस्थेचे दूध विक्री केंद्र सुरू करण्यात आले. आपल्याच तालुक्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुधाला ग्राहकांनी चांगला प्रतिसाद दिला.

### नफ्यात वाढ

**माझ्याकडे सुरुवातीला दोन म्हशी होत्या. दोन म्हशींचे रोज १४ लीटर दूध डेअरीला वाटत होतो. त्यातून महिन्याला १८ ते २० हजार रुपये मिळत होते. खर्च वजा जाऊन ८ ते १० हजार रुपये शिल्लक राहत. आता नवीन तीन म्हशी विकत घेतल्या असून रोज २२ लीटर दूध डेअरीला पाठवत आहे. त्यामुळे महिन्याला ३० ते ३२ हजार रुपये मिळत आहेत. यापैकी सुमारे १५ ते १८ हजार रुपये निव्वळ नफा मिळत आहे.**

**– दिनकर दामोदर मुंदे,**
**दूध उत्पादक शेतकरी**

त्यानंतर आता संस्थेने तूप, दही, पनीर, खवा, चक्का आदी पदार्थ बनवण्यास सुरुवात केली आहे. त्यालाही ग्राहकांची वाढती मागणी आहे.



**भामदेवी येथील दूध उत्पादक संस्थेच्या माध्यमातून विक्रीसाठी ठेवण्यात येणारे दूध व दुधापासून बनलेले पदार्थ दर्जेदार स्वरूपाचे आहेत. येथील ग्रामस्थांनी प्रामाणिकपणे हा व्यवसाय चालवल्याचे लक्षात येते. या ठिकाणी तयार झालेले तूप व इतर काही पदार्थ संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत दिल्ली येथे होणाऱ्या प्रदर्शनामध्ये ठेवण्यासाठी साहाय्य केले जाईल. त्यामुळे भामदेवी येथील दूध उत्पादक संस्थेने बनवलेल्या पदार्थांना चांगली बाजारपेठ मिळेल व ग्राहकांनाही दर्जेदार उत्पादने मिळण्यास मदत होईल.**

**– प्रभज्योत सोधी,**
**कार्यक्रम व्यवस्थापक, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यू.एन.डी.पी.)**

### दरमहा १५ लाख रुपयांचे उत्पन्न

सध्या भामदेवी व आजूबाजूच्या गावांमधून दैनंदिन सुमारे ८०० लीटर दुधाचे संकलन सुरू आहे. यापैकी सुमारे ५०० लिटर दूध प्रक्रिया करून विक्रीसाठी पाठविले जाते. उर्वरित सुमारे ३०० लीटर दुधापासून विविध पदार्थांची निर्मिती करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करताना त्यांना इतर खासगी डेअरीपेक्षा प्रतिलीटर ३ ते ४ रुपये अधिक दर मिळत आहे. गावामध्ये दुधामुळे महिन्याला सुमारे १२ ते १५ लाखचे उत्पन्न येत आहे. दर दहा दिवसाला दुधाचे पैसे हातात मिळत असल्याने शेतकऱ्यांना उत्पन्नाचा नवा स्रोत मिळाला आहे.

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

### दुहेरी फायदा

**दुधाळ जनावरांचे वाटप, दूध प्रक्रिया केंद्राची उभारणी यामुळे शेतकऱ्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. दूध व्यवसाय फायदेशीर असल्याचे गावकऱ्यांना पटले असून आता गावामध्ये दुधाळ जनावरे खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. प्रत्येक दहा दिवसाला दुधाचे पैसे हातात मिळत असल्याने शेतकऱ्यांना आता कोणाकडे उसनवारी करायची गरज राहिली नाही. जनावरांच्या शेणापासून खत मिळत असल्याने रासायनिक खतांवर होणारा खर्च कमी झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा दुहेरी फायदा होत आहे.**

**– सुभाष मोहकार, सरपंच**

### दुधाळ जनावरांची खरेदी करण्याकडे कल

दूध प्रक्रिया केंद्रामुळे दुधाला चांगला दर मिळत आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. दूध व्यवसायाचे महत्त्व लक्षात आल्याने आता गावातील शेतकऱ्यांचा कल दुधाळ जनावरे खरेदी करण्याकडे वाढला आहे. दूध प्रक्रिया केंद्र सुरू झाल्यानंतर गेल्या दोन ते अडीच महिन्यात गावामध्ये जवळपास ४० नवीन म्हशींची खरेदी झाली आहे. भामदेवी दूध उत्पादक संस्थेकडून शेतकऱ्यांना म्हशी खरेदी करण्यासाठी ५० टक्क्यांपर्यंत अर्थसाहाय्य देण्यात येत आहे. ही रक्कम नंतर त्याच म्हशीच्या दुधाच्या पैशातून वजा करण्यात येते. संस्थेने आतापर्यंत १४ शेतकऱ्यांना या प्रकारचे अर्थसाहाय्य दिले आहे.

**– तानाजी घोलप,**
जिल्हा माहिती कार्यालय, वाशिम

**अनुसूचित जातीजमातीच्या चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागामार्फत अनेक संधीचे दालन खुले झाले आहे. आकाश कुळमेथेला आयआयटी धनबाद येथे संधी मिळाली ती आदिवासी विकास विभागाच्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दीड महिन्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या प्रशिक्षणातून...**

# संधीचे आकाश खुले....

## कथा : पोंभुर्ण्यातील गुणवंतांची

चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील चेकआष्टा गावातील आकाश कुळमेथेच्या घरी वातावरण तसे पारंपरिकच. आईवडील व दोन भावांच्या सोबत शेती व्यवसाय. आकाशचे दहावी पर्यंतचे शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतच झाले.अकरावी व बारावीच्या शिक्षणासाठी आकाश आपल्या काकाकडे जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षणासाठी गेला.

बारावीनंतर इंजिनीयरकडे जाण्याची आकाशची इच्छा होती. त्या दृष्टीने त्याचे प्रयत्न सुरू होते.११ वी व १२ वी नंतर त्याने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या जॉईंट एन्ट्रंस एक्झामिनेशन (जेईई) या प्रवेश परीक्षेची तयारी करायला सुरुवात केली.



**आकाश कुळमेथे**

चंद्रपूर येथे आकाशला एक संधी चालून आली अप्पर आदिवासी आयुक्त कार्यालय नागपूर कार्यालयाच्या केंद्रवर्धित अंर्थसंकल्प निधीतून प्रशीक्षण योजना राबवण्यात येते. गुणवंत आकाशला संधीची आवश्यकता होतीच. या दीड महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमातून मे २०१७ ला झालेल्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेत तो उत्तम गुणाने उत्तीर्ण झाला.

जुलै २०१७ ला आयआयटी धनबाद येथे मेकॅनिकल इंजिनीयरिंगला त्याला प्रवेश मिळाला. गुणवत्तेला प्रशिक्षणाचे कोंदण लाभल्याने आकाशला ही संधी मिळाली.

# वाटा प्रगतीच्या...

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना – अनुसूचित विद्यार्थी वसतिगृहात प्रवेशवंचितांसाठी योजना

- दहावी, बारावीनंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये अनुसूचित जाती, नवबौद्ध विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर वर्षाला ४८ हजार, शहरी भागात ६० हजार अनुदान (२०१६-१७ मध्ये ७११० विद्यार्थी लाभान्वित, २०१७-१८ मध्ये २५ हजार विद्यार्थी लाभान्वित होणार)
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्याकडून गेल्या ३ वर्षांत १८ हजार विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणासाठी संधी देण्यात आली. १२ हजार विद्यार्थ्यांनी कौशल्य प्रशिक्षण घेतले आणि त्यापैकी ११ हजार विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त झाला.
- अनुसूचित जातीच्या ५० विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा प्रशिक्षणासाठी औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र
- देशातील नामांकित युपीएससी प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी ५० विद्यार्थी पाठविण्यात येतात. २०१६ मध्ये १४ विद्यार्थी अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाले, तर २०१७ मध्ये ५५ विद्यार्थी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण
- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना एमफील, पीएचडी इत्यादी उच्च शिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशीप योजना. २०१५ मध्ये २०१, २०१६ मध्ये १२५ विद्यार्थ्यांना लाभ

### जात प्रमाणपत्र/पडताळणी

- सर्व जिल्ह्यात जातप्रमाणपत्र पडताळणी समिती (पूर्वी केवळ १५)
- रक्ताच्या नात्यात प्रमाणपत्र, पडताळणी समिती वडील, चुलते किंवा वडिलांकडील नातेवाईकाचे प्रमाणपत्र हाच आता मुख्य पुरावा. ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जाती, विशेष मागासप्रवर्ग अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेत उत्पन्न मर्यादा ४.५ लाखांहून आता ६ लाख, लाखो विद्यार्थी लाभान्वित

### आदिवासी विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश

- २०१० ते २०१४ या ५ वर्षांत केवळ ९९७७ विद्यार्थ्यांना शिक्षण.

| वर्ष | शाळा | विद्यार्थी |
|---|---|---|
| २०१५-१६ | ११४ | १७,४४२ |
| २०१६-१७ | १२० | १८,६६२ |

- नामांकित शाळांची संख्या अपुरी पडत असल्याने आता डे बोर्डिंग तसेच अन्य संस्थांशी संपर्क.

## कथा : चंद्रपूरची

**चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने 'हॅलो चांदा' नावाची यंत्रणा उभारली. १४ जुलै २०१७ पासून सुरू झालेल्या १८००-२६६-४४०१ या हेल्पलाइनवर संपर्क केल्यावर तत्काळ मदत पुरवली जाते.**

कथा परिवर्तनाची

# करा हॅलो, मिळवा मदत

हातातला मोबाइल प्रशासनावर अंकुश ठेवतो आणि त्यासाठी प्रशासनच पुढाकार घेते, असे वेगळे उदाहरण सध्या चंद्रपूरमध्ये बघायला मिळते. शासनाने पुढाकार घेत जिल्ह्यासाठी 'हॅलो चांदा' नावाची यंत्रणा उभारली. १४ जुलैपासून सुरू झालेल्या या हेल्पलाइनवर संपर्क करण्यासाठी १८००-२६६-४४०१ या क्रमांकावर मोबाइलवरून संपर्क साधणे आवश्यक आहे.

एखाद्या शासकीय विभागाविषयी तक्रार नोंदवल्यास विभाग प्रमुखांना ही तक्रार ऑनलाइन दिसते. मोबाइलवरून समस्या सांगणे, त्याचा पाठपुरावा, तक्रारीची सद्य:स्थिती, समस्येची सोडवणूक याविषयीची माहिती सामान्यांना त्यांच्या मोबाइलमार्फत उपलब्ध होते. जातीचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्र मिळण्यातील दिरंगाई, ७/१२, ८-अ, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील नुकसानभरपाई, पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यात केलेली टाळाटाळ, शाळा, अंगणवाडीतील मध्यान्ह भोजन, शेतीविषयक समस्या, अवैध दारू साठ्याची विक्री, आरोग्य केंद्र किंवा आरोग्य यंत्रणेविषयी तक्रारी, ग्रामीण भागातील पाणी, वीज, रस्ते यासारख्या विविध समस्या किंवा तक्रारी मोबाइलवरील एका कॉलने नोंदवता येतात. 'हॅलो चांदा'च्या १८००-२६६-४४०१ या टोल फ्री नंबरवर सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत शासकीय कामकाजाच्या दिवशी ही तक्रार करता येते. या यंत्रणेचा अनेकांना लाभ झाला आहे. जिल्ह्यात सध्या ही टोल फ्री यंत्रणा चर्चेत असून, संपूर्ण देशात मोबाइलचा वापर करून जनसामान्यांच्या तक्रारी सोडवणारा चंद्रपूर हा पहिला जिल्हा ठरला आहे.

### पुस्तके मिळाली....



चंद्रशेखर कंदलवार

चंद्रशेखर नारायण कंदलवार हे सिंदेवाही तालुक्यातील गडबोरी येथील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या शाळेतील काही विद्यार्थ्यांना शासकीय योजनेतून पुस्तके मिळाली. तर काहींना मिळाली नाही. त्यांनी 'हॅलो चांदा' तक्रार निवारण यंत्रणेवर तक्रार केली. तक्रारीनंतर चार दिवसामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके मिळाली. या यंत्रणेवर त्यांचा विश्वास बसला. शिक्षकांशी संबंधित अधिकाऱ्याशी संपर्क न साधता हे काम झाल्याचा त्यांना विशेष आनंद आहे.

### वीज मीटर तपासणी



चरणदास रामटेके

चरणदास रामटेके (जीबीनगर, चंद्रपूर) यांनी त्यांच्या मीटरवर ४५०० रुपयांचे बिल आल्याची लेखी तक्रार केली होती. यासाठी वारंवार कार्यालयाला भेट देऊन, त्यांनी विनंती केली. तथापि, आधी बिल भरा.. नंतर बघू अशी उत्तरे त्यांना मिळाली. दरम्यान या संदर्भात त्यांनी हॅलो चांदा या तक्रार निवारण यंत्रणेवर दूरध्वनी केला. त्यानंतर लगेच कार्यवाही सुरू झाली. दुसऱ्याच दिवशी त्यांचे मीटर तपासणीसाठी नेण्यात आले.

**- प्रवीण टाके,**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर



वासुदेव दुर्गे

### सातबारा घरपोच

**वासुदेव चिंपाजी दुर्गे (रा.नगीनाबाग, चंद्रपूर) यांनी २९ जानेवारी २०१६ रोजी तहसील कार्यालयामध्ये सातबारा मिळण्यासाठी निवेदन सादर केले होते. त्यापूर्वी ५ वर्षापासून त्यांची मागणी प्रलंबित होती. त्यांनी तक्रार निवारण यंत्रणेवर संपर्क साधला. त्यानंतर तलाठ्यानी त्यांना फोन करून घरपोच सातबारा पोहोचवला.**

**स्वत: जिल्हाधिकारी आशुतोष सलिल यांनी त्यांना फोन करून सातबारा मिळाला अथवा नाही याबाबत विचारणा केली. शासन आपले ऐकतेय याचा त्यांना आनंद झाला.**

**यवतमाळ जिल्ह्यात 'बळीराजा चेतना अभियान' २४ जुलै २०१५ राबवण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढून त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी मदत केली जात आहे. त्यांच्यात जगण्याचा आत्मविश्वास, नवी उमेद निर्माण केली जात आहे. या अभियानांतर्गत साधुसंतांच्या विचारांची पेरणी कीर्तनकार, प्रवचनकार गावोगावी करत आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना विविध प्रकारचे साहाय्य तातडीने केले जात आहे. त्यामुळे २०१५ च्या तुलनेत २०१६ मध्ये आत्महत्यांचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी झाले आहे.**






# बळीराजाला मिळाला आत्मविश्वास

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे खचलेले मनोधैर्य उंचावून, आत्महत्येसारख्या टोकाच्या भूमिकेपासून त्यांना परावृत्त करणे, त्यांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढून त्यांचे मनोबल उंचावणे, त्यांच्यात जगण्याचा आत्मविश्वास, नवी उमेद निर्माण करून त्यांच्या मनामध्ये सकारात्मक विचार, लढाऊ वृत्ती वाढविण्याची वातावरण निर्मिती करण्यासाठी; 'बळीराजा चेतना अभियान' २४ जुलै २०१५ पासून यवतमाळ जिल्ह्यात राबवण्यास सुरुवात झाली. जिल्ह्यात अभियानाची अंमलबजावणी सुरू असताना साधुसंतांच्या विचारांची पेरणी करीत कीर्तनकार, प्रवचनकार गावोगावी खंजेरी, मृदंग आणि टाळ घेऊन प्रबोधनाची मशाल पेटवत आहेत. सोबतच व्याख्याते, प्रगतशील शेतकरी, अशासकीय संस्था, धार्मिक, सामाजिक संस्था, संघटना, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, महिला, नागरिक, शाळा, महाविद्यालये शेतकऱ्यांसाठी चेतनादूत म्हणून काम करून शेतकऱ्यात प्रेरणा, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

### अभियानाची सहजता

यवतमाळ जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत हे अभियान सहज समजेल अशा बोली भाषेत पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पथनाट्य, कलापथक, महिला बचत गट, प्रवचन, खंजेरी भजन स्पर्धा, कीर्तन, निबंध, चित्रकला स्पर्धा, सामूहिक विवाहमेळावे असे अनेक उपक्रम, अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्याभरात राबवण्यात येत आहेत. यातून आता सामूहिक शेती, सामूहिक विवाहमेळावे, सेंद्रिय-जैविक शेती, निसर्ग शेती, सेंद्रिय-जैविक खत व औषधांचा स्वीकार, मिश्रपीक पद्धती, कमी खर्चात जास्त उत्पादन घेणे, माती परीक्षण, शेतीपूरक योजना, शेतीला पूरक उद्योग, अभियानाच्या ग्रामस्तरीय समितीकडून योग्य माणसाला योग्य मदत अशा विविध विषयांबाबत जिल्ह्यात प्रचार व प्रसार करण्यात येत आहे.

### सर्वांचा सहभाग

या अभियानामध्ये सार्वजनिक आरोग्य, सहकार, जलसंधारण, कृषी व पणन,

जलसंपदा, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय, नियोजन (रोहयो), महिला व बालविकास आणि कौशल्य विकास व उद्योजकता या विभागांमार्फत शेतकऱ्यांना मदत व दिलासा देणारे कार्य अविरत सुरू आहे.

प्रत्येक गावात ग्रामस्तरीय समित्यांचे गठन करण्यात आले आहे. त्यांना १ लाख रुपयांचा निधी सुपुर्द करण्यात आला आहे. त्यातून गावातच १८४८ ग्रामस्तरीय समितीला १०१ कृषीविषयक पुस्तकांचे वितरण करण्यात येऊन, कृषी सार्वजनिक वाचनालय सुरू झाले आहे. यामध्ये कृषिविषयक मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, कोरडवाहू, फळबाग, बारमाही ओलितांची पिके, भाजीपाला यासंबंधातील पुस्तके उपलब्ध झाली आहेत. इतकेच नव्हे तर जिल्हाधिकारी कार्यालय आणि तालुक्यातील शासकीय कार्यालयात थेट शेतमाल विक्री करण्यासाठी 'बळीराजा शेतमाल विक्री बाजार' भरवण्यात येत आहे.

### विविध उपक्रम

या अभियानांतर्गत २०१५-१६ मध्ये ४९७ जोडप्यांचे सामूहिक विवाहमेळावे पार पडले. महाआरोग्य शिबीरामधून ११,५८० रुग्णांची तपासणी करण्यात आली. तालुका व मंडळ स्तरावर समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले. आत्महत्याग्रस्त गावाकरिता २०० नोडल अधिकारी तर १०१ महसुली मंडळाकरिता संपर्क अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली. २०१६ च्या खरीप हंगामामध्ये 'अर्ज द्या, कर्ज घ्या' मोहीम राबवून १३,००० शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्यात आले. गावासाठी गठित करण्यात आलेल्या ग्रामस्तरीय समितीमार्फत खरीप हंगामात २०,९६१ शेतकऱ्यांना पेरणीकरिता मदत करण्यात आली. १०,७२२ शेतकऱ्यांना अकस्मात खर्चासाठी मदत करण्यात आली. ६,६४५ शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज हात उसनवारी देण्यात आले. अभियानाच्या लोकवर्गणीतून कर्करोगग्रस्त २७४ शेतकऱ्यांना प्रति १०,००० प्रमाणे मदत करण्यात आले. १४ विद्यार्थ्यांना एमबीबीएसच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी प्रति रु. ३०,००० प्रमाणे मदत करण्यात आली. पिकांचे फुटवे खाऊन दगावलेल्या जनावरांकरीता प्रति रु.५,००० प्रमाणे ३६ शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. ६ गरजू शेतकरी पाल्यांना स्पर्धा परीक्षेसाठी रु.५,००० प्रमाणे मदत करण्यात आली. १४२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला दुधाळ जनावराचे वाटप करण्यात आले. अशा प्रकारे अभियानांतर्गत एकूण ६३,८७४ शेतकरी कुटुंबांना व लाभार्थ्यांना मदत करण्यात आली.



बळीराजा चेतना अभियानांतर्गत विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आयोजित उपक्रमात सहभागी शेतकरी.

### आत्महत्येच्या संख्येत घट

या बाबी राबवल्याने २०१५ च्या तुलनेत २०१६ मध्ये ३० टक्क्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्याचे दिसून आले.

जिल्ह्यात आता 'बळीराजा चेतना अभियान' हे शासनाचे राहिले नसून ते शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या कृषी उन्नतीसाठी चालविण्यात येत असलेले अभियान बनले आहे. त्यामुळे जिल्ह्यात या अभियानाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**- राजेश येसनकर,**
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ

## सामाजिक सुरक्षा

- **कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनच्या माध्यमातून अन्नसुरक्षा, आरोग्यसेवा, शेतीविकास असे अनेक कार्यक्रम**
- **उस्मानाबाद व यवतमाळ येथे पथदर्शी म्हणून बळीराजा चेतना अभियान (सामूहिक विवाहांसाठी १० कोटी रुपये, अडचणीतील शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्यासाठी ग्रामस्तरीय समितीला १२.५० कोटी रुपये)**
- **६८ लाख शेतकऱ्यांना १४०० कोटी रुपयांची अन्नसुरक्षा**
- **१४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये ४.५ लाख शेतकऱ्यांवर ६०० कोटींचे उपचार**



# तिसऱ्या डोळ्याने पुणे सुरक्षित

**कथा : पुण्याची**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात तब्बल १२३४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यापैकी ९६५ कॅमेरे हे फिक्स पॉइंटवर आहेत. प्रसारमाध्यमांमध्ये खूप मोठी चर्चा झाली. २३१ कॅमेरे हे फिरते आहेत. शहरातील संवेदनशील, गर्दीची ठिकाणे, महत्त्वाचे चौक, रस्ते या ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या ठिकाणाहून चोवीस तास नजर ठेवली जाते.**

पुणे शहराला दहशतवादी हल्ला हा काही नवा राहिलेला नाही. जर्मन बेकरीमध्ये 'आरडीएक्स'चा स्फोट घडवून दहशतवाद्यांनी पुणेकरांना दहशतीची जाणीव करून दिली होती. या स्फोटाच्या घटनेनंतर पुण्यात 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्यांचे नेटवर्क असावे, अशी मागणी जोर धरू लागली होती. त्यानंतर लगेच दोन वर्षांनी जंगली महाराज रस्त्यावर दहशतवाद्यांनी साखळी बॉम्ब स्फोट घडवून आणले. या स्फोटाच्या घटनेच्या दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे एक उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली. त्यामध्ये पुणे शहरात 'सीसीटीव्ही' नेटवर्क असावे, याबाबत सखोल चर्चा झाली. या दोन्ही घटनांनंतर वर्षभरात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येची घटना पुण्यात घडली आणि 'सीसीटीव्ही' कॅमेरे बसवण्यावरून त्यावेळी पुणेकरांनी व प्रसार माध्यमांनी धारेवर धरले. त्यानंतर पुण्यात 'सीसीटीव्ही' कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर केला, त्याला काही निधी देण्यात येऊन त्याचे प्रत्यक्ष काम सुरू झाले. गत सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राज्यात सत्तांतर झाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा रखडलेला प्रकल्प मार्गी लावण्यासाठी झटपट पावले उचलली आणि सीसीटीव्ही कॅमरे बसवण्याचा देशातील पहिला प्रकल्प पुण्यात आकारास आला.

### डिजिटल पुणे

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'डिजिटल इंडिया'ची हाक दिल्यानंतर पुणे पोलिसांनी काळाची पावले ओळखत 'डिजिटल' होण्याकडे वाटचाल सुरू केली होती. शहरात बसवलेले 'सीसीटीव्ही' कॅमेरे हा त्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. या कॅमेऱ्यांचे कमांड सेंटर पुणे आयुक्तालयाच्या इमारतीत तयार करण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांची देखभाल दुरुस्ती संबंधित कंपनी करत असली तरी या कॅमेऱ्यांचा वापर आणि त्यांचे दैनंदिन ऑपरेशन हे पुणे पोलीस पाहतात. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षित

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

करण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख चौक, रस्ते, धार्मिक स्थळे, संवेदनशील ठिकाणे या कॅमेऱ्यांत नजरकैद आहेत. पुणे आयुक्तालयात यासाठीचे कमांड सेंटर असले तरी प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्या हद्दीतील कॅमेरे टिपत असलेले फुटेज संबंधित पोलीस ठाण्यात पाहण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. शहरात विविध ठिकाणी असे वेगवेगळे 'व्ह्यूविंग सेंटर' तयार करण्यात आले आहेत.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात तब्बल १२३४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. यापैकी ९६५ कॅमेरे हे फिक्स पॉइंटवर आहेत. २३१ कॅमेरे हे फिरते आहेत. शहरातील संवेदनशील, गर्दीची ठिकाणे, महत्त्वाचे चौक, रस्ते या ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या ठिकाणाहून चोवीस तास नजर ठेवली जाते. या ठिकाणी तीन शिफ्टमध्ये कमर्चारी काम करतात. प्रत्येक पोलीस ठाण्याला त्यांच्या हद्दीत बसवलेले कॅमरे पाहण्याची सोय करून देण्यात आली आहे. सीसीटीव्ही नियंत्रण कक्षात बसून पोलीस कर्मचारी समोर दिसणाऱ्या स्क्रीनवर सतत लक्ष ठेऊन असतात. एखाद्या ठिकाणी काही गडबड आढळून आल्यास तत्काळ मार्शल व स्थानिक पोलीस ठाण्यात कळवले जाते. साधारण अशा पद्धतीने या कॅमेऱ्यांचा वापर सुरू आहे.

## गुन्हेगारांना शोधण्यासाठी प्रभावी वापर

गुन्हेगारांना शोधण्यासाठी या सीसीटीव्हींचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात झाली आहे. फरासखाना पोलीस ठाण्याच्या आवारात २०१५ साली दहशतवाद्यांनी स्फोट घडवून आणला होता. तपास यंत्रणांनी केलेल्या तपासात संशयित दहशतवाद्यांच्या प्रतिमा सीसीटीव्हीत कैद झाल्याचे दिसले होते. वेगवेगळ्या कॅमेऱ्यांमध्ये १८ वेळा हे दहशतवादी टिपले गेले होते. हा स्फोट कसा घडवून आणण्यात आला, याचे चित्र तपास यंत्रणांसमोर उभे राहिले होते. गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या गुन्ह्यांतील १७ आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे गजाआड झाले आहेत. एवढेच काय तर येरवडा येथे नुकतीच एक तरुणी डंपरखाली आल्याने चिरडल्याची घटना घडली होती. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्याने अपघात नेमका कसा झाला? याचा तपास पोलिसांना करणे शक्य झाले होते. सीसीटीव्हींचा प्रभावी वापर करण्याचे कौशल्य तपास अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये वाढीस लागल्यानंतर, गुन्हे प्रलंबित राहण्याचे प्रमाण कमी होईल. त्याचप्रमाणे सीसीटीव्हींमुळे पुणे शहरात गंभीर स्वरूपाचे गुन्हे होण्याचे प्रमाण घटल्याचे दिसते आहे. सीसीटीव्हींमुळे हासुद्धा झालेला अप्रत्यक्ष फायदाच म्हणावा लागेल.



## नेमक्या सूचना नियंत्रण कक्षातून

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात गणेशोत्सव, नवरात्री, ईद, मोहरम, पालखी उत्सव यासह विविध धार्मिक सण समारंभ होतात. त्यांच्या मिरवणुकादेखील रस्त्यांवरून जातात. त्याचबरोबर मोर्चे-आंदोलनेही शहरात सुरू असतात.

शहरात सार्वजनिक-राष्ट्रीय सण तसेच आंदोलनासाठी पोलीस बंदोबस्त पुरवण्यात येतो. मात्र, प्रत्येक वेळेस घटनास्थळी जाऊनच एखाद्या परिस्थितीची पाहणी करून पुढील निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांना या पूर्वी घ्यावे लागत होते. आता 'सीसीटीव्ही' कॅमेरे नियंत्रण कक्षाला जोडण्यात आल्याने एखादी समाजविघातक घटना असो, किंवा कार्यक्रम यामध्ये रस्त्यावर काय चालले आहे, याचे थेट प्रक्षेपण आयुक्तालयात असणाऱ्या पोलीस आयुक्तांपासून, सहआयुक्त, अप्पर आयुक्त यांना पाहता येत आहे. त्यामुळे योग्य त्या आणि नेमक्या सूचना नियंत्रण कक्षातून देण्यास सुरुवात झाली आहे. अनेकदा शहरातील काही ठरावीक चौकात वारंवार काही ना काही





### सीसीटीएनएस

- **राज्यातील सर्व पोलीस स्थानकांपासून ते पोलीस महासंचालक अशी सर्व कार्यालये ही ऑनलाइन, एकमेकांशी जोडलेली (एकूण १०५४ पोलीस स्थानके आणि ६२९ वरिष्ठ कार्यालये)**
- **न्यायालय, कारागृह, न्यायसाहाय्यक प्रयोगशाळा आणि फिंगरप्रिंट असे विभागसुद्धा जोडण्याची कारवाई युद्धस्तरावर सुरू**

### मुंबई, पुणे सीसीटीव्ही

- **मुंबईत १५१० ठिकाणी ४७१७ सीसीटीव्ही कॅमेरे, ९४९ कोटी खर्च**
- **पुणे/पिंपरी चिंचवड मिळून १२३४ कॅमेरे कार्यान्वित, २२५ कोटी खर्च**

घडत असते. किरकोळ कारणावरून मोठा वाद देखील उद्‌भवत असतो. अशा चौकांमध्ये नेमके काय चालले आहे, याच्यावर थेट परिमंडळाचे प्रमुख असणारे उपायुक्त नजर ठेवू शकणार आहेत. पोलीस नियंत्रण कक्षाला एखादा संदेश किंवा दूरध्वनी आल्यावर नियंत्रण कक्ष, पोलीस ठाणे आणि आता उपायुक्त कार्यालयातून त्या ठिकाणची पाहणी करणे शक्य आहे. एखाद्या ठिकाणी काही वाईट प्रसंग घडल्यास संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून ती परिस्थिती कशी हाताळली जात आहे यावरदेखील उपायुक्त नजर ठेवू शकणार आहेत. काही प्रसंगामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सीसीटीव्हीचा प्रभावी वापर सुरू केला आहे. पुणे पोलिसांनी यावर्षी पालखी आणि गणेशोत्सव सोहळा पूर्णपणे 'सीसीटीव्ही'च्या निगराणीखाली आणला होता. त्याचा सर्वाधिक फायदा हा वाहतूक नियमन करण्यासाठी झाला.

### चित्रीकरण सहज उपलब्ध

शहरातील ३९ पोलीस ठाण्यांच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे पोलीस ठाण्यात काय चालले आहे. कर्मचारी, नागरिकांची ये-जा तसेच एखादा वाईट प्रसंग घडल्यास त्यावर आयुक्तालयातील नियंत्रणकक्षातून नजर ठेवली जात आहे. त्यामुळे वारंवार पोलीस ठाण्याच्या आवारात विशिष्ट हेतूसाठी घुटमळणाऱ्यांनी वेळीच सावध होण्याची गरज आहे. एखादी व्हाइट कॉलर व्यक्ती पोलिसांवर दबाव आणत असेल, किंवा पोलीस ठाण्यात गोंधळ घालत असेल तर त्याचे चित्रीकरणदेखील आता वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहज उपलब्ध होणार आहे.

### वाहतूक पोलीस एक पाऊल पुढे

वाहतूक पोलिसांनी एका खासगी संस्थेच्या माध्यमातून केलेल्या सर्वेक्षणानुसार पुण्यात दर दिवशी एक कोटी वेळा वाहन चालकांकडून नियमभंग केला जातो. त्याच वेळी पुणे वाहतूक पोलिसांकडून मोठ्या प्रमाणात ठोस कारवाई केली तरी ती प्रतिदिवशी पाच हजारांच्या घरात असते. एकाच वेळी एक कोटी नियमभंगाच्या घटना आणि त्याच वेळी केवळ पाच हजार कारवाई हे अत्यंत विषम प्रमाण असून, त्यामुळे वाहन चालकांचे फावते आहे. वाहतूक पोलिसांनी वाहन चालकांना वठणीवर आणण्यासाठी सीसीटीव्हीचा प्रभावी वापर करण्यासाठी पावले उचलली आहेत. एका खासगी संस्थेच्या माध्यमातून आधुनिक सीसीटीव्ही कंट्रोल रूम तयार केली असून त्याद्वारे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यासाठी आरटीओची मदत घेऊन वाहनाच्या नोंदणी क्रमांकावरून वाहन मालकाचा मोबाइल क्रमांक मिळवला जातो. त्या क्रमांकावर वाहतूक पोलिसांकडून टेक्स्ट मेसेज जात असून त्यामध्ये नियमभंग होतानाचा फोटो आणि दंडाच्या रकमेबाबतची लिंक दिली जाते. ही लिंक तपासून संबंधित वाहनमालकाने दंडाची रक्कम भरणे अपेक्षित आहे. पुणेकरांनी आतापर्यंत २० लाख रुपयांहून अधिक दंड भरला आहे तर संदेश पाठवण्यात आलेल्या वाहन चालकांची संख्या काही लाखांच्या घरात पोहोचली आहे. कधी ना कधी हा दंड वसूल केला जाणार आहेच. कारण आधार आणि पॅन कार्ड लिंक करण्यात आले असल्याने प्रत्येक नागरिक आता स्कॅन होणार आहे.

**– प्रशांत आहेर,**
प्रतिनिधी, दै. महाराष्ट्र टाइम्स

कथा परिवर्तनाची

## कथा : पुणे कारागृहाची

# टेलिमेडिसिनने जोखीम झाली कमी

**पोलीस दलात टेलीमेडिसीन प्रणालीने अल्पावधीतच आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे. या यंत्रणेमुळे पोलीस प्रशासनावरील ताण कमी झाला आहे, त्याचबरोबर राज्यातील विविध कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या बंदिवानांना कमी कालावधीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध झाली आहे.**

कारागृह सुरक्षा यंत्रणेतील सुधारणेबाबत उपाययोजना सुचवण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितींच्या शिफारशीनुसार कारागृहातील कैद्यांसाठी टेलिमेडिसिन सुविधेची सोय करण्यात आली आहे. राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे तसेच ठरावीक शासकीय रुग्णालयांमध्ये टेलिमेडिसिन सेंटर उपलब्ध करण्यात आलेली आहेत. कारागृह विभागाकडे कैद्यांसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग संच उपलब्ध आहेत. एनआयसी (राष्ट्रीय सूचना केंद्र) या संस्थेच्या मदतीने १४ एप्रिल २०१७ रोजी बै.जी. शासकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे आणि येरवडा मध्यवर्ती कारागृह यांच्यामध्ये टेलिमेडिसिन सुविधा कार्यान्वित करण्यासाठी यशस्वीपणे चाचणी घेण्यात आली.

त्यानंतर सर्व मध्यवर्ती कारागृह नजीकच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे टेलिमेडिसिन सुविधेकरिता जोडण्यात आली, सर्व जिल्हा कारागृहे नजीकच्या शासकीय जिल्हा रुग्णालयाशी जोडण्यात आली. आता नियमितपणे प्रत्येक कारागृहातून कैद्यांना टेलिमेडिसिन सुविधेद्वारे वैद्यकीय उपचार घेण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयातील शासकीय रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांसमोर हजर करण्यात येते. कैद्यांना कारागृहातून रुग्णालयात ने-आण करताना अपघातांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते. रुग्णालयातून कैदी पलायनाच्या घटना घडण्याच्या शक्यता असतात. अशा आरोपींना सोडवण्यासाठी किंवा त्यांना जिवे मारण्यासाठी पोलीस पथकावरच जीवघेणे हल्ले होण्याची शक्यता असते. रुग्णालयात घेऊन गेल्यानंतर कैद्यांना तिथे नातेवाईक भेटण्याची शक्यता असते त्यात त्यांच्या सहकाऱ्यांचा समावेश असू शकतो. तेथून सहकाऱ्यांच्या फोनवरून खंडणीसाठी धमक्या येण्याची शक्यता असते. त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांची मोठी कुमक पुरवावी लागते.



पुणे मध्यवर्ती कारागृहात टेलिमेडिसिन प्रक्रियेद्वारे कैद्यांची वैद्यकीय तपासणी

टेलिमेडिसिन ही संकल्पना म्हणजे कारागृहात शिक्षा भोगत असलेले कैदी हे आजारी पडले किंवा त्यांना दुर्धर आजार झाला तर त्यांना दवाखान्यात येण्याची आवश्यकता नाही. ज्या दिवशी कारागृहातील वैद्यकीय अधीकक्षकांना मेडिकल कॉलेजमधील तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावयाचा असतो. ती तारीख आणि वेळ ठरवून दिली जाते.

कारागृहामधील वैद्यकीय अधीक्षक आणि संबंधित कैदी रुग्ण हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्षात एकत्र येतात. मेडिकल कॉलेजमधील टेलिमेडिसिन कक्षात डॉक्टर सल्ला देण्यासाठी ठरलेल्या वेळेवर येतात. त्यांच्या आजाराबाबत माहिती जाणून घेतात. त्यानुसार कोणती औषधी द्यावीत, याबाबत कारागृहातील वैद्यकीय अधीक्षकांना सल्ला देतात. या संवादातून मोठा आजार असल्याचे जाणवले तर शासकीय रुग्णालयात पुढील वैद्यकीय उपचारासाठी बोलावले जातात.

१७ एप्रिल २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१७ यादरम्यान आतापर्यंत २००० पेक्षा अधिक कैद्यांवर उपचार करण्यात आले आहे. ही अभिनव प्रणाली कारागृह सुरक्षा यंत्रणेसाठी उपयुक्त ठरली आहे.

**– मोहन राठोड,**
उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, पुणे



## कथा : धुळे जिल्ह्याची

**धुळे जिल्ह्यातील ४ तालुक्यामध्ये ८७ केंद्रांतर्गत १९०३ जि.प. शाळा आहेत. या सर्व शाळांचे वर्ग डिजिटल होऊन, धुळे जिल्ह्याने या क्षेत्रात राज्यात आघाडी घेतली आहे.**



**डिजिटल शाळांना चालना देणारे हर्षल विभांडीक.**

# शाळा झाल्या डिजिटल

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या डिजिटल इंडिया उपक्रमाला बळ देऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ धुळ्यातील हर्षल विभांडीक या तरुणाने पोहोचवला आहे. जिल्ह्यातील ११०३ जि. प. शाळा डिजिटल केल्या असून त्याच्या या कार्याची दखल राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी घेतली आहे. विशेष म्हणजे हर्षलने विदेशातील नोकरी सोडून आपला वेळ व पैसा या उपक्रमासाठी खर्च केले आहे.

१० वर्षे न्यूयॉर्कसारख्या उच्चभ्रू शहरात बँकिंग क्षेत्रात गलेलठ्ठ पगाराची नोकरी करत असताना देशप्रेमाची प्रेरणाज्योत मनात ठेवून, डिजिटल इंडिया ग्रामीण भागात प्रत्यक्षात आणण्यासाठी काम करण्याचे ठरवून हर्षल परत आला. खेडोपाडी हिंडून गावकरी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मागील १० वर्षांच्या अमेरिकेतील वास्तव्यात अमेरिकेचे माजी राष्ट्रपती बराक ओबामा यांना शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठात विद्यार्थ्यांना संबोधित करताना हर्षल नेहमी ऐकत असे, त्या वेळेस ओबामा नेहमी अमेरिकेतील विद्यार्थ्यांना २१ व्या शतकातील त्यांची स्पर्धा ही भारत आणि चीनच्या विद्यार्थ्यांशी असल्याचे म्हणत असत. परंतु वस्तुस्थिती फार वेगळी आहे. अमेरिकेच्या शिक्षण पद्धतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर केला जातो. याउलट भारतात आम्ही अजूनही 'दप्तराचे ओझे' या विषयावरून वाद घालत आहोत.

आतापर्यंत हर्षलने धुळे जिल्ह्यातील ९०० हून अधिक खेड्यापाड्यांमध्ये फिरून २५० पेक्षा जास्त गावांमध्ये शाळा डिजिटल व्हाव्यात यासाठी प्रेरणा सभा घेतल्या आहेत. धुळे जिल्ह्यातील ४ तालुक्यामध्ये ८७ केंद्रांतर्गत ११०३ जि.प. शाळा आहेत. या सर्व शाळांतील वर्ग डिजिटल होऊन धुळे जिल्ह्याने या क्षेत्रात राज्यात आघाडी घेतली आहे.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी हर्षलला प्रश्न विचारला की, 'तुमचे इतके जोरदार काम चालू आहे, तुमची टीम किती मोठी आहे?' यावर हर्षल म्हणाला, जि.प. धुळेचा शिक्षण विभाग हीच माझी टिम आहे.

केंद्रप्रमुखाच्या मदतीने हर्षलने प्रत्येक केंद्रात मुख्याध्यापकाची केंद्रस्तरीय बैठक घेतली, या बैठकीमध्ये प्रत्येक शाळेसाठी, शाळेच्या पटसंख्येनुसार आणि गावकऱ्यांच्या मिळत असलेल्या मदतीनुसार ती शाळा कशी डिजिटल होईल, याचे नियोजन करण्यात आले. प्रत्येक शाळेसाठी कोणते डिजिटल साहित्य वापरावयाचे आणि त्यासाठी लागणारा निधी कसा उभारायचा याचेही नियोजन करण्यात आले.

डिजिटल वर्गासाठी लागणाऱ्या एकूण निधीचा ३० टक्के भाग हर्षल, त्याचे अमेरिकेतील मित्र आणि देशबंधू व मंजू गुप्ता फाऊंडेशन यांनी पुरवला. उर्वरित ७० टक्के निधी लोकसहभाग, शिक्षकांची व माजी विद्यार्थ्यांची आर्थिक मदत आणि ग्रामपंचायतीच्या सहकार्यातून उभारण्यात आला. लोकसहभागातून निधी उभारण्यासाठी गावोगावी प्रेरणा सभा घेण्यात आल्या.

धुळे जिल्ह्यात प्रेरणा सभांच्या माध्यमातून डिजिटल वर्गासाठी ७ कोटी २५

कथा परिवर्तनाची

लाखांपेक्षा अधिक निधी उभारण्यात आला आहे. जि.प. शाळेच्या शिक्षकांनी स्वत: त्यांच्या शाळांसाठी १ कोटी २५ लाख रुपयांपेक्षा अधिक निधी दिला आहे. शिक्षकांच्या प्रयत्नांनी प्रथम गावात वातावरण निर्मिती केली गेली. मग प्रेरणा सभांचे आयोजन झाले. सभेत गावकऱ्यांना डिजिटल शाळांचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचे प्रबोधन केले जाते. प्रेरणा सभांच्या या माध्यमातून घडून येत असणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'गाव शाळेमध्ये येत आहे.' केवळ शाळा डिजिटल होत नसून, शाळेचे रूप पालटवण्यासदेखील त्याची मदत होत आहे. गावकऱ्यांनी दिलेल्या आर्थिक सहभागामुळे ते जातीने शाळेतील विविध उपक्रमात सहभागी होत आहेत. शाळेची हजेरी व पटसंख्या वाढीसाठी याची मदत होत आहे.

### राज्यस्तरावर डिजिटल शाळा उपक्रम

हर्षलच्या या उपक्रमाची नोंद राज्याचे शिक्षण विभागाने घेतली आहे. प्रेरणा सभांच्या माध्यमातून हा उपक्रम राज्यभर पोहोचवावा असे निर्देश शिक्षण विभागाने दिले. हर्षलने २२ जिल्ह्यांमध्ये ३६ प्रेरणा सभाद्वारे जि.प.शिक्षक आणि ग्रामसेवकांना संबोधित केले आहे. त्यांच्या प्रेरणा सभांना हजारोच्या संख्येने शिक्षक व ग्रामसेवक उपस्थित राहत असून लोकसहभाग, शिक्षक सहभाग आणि ग्रामसेवकाच्या माध्यमातून शाळा डिजिटल होण्यास राज्यभरात गती मिळाली आहे.

धुळे, गोंदिया, हिंगोली आणि ठाणे या जिल्ह्यामधील सर्व जि.प.शाळामध्ये डिजिटल वर्ग १०० टक्के पूर्ण झाले आहेत. डिजिटल शाळा उपक्रमात पिछाडीवर असलेले चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, बीड, बुलडाण्यासारखे अनेक जिल्हे प्रेरणा सभेनंतर आता १०० टक्के डिजिटल होण्याच्या मार्गावर आहेत. या सभांमुळे शिक्षकांचे डिजिटल वर्गासाठी लागणाऱ्या खर्चाबद्दलचे गैरसमज दूर झाले आहेत. गटविकास अधिकारी आणि ग्रामसेवकांना दिलेल्या सूचनांमुळे ग्रामपंचायती डिजिटल वर्गाच्या उपक्रमाला प्राधान्य देत आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषदांच्या शाळा १०० टक्के डिजिटल होण्याच्या मार्गावर आहेत.

**– वर्षा फडके,**
विभागीय संपर्क अधिकारी

## स्मार्ट शाळा

**सध्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सुरू असलेल्या 'प्रेरणा सभां'मधून शाळांना 'डिजिटल' करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यातूनच धुळे, गोंदिया, हिंगोली, ठाणे या चार जिल्ह्यांतील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आता डिजिटल शाळा झाल्या आहेत. ग्रामस्थ आणि शिक्षकांनी एकत्र येऊन घेतलेल्या प्रेरणा सभांचे हे फलित आहे. गावातील शिक्षकांपासून ते गावातील लोकांना डिजिटल शाळेचे महत्त्व प्रेरणा सभेच्या माध्यमातून पटवून दिले जाते. या सभेत लोकांना आणि विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमाचे महत्त्व, शाळा डिजिटल होण्याचे फायदे सोप्या भाषेत समजावून सांगण्यात येते. डिजिटल शाळा म्हणजे काय, याचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले. डिजिटल वर्ग बनवण्यासाठी गावकऱ्यांकडून देणगी अगदी पाच रुपयांपासूनही देण्याचे आवाहन केले. सर्व गावकरी आनंदाने आणि सढळ हस्ते मदत करतात.**

**राज्यातील ६७ हजार जिल्हा परिषद शाळांपैकी ५८ हजार शाळा डिजिटल झाल्या आहेत. त्यामुळे डिजिटल शाळा केल्याने मुलांचा सर्वांगीण विकासास हातभार लागत आहे. मुलांचा अभ्यास हसतखेळत होत आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून उपस्थितीतसुद्धा फरक पडला आहे. गावातील इंग्रजी माध्यमातील  शाळेचे विद्यार्थी आता जिल्हा परिषदेच्या डिजिटल शाळेत प्रवेश घेत आहेत.**




**गावे डिजिटल करण्यापेक्षा शाळा डिजिटल करण्यावर भर देण्यात येत आहे. डिजिटल अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांची कौशल्ये वाढण्यास मदत होत आहे. पुस्तकातील धडे त्यांना थेट पडद्यावर चित्रे, चित्रफितींच्या माध्यमातून दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शाळेत यायचे प्रमाण वाढण्याबरोबरच शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवादही आहे.**



जळगाव शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असणारे उजाड कुसुंबे हे साधारण १२०० लोकवस्तीचे गाव. आजपर्यंत अंधारात असलेली ही लोकवस्ती व या गावाचे लोक प्रकाशापासून दूर होते. परंतु जिल्हा नियोजन समितीच्या विकास निधीतून येथे वीज आली, यंदाच्या स्वातंत्र्यदिनी तब्बल ७० वर्षांनी ही लोकवस्ती प्रकाशमान झाली.

# गाव उजळले...



## कथा : उजाडकुसुंबे गावाची

**शासन आणि महावितरणाच्या अथक प्रयत्नाने स्वातंत्र्यानंतर तब्बल ७० वर्षांनी उजाडकुसुंबे गावात वीज आली आणि हे गाव विजेच्या प्रकाशात चमकू लागले. आता या गावात सतत वीज पुरवठा होत असल्याने या गावातील लोकांना याचा लाभ होत असून कृषी क्षेत्रात विजेच्या उपलब्धतेमुळे त्यांच्या आर्थिक व्यवहारात वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.**

राज्यातील प्रत्येक गावात वीज पोहोचली पाहिजे यास राज्य शासनामार्फत प्राधान्य देण्यात येत आहे. यासाठी शासन व प्रशासकीय पातळीवर सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

उजाडकुसुंबे गावातील सर्व रहिवासी स्वत:च्या व आपल्या कुटुंबाच्या उदनिर्वाहासाठी मजुरी, बिगारी, गवंडी इतर कामे करतात. या गावातील लोकांजवळ शेती नाही त्यामुळे त्यांना मजुरी करावी लागते. प्रामुख्याने या गावात आदिवासी समाज आढळतो. त्यात तडवी, भिल्ल, पावरा हा समाज आहे.

गेल्या ७० वर्षापासून या गावात हे लोक विजेपासून वंचित आहेत. उजाडकुसुंबे या गावात वीज नसल्याने या गावातील लहानथोरांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागत होते. जिल्हा नियोजन समितीच्या विकास निधीतून या वस्तीसाठी अडीच किलोमीटर वीज वाहिनी उभारून १०० केव्हीएचे वितरण रोहित्र बसवण्यात आले. या रोहित्रामुळे ३०० ते ३५० कुटुंबाना वीज सुविधेचा लाभ मिळत आहे. गावात या पूर्वी वीज आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तो यशस्वी झाला नव्हता. मात्र जिल्हा प्रशासनाच्या अथक प्रयत्नामुळे या गावात अखेर वीज आली.

गावात वीज आल्याने नागरिकांनी शासन व महावितरणाचे आभार मानून गावात आनंदोत्सव साजरा केला. गावात वीज नसल्याने आम्ही पारतंत्र्यात होतो, पण स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी गावात वीज येऊन आमच्या समस्यांपासून आम्हाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले, अशा अर्थाच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.

### वीज आली, दिवाळी आली

'गेल्या कित्येक वर्षापासून या गावात वीज नसल्याने हे गाव आहे असे वाटतच नव्हते. फक्त दिवसाच अभ्यास आम्ही करू शकत होतो. अंधार झाल्यावर जणू सर्व कामे थांबून जात होती. वीज नसल्याने आमचे गाव हे अनेक सुविधांपासून वंचित होते. परंतु आता वीज आल्याने गावात दिवाळी आल्यासारखे वाटत आहे. या विजेमुळे आता केव्हाही अभ्यास करता येतो.'

**– फिरोज तडवी**
**(महाविद्यालयीन विद्यार्थी)**

### भीती संपली

'आधी वीज नसल्याने रात्री बाहेर जायला भीती वाटायची. गावात वीज आल्याने आम्हाला खूप आनंद झाला. माझ्या मामाच्या गावाला वीज असल्याने आम्ही तिकडे जायचो, पण आमच्याकडे वीज नसल्याने ते आमच्या गावी यायचे नाहीत. पण आता वीज आल्याने ते इकडे येऊ लागले आहेत.'

**– नसीम तडवी**
**(प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी)**

### सण साजरे

गेल्या ७० वर्षांपासून या गावात वीज नव्हती. त्यामुळे हे गाव अनेक सुविधांपासून वंचित होते. येथे उत्सवसुद्धा साजरे करता येत नव्हते. परंतु वीज आल्याने या गावात या वर्षापासून हे सण साजरे व्हायला सुरुवात झाली. वीज आल्याने या गावात ग्रामस्थांना पाण्याची व्यवस्था, नळजोडणी, चक्की इत्यादी सुविधांचा लाभ घेता येतो.

**– वत्सलाबाई शेनपडू कोळी (सरपंच)**

### बॅन्ड लावून स्वागत

अनेक वर्षांपासून या गावाने विजेसाठी मागणी केली होती. पण मागणी होऊनही वीज न आल्याने गाव हताश झाले होते. परंतु शासनाने या गावात वीज पोहोचवल्यामुळे गावातील लोकांना खूप आनंद झाला. गावातील लोकांनी बॅन्ड लावून वीज आल्याचे स्वागत केले.

**– वनराज पाटील (तलाठी)**

कथा परिवर्तनाची

**– विलास बोडके,**
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

# तमाच्या तळाशी दिवे लागले


मेळघाटातील प्रकाशमान गाव.

**सातपुड्याच्या** डोंगररांगात वसलेली मेळघाटातील छोटी- छोटी खेडी. अत्यंत निसर्गसुंदर; पण नागरीकरणापासून दूर असलेली. शहरासारख्या चकचकीत सुविधा जाऊ द्या; विजेसारखी मूलभूत सुविधाही तेथे पोहोचली नव्हती. स्वातंत्र्य मिळाल्यापासून तो आताआतापर्यंत येथील घरांनी रात्री विजेचा दिव्याचा उजेड पाहिला नाही. ही गोष्ट अस्वस्थ करणारी होती. येथील गावकऱ्यांकडून वर्षानुवर्षे होत असलेल्या मागणीबाबत भौगोलिक कारणांमुळे कार्यवाही होऊ शकली नव्हती.

मेळघाटातील विजेचा प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाकडून हालचाली सुरू होत्या. वीजपुरवठ्याच्या कामातील मुख्य अडचण होती ती या परिसराच्या भौगोलिक उंचीची. मेळघाटचा परिसर हा अमरावती जिल्ह्यातील लगतच्या भागापासून उंचावर असल्याने वीजवाहिन्यांद्वारे वीजपुरवठा करण्यास अडचण होती. त्यावर तोडगा म्हणून शेजारच्या मध्यप्रदेश राज्यातून वीज आणण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावर तत्काळ कार्यवाहीही सुरू झाली. शासन स्तरावरून मध्यप्रदेश शासनाच्या सहकार्याने कार्यवाहीला आरंभ झाला. महापारेषणच्या व जिल्हा प्रशासनातील अनेक अधिकारी-कर्मचारी यांनी मेळघाटातील वीजपुरवठा सुरळीत करण्याकरिता प्रयत्न सुरू केले.

मध्यप्रदेश राज्यातून १३२ किलो व्होल्टच्या वीजवाहिनीचे काम घेण्यात आले. वीज नसणाऱ्या गावांना वीज उपलब्ध करून देणे, वीज असूनही पुरेसा पुरवठा नसणाऱ्या गावांना पुरेशी वीज पुरवणे असे हेतू यामागे होते. मेळघाटातील अंधारात असलेली अनेक गावे प्रकाशमान करणारी, त्यांना नियमित वीज पुरवठा करणारी ही योजना प्रशासनाने गतीने राबवली. त्यामुळे कित्येक वर्षांपासून वीज नसल्यामुळे सातत्याने अंधारात असलेल्या मेळघाटातील १६३ गावांमध्ये चोवीस तास वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

मेळघाटातील भौगोलिक परिस्थितीमुळे या गावांमध्ये सुरळीत वीज पुरवठा करणे शक्य होत नव्हते. ती अडचण या वीजवाहिनी योजनेने दूर केली.

धारणी हे मेळघाटातील तालुक्याचे ठिकाण. तेथे १३२ केव्ही विजेचे उपकेंद्राची योजना होती. या उपकेंद्राला वीज पुरवठा करण्याकरिता लागणारी १३२ केव्हीच्या वीजवाहिनीची गरज होती. त्यामुळे ६० किलोमीटर लांबीची वाहिनी टाकण्यात आली. मध्यप्रदेशातील नेपानगर ते महाराष्ट्रातील धारणी अशी आंतरराज्यीय एकल परिपथ वीज वाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले. त्यामुळे मेळघाटातील १६३ गावे

प्रकाशाने उजळून निघाली.

मेळघाटच्या विकासाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प ठरला. धारणी तालुक्यातील या १६३ गावातील ११ हजारांहून अधिक घरगुती वीज ग्राहकांना आता २४ तास वीजपुरवठा शक्य झाला. शासनाच्या कृषी पंपांना वीज देण्याच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य झाले. येथील शेतकऱ्यांच्या ३१८१ कृषी पंपाना वीज उपलब्ध होऊ शकली. या वीजवाहिनीमुळे धारणीचे १३२ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित झाल्याने धारणी परिसरातील विकासाला गती मिळत आहे.

गेल्या कित्येक वर्षांपासून अंधारात जीवन जगणाऱ्या धारणी तालुक्यातील १६३ गावांमधील नागरिकांना वीज मिळाल्याने 'दिवे लागले रे दिवे लागले, तमाच्या तळाशी दिवे लागले' अशी अनुभूती येणे स्वाभाविकच होते. येथील जीवन खऱ्या अर्थाने प्रकाशमय झाल्याची भावना या परिसरातील गावकरी व्यक्त करत आहेत.

प्रकाशाची ही वाटचाल येथेच थांबलेली नाही. प्रशासनाकडून मेळघाटातील विजेच्या मुबलकतेसाठी जोरदार प्रयत्न होत आहेत. केवळ पारंपरिकच नव्हे तर अपारंपरिक पद्धतीने वीजनिर्मिती व विद्युतीकरणाच्या योजना अमलात येत आहेत. मेळघाटातील गावांत पारंपरिक व अपारंपरिक पद्धतीने विद्युतीकरण करण्यात येत आहे. त्यासाठी महावितरण व महाऊर्जा अभिकरण (मेडा) यांच्याकडून प्रस्ताव मागवण्यात आला आहे. निसर्गाचे वरदान असलेल्या या अरण्यमय प्रदेशात अपारंपरिक ऊर्जानिर्मितीतून विजेचा प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.

**– हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती

## प्रकाशमान महाराष्ट्र


- कोळशाचे दर १४ टक्क्यांनी वाढले, ग्रीन एनर्जी सेस २१० रुपये प्रतिमेट्रीक टन वाढ, रेल्वेभाडे ६ टक्क्यांनी वाढ, टर्मिनल दर ११० रुपये मेट्रिक टन वाढ तरीही अस्थिर आकार २.८५ रुपये हून २.६४ रुपये असा २१ पैसे कमी (एकूण बचत : ८०२ कोटी)
- **वीजदर –** २०१४-१५ : ४.०८१ रुपये प्रतियुनिट, २०१५-१६ : ४.०५६ रुपये प्रतियुनिट, २०१६-१७ : ३.७५१ रुपये प्रतियुनिट.
- **अतिरिक्त स्थापित क्षमता** – २०१४-१५ : सौर ऊर्जा ५० मेगावॅट, २०१५-१६ : औष्णिक ६६० मेगावॅट, २०१६-१७ : औष्णिक २५७० मेगावॅट.
- **भारनियमनमुक्त महाराष्ट्र** – वीजमागणीतील फरक २०१४ च्या उणे ४२० वरून आता अधिक ९६४ वर आणला.
- **वीज खरेदी खर्च** – २०१४ मध्ये प्रतियुनिट वीज खरेदीखर्च ४.३६ रुपयांवरून आता ४.०३ रुपये कमी केला.
- महानिर्मितीच्या कर्जांची फेररचना करण्यात आल्यामुळे पहिल्याच वर्षी ७४४ कोटी रुपयांची बचत
- विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील ड आणि ड+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना सवलतीपोटी ८६३.२१ कोटी वितरित, १,८८,८६८ ग्राहकांना लाभ

**सुविधांची उपलब्धता**

| वर्गवारी | ऑक्टो २०१४ पर्यंत | ऑगस्ट २०१७ पर्यंत |
|---|---|---|
| नवीन अतिउच्चदाब उपकेंद्र | ५९८ | ६५६ |
| उपकेंद्रांमध्ये क्षमता | १,०४,१३७ | १,२०,०३६ |
| अतिउच्चदाब वाहिन्या | ४०,७२८ | ४५,३८६ |
| मोनोपॉल मनोरे | ० | २६ |

### सुविधेत भर

- मुंबईतील वीजप्रणालीचे सक्षमीकरण: ४० वर्ष जुन्या २२० केव्ही



खारघर-कळवा-बोरीवली-बोईसर दुहेरी वाहिनीचे रूपांतर करून क्षमतावाढ केल्याने मुंबईसाठी ९९० मेवॅ जास्तीचा वीजपुरवठा शक्य झाला.

- अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथे १३२ केव्ही धारणी उपकेंद्र तसेच नेपानगर (मध्यप्रदेश) ते धारणी (महाराष्ट्र) अशी ६० कि.मीची आंतरराज्य वाहिनी उभारण्यात आली.
- मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला आता दुप्पट.
- औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी देशातील पहिला पथदर्शी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कोराडीत. **क्षमता :** १३० एमएलडी, १८० कोटी रुपये खर्च.

१३० एमएलडी पाण्याच्या बचतीमुळे ८ लाख लोकांसाठी पिण्याचे पाणी वाचले, नागपूर महापालिकेला १५ कोटी रुपये प्रतिवर्ष उत्पन्न.

- **पं. दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेत २१६४ कोटी रुपये मंजूर, विविध कामे प्रगतिपथावर**
- महाराष्ट्रात २.१४ कोटी एलईडी बल्ब वितरित
- एलईडी बल्बची किंमत १०० रुपयांवरून ७० रुपये

### ऊर्जासंवर्धन धोरण

- ५ वर्षांत १००० मेगावॅट ऊर्जा बचत म्हणजेच ५ हजार कोटींच्या बचतीचे ध्येय
- १४,४०० मेगावॅट क्षमतेचे नवीन प्रकल्प अपारंपारिक स्रोतांपासून उभारण्याचा संकल्प

सध्याच्या या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. सायबर सुरक्षा तसेच सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी राज्य शासनाने तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर केला आहे.

# घाबरू नका, सुरक्षित राहा..

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

## कथा : सायबर सुरक्षेची

संदेशाची देवाणघेवाण करण्यासाठी फेसबुक, व्हॉटसॲप, ट्विटर अशा अनेक माध्यमांचा वापर वाढतो आहे. या साधनांद्वारे फसवणुकीचे, बदनामीकारक मजकूर पसरवणे, बनावट खाते काढून अश्लील, धमकीयुक्त संदेश पाठवणे तसेच मानसिकरीत्या त्रास देण्याचे प्रमाण मोठे आहे. एकत्रित ग्रुप तयार करून, दोन्ही समाजात द्वेष पसरेल किंवा हिंसक वातावरण तयार होईल असे संदेशही समाजकंटकांकडून पसरवले जातात. याबाबत कारवाई करताना आयटी ॲक्टनुसार माहिती तंत्रज्ञान अधिनियम२०००च्या कलमप्रमाणे गुन्हे दाखल करून, त्या प्रकरणांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. नाशिक, सांगली येथील सायबर विभागाच्या पोलिसांनी घटनेच्या मुळाशी जाऊन तपास करत फिर्यादींना न्याय देण्यासाठी प्रयत्न केला आहे. अनेकदा बनावट अकाऊंट, आयपी ॲड्रेस त्यासबंधी गुन्ह्यांच्या तपासासाठी; परदेशी समाज माध्यमांशी आणि तेथील कार्यालयाशी संपर्क साधून, माहिती मिळवत सखोल तपासासह पोलिसांनी कठोर कारवाई केली. या गुन्ह्यांतील घटनांत तरुणांचा सहभाग असल्याचे आढळून आल्याने या घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ कार्यवाही करण्यात आली आहे.



### ऑनलाइन फसवणुकीस प्रतिबंध

सध्या डिजिटल व्यवहारांना उत्तेजन दिल्याने ई-कॉमर्स या नव्या संकल्पनेचा वापर वाढला आहे. ऑनलाइन खरेदीचे प्रमाणही वाढल्याचे दिसून येते. या सेवा पुरवणाऱ्या अनेक संस्था देशात कार्यरत आहेत. त्याचबरोबर मोठ्या रक्कमेचे विजेते झालात असे सांगून फसवणुकीच्या घटना घडत आहेत.

बँकेतून बोलतोय असे भासवत एटीएम पिन घेणे, एटीएम पासवर्ड व इतर माहिती चोरत त्याचा गैरवापर केला जातो. तसेच लॅपटॉप व मॅग्नेटिक स्ट्रीप्स रायटर मशिनच्या साहाय्याने एटीएम कार्डच्या पाठीमागील मॅग्नेटिक स्ट्रीप्सवर अदृश्य स्वरूपात प्रिंट करून, खोटा इलेक्ट्रॉनिक दस्तवेज बनवून त्याचा वापर करत; लोकांच्या बँक खात्यातील लाखो रुपयांची अफरातफर केली जाते. अशा पद्धतीच्या गुन्ह्यांचा तपास औरंगाबाद, नवी मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यातील पोलिसांनी हिरिरीने केला आहे. गुन्हेगारांना अटक करत सायबर कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

### आधुनिक तंत्राचा वापर

राज्यात मोबाईल फॉरेन्सिक प्रयोगशाळा तसेच ४५ मोबाइल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट्स सुरू करण्यात आले आहेत. तसेच गुन्हासिद्धतेच्या प्रमाणात वाढ होण्याच्या उद्देशाने ४५ फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक पथकांची (Mobile Forensic Support Unit ) ची स्थापना केली आहे. हे Mobile Forensic Support Units राज्यातील ३५ जिल्हे व नऊ पोलीस आयुक्तालयांमध्ये कार्यरत राहतील. एका युनिटमध्ये एक न्यायवैद्यक तज्ज्ञ (सहायक रासायनिक विश्लेषक), एक फिंगरप्रिंट तज्ज्ञ, एक छायाचित्रकार, एक मदतनीस, एक वाहनचालक असे अधिकारी आणि कर्मचारी वर्गाचा पथकामध्ये समावेश आहे. गुन्हासिद्धतेच्या दृष्टिकोनातून उपयोगी पडू शकणाऱ्या घटनास्थळावरून भौतिक पुरावे गोळा करण्यासाठी या युनिटमध्ये गुन्ह्यांच्या जागांच्या तपासणीसाठी आवश्यक असलेली शास्त्रीय साधने व इतर साधनसामुग्री यांचा समावेश आहे. त्यांचा उपयोग करून प्रथमदर्शी चाचण्या केल्या जातील. या चाचण्यांचा तपास यंत्रणांकरिता पुढील तपासासाठी प्रभावी उपयोग होईल. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रयत्न होत असताना या प्रकारच्या घटनेत तपासासाठी, आधुनिक तंत्राचा वापर सायबर पोलिसांनी सुरू केला आहे. गुन्हेगाराकडील साधने जप्त करत फोरेन्सिक तज्ज्ञांच्या साहाय्याने सीडीआर तपासतंत्राचा वापर करत गुन्ह्यांच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न होतो आहे.

### सामूहिक प्रयत्नांची गरज

सायबर गुन्हे हे समाज जागृत नसल्यामुळे होत असतात. एकदा का समाजामध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता आली तर सायबर सुरक्षित समाजाची रचना होऊ शकते. प्रत्येक एका घरात, कुटुंबात सायबर सुरक्षिततेबाबत माहिती जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली तर सायबर गुन्ह्यांपासून आपण वाचू शकतो तसेच सायबर गुन्हे आपल्याबाबतीत घडू नयेत म्हणून दक्ष राहू शकतो. आपण ते संपूर्णपणे टाळू शकतो. आता आपण सायबर सुरक्षित माणसांची साखळी निर्माण होईल, याकडे लक्ष द्यायला हवे कारण ही साखळीच तुम्हाला, मला आणि समाजाला सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी मदत करेल. घाबरू नका परंतु सुरक्षित राहा.

**– सचिन पाटील**




## सायबर सज्जता

**राज्यात** वाढलेल्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता देशातील पहिला महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प राबवण्यात आहे. या प्रकल्पांतर्गत पुढील पाच वर्षांमध्ये सायबर गुन्हे तसेच सर्व गुन्ह्यांची यशस्वीपणे उकल करण्यासाठी राज्य पोलीस यंत्रणा सुसज्ज करण्यात येत आहे.

राज्यातील सायबर गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख करणे याकरिता विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर), यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. याकरिता आवश्यक ते मनुष्यबळ व तांत्रिक मदत पुरवण्यात येत आहे.

राज्यातील संकेतस्थळे व त्याचप्रमाणे शासनाची शैक्षणिक, सामाजिक, वाणिज्यिक व आर्थिक संस्थांचा इंटरनेटवरील/संकेतस्थळांवरील अभिलेख सुरक्षित ठेवणे, सायबर गुन्ह्यांना प्रतिबंध करणे, सायबर जगतातील घटनांना योग्य तो प्रतिसाद देणे, जनतेमध्ये सायबर गुन्ह्यासंदर्भाने जनजागृती करणे याकरिता सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत राज्यस्तरावर सर्ट-महाराष्ट्र (MH-CERT) ची उभारणी करण्यात येत आहे. त्याकरिता सर्ट इंडियाची मदत घेण्यात येत आहे.

रॅन्समवेअरसारख्या व्हायरसचा मुकाबला करण्यासाठी यापूर्वी हेल्पलाइन करण्यात आली होती. त्याद्वारे नागरिकांना मदत पुरवण्यात आली होती. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर अशा प्रकारचा हल्ला टाळण्यासाठी मदत होईल. या प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालये व पोलीस आयुक्तालये येथे एकूण ४७ सायबर लॅब स्थापन करण्यात आल्या आहेत. सायबर गुन्ह्यांची दखल घेता यावी व तपासाला गती मिळावी, यासाठी संबंधित जिल्ह्यातील/आयुक्तालयातील सायबर लॅबना सायबर पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे. या पोलीस ठाण्यांना तपासासाठी आधुनिक हार्डवेअर व सॉफ्टवेअर फॉरेन्सिक टूल्स पुरवण्यात येत आहेत. येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सी डॅक मार्फत सायबर गुन्हे तपासणीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत १३८ अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. याशिवाय या सायबर लॅबना पुरवण्यात आलेल्या हार्डवेअर व सॉफ्टवेअर फॉरेन्सिक टूल्स वापरण्याचे व्हेंडर्स प्रशिक्षण सायबर लॅबमध्ये कार्यरत पोलिसांना देण्यात आले आहे.




## इको बटालियन

**टेकड्यांचे** हरितीकरण, कालवे, शेतीचे बांध यासह वन आणि वनेतर जमिनीवर मोठ्याप्रमाणात वृक्षारोपण केले जाणार असून मराठवाड्यातील वनाच्छादन वाढण्यासाठी १४८ निवृत्त सैनिकांची इको बटालियनची स्थापना औरंगाबाद येथे करण्यात आली आहे. ही भारतीय सेनेंतर्गत काम करणारी बटालियन आहे. मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांमध्ये एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तुलनेत फक्त ४.८२ टक्के क्षेत्र वनाखाली आहे. त्यामुळे मागील काही वर्षात तिथे पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष जाणवत आहे. १९८२ पासून आतापर्यंत विविध राज्यात जसे उत्तराखंड, जम्मू-काश्मीर, दिल्ली, राजस्थान, आसाम, हिमाचल प्रदेश अशा आठ ठिकाणी इको टास्क फोर्स बटालियन स्थापित करण्यात आल्या आहेत. आता मराठवाड्यात ही बटालियन वनाच्छादन वाढवण्याचे काम करेल. ही बटालियन दरवर्षी सर्वसाधारणपणे २०० हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपण व संगोपनाचे काम करेल. तीन वर्षानंतर वृक्षारोपण केलेल्या ठिकाणचा प्रकल्प ही बटालियन वन विभागाकडे हस्तांतरीत करेल. पहिल्या टप्प्यात वृक्ष लागवडीसाठी मौ. अब्दीमंडी, मिटमिटा, जटवाडा, जोगवाडा, माळीवाडा, मावसाळा, रसूलपुरा, शंकरपूरवाडी, खिर्डी येथील १६५५.९५ हेक्टर वनक्षेत्रावर वनीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

– **डॉ. सुरेखा मुळे**, विभागीय संपर्क अधिकारी

कथा परिवर्तनाची

# उद्योगांशी महामैत्री

**मेक** इन इंडियानंतर कौशल्य आणि उद्योजकता विभागाचे विविध उद्योगांशी सामंजस्य करार करण्यात आले. या कराराची अंमलबजावणी, उद्योजक यांना येणाऱ्या अडचणी, सद्य:परिस्थिती याबाबत अडचणी आल्यास त्या दूर करण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागामार्फत mahamaitree.sded@maharashtra.gov.in या नावाने एक स्वतंत्र ई-मेल आयडी सुरू करण्यात आला आहे.

महामैत्रीमुळे सामंजस्य कराराची अंमलबजाणी करणे सोपे होत आहे. मेक इन इंडियानंतर अर्थातच फेब्रुवारी २०१६ नंतर कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाने आतापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील ६१ हून अधिक सामंजस्य करार केले आहेत. यापैकी ५७ सामंजस्य करार कार्यान्वित करण्यात आले आहेत. आज वेगवेगळ्या उद्योगसमूहांशी जरी सामंजस्य करार करण्यात आले असले तरी काही वेगवेगळ्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महामैत्री महत्त्वाची भूमिका बजावत आहे. mahamaitree.sded@maharashtra.gov.in या ईमेल आयडीवर उद्योजक आपल्या समस्या, कल्पना मांडू शकतात.

राज्य शासन आणि खासगी क्षेत्रामधील संबंध आता अधिक दृढ होत आहेत. अशा वेळी कौशल्य विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या स्वतंत्र ई-मेल आयडी महामैत्रीमुळे उद्योजकांच्या अडचणी दूर करण्याचे काम संबंधित विभागाचे अधिकारी तत्काळ करतील. त्यामुळे उद्योजकांना येणाऱ्या अडचणी दूर होतील.




# बाईक अँब्युलन्स

**मुंबईसारख्या** प्रचंड वर्दळीच्या आणि मोठ्या प्रमाणात रहदारी असणाऱ्या शहरात आपत्कालीन आरोग्यसेवा पुरवण्यासाठीच्या 'बाईक अँब्युलन्स' प्रकल्प राबवण्यात येत आहे. या माध्यमातून जिथे मोठी अँब्युलन्स रहदारीमुळे आणि अरुंद रस्त्यांमुळे पोहोचू शकत नाही अशा ठिकाणी अडचणीत सापडलेल्या रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज असणाऱ्या बाईक अँब्युलन्सच्या मदतीने आरोग्यसेवा पुरवण्यात येत आहे. या प्रकल्पाला जनतेचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. सध्या ही सेवा प्रायोगिक स्तरावर मुंबईत सुरू करण्यात आलेली आहे. मुंबईत शहरातील १० वेगवेगळ्या ठिकाणी या बाईक अँब्युलन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यावर प्रशिक्षित डॉक्टर 'रायडर' म्हणून काम करत आहेत. त्यामुळे कुठल्याही प्रकारची वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती सांभाळण्यास ते पुरेसे सक्षम आहेत.






## कथा : आमळी गावाची

**आपण पैसे, रक्त, आय बँक अशी नावे ऐकलेली असतात. या बँकेच्या प्रकारात आणखी एका प्रकाराची भर पडली आहे. ही बँक आहे, शेतीसाठी लागणाऱ्या अवजारांची. साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील आमळीसारख्या दुर्गम आदिवासी भागातील शेतकरी भीमराव बारकू बोरसे यांची ही बँक परिसरातील शेतकऱ्यांची गरज भागवते. समूहशेतीचे हे एक उत्तम मॉडेल म्हणून पुढे आले आहे.**



# अभिनव अवजारे बँक

आमळी परिसर म्हणजे धुळे जिल्ह्याचे पश्चिमेकडील शेवटचे टोक होय. या भागात वर्षभरात सरासरी १ हजार मिलिमीटर एवढा पाऊस पडतो. पावसाळ्यात हा परिसर विलोभनीय व रम्य असा असतो. गावापासून जवळच अलालदरी आहे. पावसाळ्यात अलालदरीतून फेसाळत कोसळणारे धबधबे पाहणे हा एक अवर्णनीय आनंद आहे. या भागात मुख्य पीक म्हणजे भात व नागली होय. किंबहुना हा परिसर भातपिकासाठी धुळे जिल्ह्याचे आगरच होय. याशिवाय मका, सोयाबीन, ज्वारी, हरभरा, मसूर, वाटाणा आदी पिकेही शेतकरी घेऊ लागले आहेत. याच भागात काबऱ्याखडक, मालनगावसारखे मध्यम प्रकल्प आहेत. ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, असे शेतकरी गहू, ऊस या नगदी पिकांचे उत्पादन काढू लागले आहेत. तसेच वन्य प्राणी या गावात अधून- मधून हजेरी लावत असतात. आमळी गाव हे कन्हय्यालाल महाराज यांच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी कार्तिकी एकादशीला भव्य यात्रा भरते. यात्रेनिमित्त पाच ते सहा लाख भाविक दर्शनासाठी येत असतात.

### शेतकरी गट

अशा या आमळी गावात भीमराव बोरसे हे शेती करतात. त्यांच्याकडे २ हेक्टर ८२ आर एवढे क्षेत्र आहे. त्यांचे सातवीपर्यंत शिक्षण झाले आहे. मात्र, हे कमी झालेले शिक्षण त्यांच्या आधुनिक पद्धतीने शेती करण्यात कुठलाही अडथळा आणू शकले नाही. त्यांनी गावात अन्य शेतकरी व ग्रामस्थांचे सहकार्य घेत श्री कन्हय्यालाल महाराज पाणलोट ग्रामविकास संस्था व कन्हय्यालाल महाराज शेतकरी गटाची स्थापना केली आहे.

शेती अवजारे बँकेविषयी ते सांगतात, २००५ मध्ये 'बायफ'ने ६० रुपये किमतीचे कटर दिले होते. या कटरपासून प्रेरणा घेत एक-एक साहित्य जमवायला सुरुवात केली. आज ५० पेक्षा जास्त अवजारे असून त्यांची किंमत ६० रुपयांपासून सहा लाख रुपयांपर्यंत आहे. यात ट्रॅक्टर, बीबीएफ, सीड ड्रील, पलटी नांगर, सुपडी, कल्टिव्हेटर, फवारणी यंत्रे आदींचा समावेश आहे. सहा लाख रुपये किमतीच्या ट्रॅक्टरसाठी कृषी विभागाने १०० टक्के अनुदान दिले आहे. याशिवाय संजीवनी सीड्ससारख्या स्वयंसेवी संस्था मदत करतात.

शेती अवजारांची बँक तयार केल्यावर या बँकेचा अल्पभूधारक, सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ देण्यास श्री. बोरसे यांनी सुरुवात केली. या औजारांच्या वापराचे दर निश्चित करण्यात आले आहेत. कोळपणी यंत्र असेल, तर २० रुपये, ट्रॅक्टर असेल, तर २०० रुपये प्रतितास याप्रमाणे दर आकारले जातात. यातून जमा होणारे पैसे संस्थेच्या खात्यात जमा केले जातात. संस्थेच्या खात्यात जमा होणारे पैसे गरजू शेतकऱ्यांना अडीअडचणीच्या वेळेस तसेच पावसाळ्याच्या तोंडावर बी-बियाणे, खतांच्या खरेदीसाठी अल्प व्याजदराने दिले जातात. एवढेच नव्हे, तर वैद्यकीय उपचार, मुलांच्या शिक्षणासाठी या गंगाजळीचा वापर केला जातो. शेतीची आधुनिक अवजारे अल्पदरात वापरासाठी उपलब्ध होऊ लागल्याने शेती उत्पादनात वाढ झाली आहे. पूर्वी एकरी १० क्विंटल उत्पादन घेणारे शेतकरी आता ४० ते ५० क्विंटलपर्यंतचे उत्पादन घेऊ लागले आहेत. या अवजारांचा आमळी व परिसरातील ४५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात दोन पैसे शिल्लक राहतात.

कन्हय्यालाल पाणलोट संस्थेसह श्री. बोरसे यांनी महिला व पुरुष बचत गटांची स्थापना केली आहे. या बचत गटांच्या माध्यमातून प्रामुख्याने सेंद्रिय पद्धतीने पिकविल्या जाणाऱ्या तांदळाचे मार्केटिंग केले जाते. त्यामुळे आमळी येथील तांदळाला मागणी वाढली आहे. त्यासाठी व्यापारी आगाऊ नोंदणी करू लागले आहेत. इंद्रायणी, सह्याद्री, खुशबू, बासमती, भोवाडा, कमोद, गावरानी या भाताच्या वाणांना चांगली मागणी असल्याचे श्री. बोरसे आवर्जून नमूद करतात. बचत गटातील महिला सदस्य तांदळाचे ग्रेडिंग करून पाच किलोच्या पिशवीत तांदळाचे पॅकिंग करतात. त्यासाठी आवश्यक सामग्री महिला बचत गटाने खरेदी केली आहे. 'आत्मा' प्रकल्पांतर्गत कृषी विभागामार्फत पिशव्यांचा पुरवठा केला जातो.

### सेंद्रिय शेतीवर भर

श्री. बोरसे यांचा प्रारंभापासूनच आधुनिक



### अवजारे बँक

- **कटरपासून ट्रॅक्टरपर्यंत ५० पेक्षा जास्त अवजारे**
- **कृषी विभागाने दिले १०० टक्के अनुदान**
- **सुमारे ४५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना काम**
- **एकरी ४० ते ४५ क्विंटलपर्यंत शेतकरी घेतात उत्पन्न**
- **तांदळाचे होते पॅकिंग आणि मार्केटिंग**
- **सेंद्रिय शेतीवर भर**
- **नागली प्रक्रिया उद्योग**

शेती करताना सेंद्रिय शेतीवर भर राहिला आहे. रासायनिक खतांचा वापर न करता कमी खर्चात चांगल्या पद्धतीने शेती करता येते, असे श्री. बोरसे यांचे म्हणणे आहे. सेंद्रीय शेतीबाबत श्री. बोरसे यांना वडणे, ता. धुळे येथील कृषी भूषण पुरस्कार प्राप्त दिलीप रामदास पाटील यांच्याबरोबरच वसंत बोरसे, नामदेव नागरे यांचेही मार्गदर्शन लाभते. सेंद्रीय शेती करून तिचा प्रचार व प्रसार करणे, श्री (एक काडी) पद्धतीने भात लागवड करून उत्पादकता वाढवणे, देशी वाणांचे संवर्धन करणे, नैसर्गिक व सांस्कृतिक ठेवा जोपासणे, उत्पादीत सेंद्रिय भात, नागलीची प्रतवारी करून स्वत:चा ब्रॅण्ड तयार करून स्वतंत्र विक्री व्यवस्था उभी करण्यात येत असल्याचे श्री. बोरसे आवर्जून नमूद करतात. श्री. बोरसे यांनी शेतीत वेगवेगळे प्रयोग करण्यास सुरवात केली आहे. त्यासाठी त्यांनी आतापर्यंत देशातील ११ राज्यांचा दौरा केला आहे. बोरसे यांनी राबवलेले विविध प्रयोग पाहण्यासाठी देशभरातील शेकडो शेतकऱ्यांनी आमळीची वाट धरली आहे.

### अवजारे बँकेमुळे शेतीला लाभ

माझ्याकडे एकूण ६ एकर शेती आहे. शेती अवजारे बँकेतील अवजारे अल्पदरात पाहिजे तेव्हा उपलब्ध होतात. त्यामुळे शेतीच्या आधुनिकीकरणास लाभ झाला आहे. या अवजारांमुळेच वेळेवर शेतीची मशागत, पेरणी, कापणी आणि मळणी करता येते. यामुळे उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ झाली आहे. याशिवाय शासनाच्या कृषी विभागामार्फत गहू, हरभराचे बियाणे उपलबध  झाले आहे. आता शेतात उसाची लागवड करावयाची आहे.

**– वनाजी पुनाजी पवार,**
**शेतकरी, आमळी**

### तांदळाचे पॅकिंग, मार्केटिंग

महिलांनी एकत्रित येत लक्ष्मी बचत गटाची स्थापना केली आहे. या बचत गटाच्या सदस्या एकमेकांना सहकार्य करतात. नागलीचे वेफर्स तयार करून त्याची विक्री करतो. ६ वर्षांपासून तांदळाचे ग्रेडिंग करण्यापासून ते पॅकिंग करण्यापर्यंतची कामे करतो. आमच्या बचतगटांचे कार्य उत्कृष्टरीत्या सुरू आहे. नियमितपणे बैठकांचे आयोजन करून आगामी उपक्रमांचे नियोजन केले जाते.

**– नजूबाई बोरसे, अध्यक्षा;**
**लताबाई भीमराव बोरसे, सचिव,**
**लक्ष्मी महिला बचतगट**

### मुलगी चालवते ट्रॅक्टर

श्री. बोरसे यांची मुलगी हीना भीमराव बोरसे ही १८ वर्षीय तरुणी ट्रॅक्टर चालवते. पेरणीच्या दिवसांत महिलांना मदतीला घेत हीना पेरणी, लावणी, नांगरणीची कामे आटोपते. तिचे बारावीपर्यंतचे शिक्षण विसरवाडी, ता. नवापूर येथे झाले आहे. ट्रॅक्टर चालविताना अजिबात भीती वाटत नाही, असे ती आवर्जून नमूद करते. पाचवी ते सहावीपासून वडिलांनी आपल्याला ट्रॅक्टर चालवण्यास शिकविल्याचे हीना सांगते. बारावीनंतर शिक्षण घेण्याची हीनाची तयारी असून पुढील वर्षी ती पुढच्या वर्गात प्रवेश घेणार आहे.

श्री. बोरसे यांच्या अवजारे बँक व शेतीतील कार्याची दखल राज्य शासनाने घेतली आहे. त्यांना सेंद्रिय शेती कृषी भूषण पुरस्कार देऊन गौरवले आहे. श्री. बोरसे यांनी सुरू केलेल्या अवजारे बँकेचा आमळी परिसरातील दीडशेवर शेतकरी दरवर्षी लाभ घेत आहेत.

### नागली प्रक्रिया उद्योग

श्री. बोरसे यांनी 'आत्मा'च्या सहकार्याने कन्हय्यालाल फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी स्थापन केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून आमळी परिसरात सर्वाधिक उत्पादन घेतल्या जाणाऱ्या नागलीवर प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात येणार आहे.

**– रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, धुळे



दहीद येथील जिल्हा परिषदत शाळेतील विद्यार्थी वाचनानंदात मग्न.

कथा : दहीद गावाची

# माझी शाळा, माझा आनंद

**मुलांना शाळा आपली वाटावी, त्यांनी हसतखेळत शिकावे यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील दहीद (बु) (जि. बुलडाणा) येथील शाळेत विविध उपक्रम राबवले जात आहेत. ही शाळा जिल्हा परिषदेची आहे. शाळेत वाचन कट्टा सुरू करण्यात आला असून ग्रंथालय उभारले जात आहे. शाळेला डिजिटल करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी दर गुरुवारी २ रुपये तर शिक्षक महिन्याला शंभर रुपये जमा करीत आहेत. शाळेत प्रत्येक विद्यार्थी व शिक्षकाचा वाढदिवस साजरा केला जातो. केक, भेटवस्तू, खोली सजावट अशा आनंददायी वातावरणात हा कार्यक्रम पार पाडला जातो. स्वागतासाठी लागणारे पुष्पगुच्छ विद्यार्थी स्वत: तयार करतात. वाढदिवस असेल त्या दिवशी शाळेला एखाद्या घराचे स्वरूप प्राप्त होते. इतर शाळांनीही यातून प्रेरणा घेतली आहे.**

अलीकडे खासगी शाळेमध्ये मुलांच्या प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या पालकांसाठी जि.प. शाळांनी चांगला पर्याय उपलब्ध करून दिला आहे. प्रगत शैक्षणिक अभियान आणि लोकसहभागातून या शाळा डिजिटल होत आहेत. दहीद (बु) (जि. बुलडाणा) येथील ही जि.प. शाळा अशा नावीन्यपूर्ण शाळांपैकीच एक.

या जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेने मुख्याध्यापक विष्णू धंदर व गोकुळसिंग सिंगल, मोहन नायडू, अनुप्रिता व्याळेकर, अश्विनी वाघमारे व अन्य सहकारी शिक्षकांनी पुढाकार घेऊन शाळेत वाचन कट्टा सुरू केला. ग्रंथालय सुरू केले. यामध्ये विविध स्तरांतून नागरिक पुस्तकांची भर घालत आहेत. आतापर्यंत ५०० हून अधिक पुस्तकांची बँक शाळेत तयार झाली आहे. हे वाचनालय समृद्ध करण्यासाठी वाढदिवसाला प्रत्येक विद्यार्थी शाळेला पुस्तक भेट देतो. शिक्षकही आपल्याला जमेल तेवढी पुस्तके जमा करतात.

### तत्त्वतालिका

ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम,

ई-लर्निंगच्या माध्यमातून कठीण भागाचे रंजकतेतून अध्यापन, सेमी इंग्रजी माध्यमाला सुरुवात, वृक्षारोपणाचे महत्त्व व प्रत्यक्ष सहभाग, सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांच्या बक्षिसांच्या रकमेतून विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य, स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी, वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट, शैक्षणिक सहली, भौगोलिक क्षेत्रभेटी, ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा, विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन अशा विविध उपक्रमांची तत्त्वतालिका लावण्यात आली आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते. नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते.

### गुंडेवाडीच्या शाळेत वाचनालय

जालना शहरापासून पाच किमी अंतरावर वसलेल्या गुंडेवाडी या गावातील जि. प. प्राथमिक शाळेत सहशिक्षक संतोष मुसळे यांनी मुलांसाठी ग्रंथालय उभारले आहे.

जून २०१७ मध्ये समाज माध्यमांच्या माध्यमातून मुलांसाठी वाचनालय अशा प्रकारची पोस्ट शेअर करायला त्यांनी सुरुवात केली. चार महिन्यात त्यांना हिंतचिंतकांकडून एक हजार पुस्तके प्राप्त झाली. दुपारच्या दीर्घ मध्यांतरात तसेच शाळा सुटल्यानंतर सप्ताहात दोनदा मुलांना घरी सोबत पुस्तक देऊन, त्यांनी मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली. वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या विचार करण्याच्या व वागण्याच्या पद्धतीत सकारात्मक बदल दिसून आल्याचे श्री. मुसळे सांगतात. पुस्तकातील गोष्टींचा सभोवतालच्या घडामोडींशी संबंध जोडून पात्रांची नावे बदलून छोट्या गोष्टी लिहिण्याचा प्रयत्नदेखील मुले करू लागली आहेत.

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

दिवाळीच्या सुट्यादरम्यान प्रत्येक मुलाला किमान तीन ते चार पुस्तके घरी वाचायला दिली गेली. या वाचनातून पुस्तकातून मुलांना काय बोध झाला किंवा ती काय शिकली याबाबत चर्चा केली गेली. दर शनिवारी वाचनसाठी दोन तास राखीव ठेवण्यात आले आहेत.

**– राजाराम देवकर**

# शिक्षणक्षेत्रातील सिंधुदुर्ग पॅटर्न

शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने २०१५ साली प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र ही योजना सुरू केली. या योजनेंतर्गत कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनेक कार्यक्रम राबवले जात आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा सध्या शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत राज्यामध्ये आघाडीवर आहे.

जिल्ह्यामध्ये एकूण २१९ माध्यमिक शाळा आहेत. या पैकी २४ शाळांची निवड जिल्ह्यातील 'मदर स्कूल' म्हणून करण्यात आली आहे. १९४ शाळांमध्ये, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा हे अभियान राबवण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थी गळतीचे प्रमाण जवळ जवळ शून्य आहे.

याव्यतिरिक्त ४ शाळांमध्ये शिक्षकांसाठी आणि ४ शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती व्यवस्था आहे. ५५ शाळांमध्ये मुलांना स्पर्धा परिक्षांविषयी मार्गदर्शन केले जाते. १०० शाळांमध्ये पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा केंद्र आहे. पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन केंद्र असणाऱ्या शाळांची संख्या १०० आहे. विज्ञान विषयातील प्रत्येक संकल्पनेसाठी ई-लर्निंग/प्रात्यक्षिक/प्रयोगशाळा वापरणाऱ्या शाळांची संख्या २१९ आहे. जिल्ह्यातील १०० टक्के शाळांमध्ये म्हणजेच २१९ शाळांमध्ये सुसज्ज प्रयोगशाळा आहे.

गणित विषयातील संकल्पनेसाठी ई-लर्निंग/प्रात्यक्षिक/प्रयोगशाळा वापरणाऱ्या शाळांची संख्या १९४ आहे. दोन शाळांमध्ये गणित मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. सुसज्ज गणित प्रयोगशाळा असणाऱ्या शाळांची संख्या १०० इतकी आहे.

इंग्रजी विषयासाठी विशेष प्रयत्न जिल्ह्यातील शिक्षण विभाग घेत आहे. २४ शाळांनी स्पोकन इंग्लिशसाठी ई-लर्निंगचा वापर सुरू केला आहे. २४ शाळांमध्ये स्पोकन इंग्लिशसाठी तासिका भरवल्या जात आहेत. आतापर्यंत ३५ शाळांमध्ये इंग्लिश लँग्वेज लर्निंग क्लब (English language learning club) स्थापन करण्यात आला आहे. ब्रिटिश कौन्सिलमार्फत १९४ शाळांना मार्गदर्शन करण्यात येते.

जिल्ह्यातील शैक्षणिक ब्लॉग/संकेतस्थळ/ॲप्स/ व्हिडिओ तयार करणाऱ्या शिक्षकांची संख्या १८ आहे. शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करणारे शिक्षक आहेत २५०, तंत्रस्नेही प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांची संख्या आहे ४५. शिवाय १ ते ५ संगणक असलेल्या शाळांची संख्या आहे ९ आणि १९० शाळांमध्ये ६ ते १० संगणक उपलब्ध आहेत. तर १० पेक्षा जास्त संगणक असलेल्या शाळांची सख्या २० आहे. २०० शाळांमध्ये इंटरनेट कनेक्टीव्हिटी आहे. माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळा (आयसीटी लॅब) असलेल्या शाळा १८५ आहेत. जिल्ह्यातील १९४ शाळांनी अध्यापनात ज्ञानरचनावाद अवलंबला आहे. ११२ शाळा या डिजिटल आहेत. जिल्ह्यात १० वीचा निकाल ९१ ते ९९ टक्के असणाऱ्या शाळांची संख्या १२० असून, २५ शाळांचा निकाल हा १०० टक्के लागलेला आहे.

**– हेमंतकुमार चव्हाण,**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग

## कथा : नद्यांच्या पुनर्भरणाची

**भारतात ज्याप्रमाणे गंगा नदीचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रात पश्चिमवाहिनी नद्यांचे स्थान आहे. अशा नद्यांचे पुनर्भरण शासनाच्या 'हरित चळवळीच्या' माध्यमातून होणार आहे. नद्यांचे पुनर्भरण करण्यासाठी पूणे व सोलापूर जिल्ह्यांमधून वाहणाऱ्या भीमा चंद्रभागा नदीच्या किनारी दोन्ही बाजूने ५०० मी. अंतरावर रोपे लावण्याचे काम चालू पावसाळ्यापासून करण्यात येणार आहे.**

राज्यात २०१६ च्या पावसाळ्यात २ कोटी व २०१७ च्या पावसाळ्यात ४ कोटी रोपे लागवडीचे उद्दिष्ट असताना उद्दिष्टापेक्षा जास्तच म्हणजेच २०१६ मध्ये २ कोटी ८३ लाख व २०१७ मध्ये ५ कोटी १३ लाख रोपांची लागवड करण्यात आली. आता महाराष्ट्र शासनाचा वन विभाग व संपूर्ण राज्य शासन यंत्रणा पुढील दोन वर्षात ४६ कोटी रोपांची लागवड वन व वनेतर क्षेत्रात करणार आहेत म्हणजेच २०१७, २०१८ व २०१९ या वर्षात ५० कोटी रोपांची लागवड होणार आहे. ही लागवड करीत असताना स्थानिक प्रजातींची रोपे लावण्याचा भर देण्यात आलेला आहे.

निम, शिसव, वड, उंबर, पिंपळ, आवळा, बेहडा अशा स्थानिक प्रजाती वाढवून मग त्याची लागवड वनक्षेत्रात व वनेतर क्षेत्रात करण्यात येणार आहे.

राज्यातील वृक्षाच्छादन हे एकूण भूभागाच्या ३३ टक्के इतके करणे हे एक फार मोठे आव्हान आहे. सध्या आपल्या राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१ टक्के भाग हा वनाखाली आहे. त्यामुळे फक्त वनक्षेत्रात आणखी १२ टक्के वाढ करणे ही जवळजवळ अशक्यप्राय बाब आहे. त्यामुळे वन आणि वनेतर क्षेत्रात रोपे लागवड करून जमिनीवरचे वृक्षाच्छादन एकूण भूभागाच्या ३३ टक्क्यांपर्यंत वाढवणे हे तितकेच अवघड परंतु साध्य करता येण्याजोगे असे आव्हान आहे. सजीवांच्या जगण्यासाठी प्राणवायूची निर्मिती करणे तसेच वातावरणातील कर्बवायू कमी करणे ही दोन मोठी कामे वृक्ष करीत असतात. त्याचबरोबर जमिनीची धूप थांबणे तसेच पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवण्याचे कामही वृक्ष करतात. त्यामुळे वृक्षाच्छादनाचा उपयोग हा नवीन लावलेली रोपे जगवण्यासही होतो. रोपे लावण्यासाठी जागेची निवड सामान्यत: मोकळी जागा, धूप झालेली जमीन किंवा कमी प्रतीचे क्षेत्र पाहून केली जाते. परंतु त्याच वेळेला नदीच्या किनाऱ्यांची धूप थांबवण्याचे महत्त्व ओळखून वन विभागही येत्या वर्षापासून महत्त्वाच्या नद्यांच्या दोन्ही बाजूला सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत असलेल्या जमिनीवर रोपे लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम या ५० कोटी रोपे लागवडीच्या हरित चळवळी अंतर्गत करणार आहे. नदीच्या किनाऱ्याने रोपे लागवडीचे चार अत्यंत महत्त्वाचे

# हरित महाराष्ट्र देणार नद्यांना नवसंजीवनी



होय हे माझं सरकार

**कथा परिवर्तनाची**

फायदे आहेत.

- रोपांची मुळे व त्यासभोवतालची माती हे एखाद्या स्पंजप्रमाणे काम करून जास्त पाणी शोषून साठवून धरते. त्यामुळे नदीची पाणी संवर्धन करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढते.
- नदी किनारी असलेल्या वृक्षाच्छादनामुळे / वनांमुळे त्या परिसरात पावसाचे प्रमाण नक्कीच वाढते.
- नदी जेव्हा समुद्राला मिळते त्यापूर्वी नदी किनाऱ्याची वन / वृक्षाच्छादित जमीन त्या भागातील शेतातील रासायनिक खतांचा अंश शोषून घेतात त्यामुळे याचा निश्चितच उपयोग समुद्रातील सागरी जैवविविधतेचे संवर्धन होण्यासाठी होतो.
- नदीकिनारी असलेली वृक्षाच्छादित जमिनीची धूप थांबत असल्याने नदी पात्रात गाळ साठण्याचे प्रमाण अत्यंत कमी होते.

### नद्यांचे पुनर्भरण

नद्यांचे पुनर्भरण करण्यासाठी नदी किनारी रोपे लागवड करण्यासाठी पुणे व सोलापूर जिल्ह्यामधून वाहणाऱ्या भीमा-चंद्रभागा नदीच्या किनारी दोन्ही बाजूने ५०० मी. अंतरावर रोपे लावण्याचे काम चालू पावसाळ्यापासून करण्यात येणार आहे.

भारतात ज्याप्रमाणे गंगा नदीचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्रात पश्चिमवाहिनी नद्यांचे स्थान आहे व अशा नद्यांचे पुनर्भरण शासनाच्या 'हरित चळवळीच्या' माध्यमातून होणार आहे.

नदीचे पात्र, त्याच खोली व नदीची पाणी वाहण्याची क्षमता या सर्व बाबी पूर नियंत्रीत करण्यासाठी खूप मोठी कामगिरी बजावतात. मुंबई महानगराचे उदाहरण घ्यायचे झाल्यास मुंबईतील मिठी नदीमध्ये साचलेला गाळ, नदी पात्रातील तसेच नैसर्गिक ओढे, नाले, हंगामी नद्या यांच्या पूर क्षेत्रात झालेली अनधिकृत बांधकामे, अनेकदा नैसर्गिक जलमार्ग व जलसाठ्यांना नकाशामध्ये न दाखवताच त्या जागेत निरंतर होणारी बांधकामे; यामुळे जेव्हा अतिवृष्टी झाल्यावर पावसाच्या पाण्याचे वहन नाले अथवा नद्यामधून समुद्राकडे होत नाही तेव्हा, नदीपात्रांचे, हंगामी नाल्यांचे व जलसाठ्याचे महत्त्व आपणास कळून येते. वृक्षाच्छादन नसल्याने महाराष्ट्राच्या दक्षिण पूर्व भागात व मराठवाड्यात नद्यांची पाणी धारण करण्याची क्षमता कमी होऊन पावसाळ्यातील ठरावीक काही काळ वगळता; नदी पात्रे कोरडी पडलेली दिसतात. या दोन्ही बाबींवरून हे लक्षात येते की, नदीकिनाऱ्याने वृक्षाच्छादन असणे हे अत्यंत जरुरी आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर भिमा नदीच्या किनाऱ्याने दोन्ही बाजूच्या उपलब्ध क्षेत्रावर



नमामि चंद्रभागा प्रकल्प (जि. सोलापूर)

रोपे लागवड करावयाचे प्रस्तावित आहे. भिमा नदी कृष्णा नदीला मिळण्यापूर्वी महाराष्ट्रातून सुमारे ४५२ किमीचा प्रवास करते. पंढरपूरला चंद्रकोरीसारखी दिसणारी भिमा 'चंद्रभागा' म्हणून ओळखली जाते. पूण्याच्या खेड तालुक्यात भीमाशंकर रांगामध्ये उगम पावणारी ही नदी राजगुरूनगर, सिद्धेगव्हाण, हवेलीमधून प्रवास करत इंद्रायणीला मिळते व भिमा, इंद्रायणी व मुळा-मुठा ह्यांच्या परिसर येथील लोकसंख्येसाठी जीवनदायी आहे. चांदणी, कामिनी, बोरी, माण, नीरा या उपनद्या भिमेच्या सोलापूर जिल्ह्यातील भाग बनल्या आहेत. भिमा नदीचे एकूण जलग्रहण क्षेत्र (कॅचमेंट एरिया) सुमारे ७०,६१४ चौ.किमी आहे व ह्यातील ७५% भूभाग हा महाराष्ट्रात आहे.

भिमा नदीच्या परिसरात सुमारे १२.३३ दशलक्ष लोक राहतात. या नदीच्या परिसरात एकूण लहान - मोठी २२ धरणे आहेत. त्यामुळे भिमेचा हा परिसर भिमानदीच्या पुनर्भरणाने सुजलाम व सुफलाम करण्यासाठी नदी किनाऱ्याने होणाऱ्या रोपे लागवडीची हरित चळवळ महत्त्वाची आहे.

ग्रामस्तर / तालुकास्तर / जिल्हास्तरावर हयासाठी एक मोठी चळवळ उभी करणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्रातील भिमा नदीच्या ४५२ किमीच्या परिसरात दोन्ही बाजूला ५०० मीटर अंतराचा विचार केल्यास त्यात ८२१ गावातील सुमारे १ लाख ७ हजार हेक्टर खासगी जमीन व सुमारे ६९०० हेक्टर वनजमिनीचा समावेश होतो. त्यामुळे या नदी परिसरात बांबू व नजीकच्या वनक्षेत्रात स्थानिक प्रजातींची लागवड करून खासगी व शेतजमिनीवर उत्पादन देतील अशा फळझाडांची लागवड करण्यात येणार आहे. या भागातील एकूण उपलब्ध क्षेत्रापैकी सद्य:स्थितीत सुमारे ४० हजार हेक्टर जागा रोपे लागवडीसाठी उपलब्ध होऊ शकते. वेगवेगळया प्रजातीचा विचार करता सुमारे ४० ते ४५ लाख रोपे या क्षेत्रामध्ये लावता येणे शक्य होणार आहे. वृक्ष प्रजाती लावताना वड, उंबर, कडुनिंब, पिंपळ, चिंच, कदंब, यासारखी झाडे तर शेतीच्या बांधावर बांबू, हादगा, भेंडी, कडुनिंब त्याच्रपमाणे रस्त्याच्या दुतर्फा बकाण, भेंडी, पागारा, आकाशनीम यासारखी झाडे तर शेतकऱ्यांसाठी सिताफळ, आंबा, पेरू इत्यादी प्रजाती लावण्यात येणार आहेत. एकदंरीतच हरित चळवळीद्वारे महाराष्ट्रामध्ये ५० कोटी रोपेलागवडीची ही जनचळवळ वृक्षाच्छादन तर वाढवलेच, परंतु नदीच्या पुनर्भरणामध्येही त्यामुळे एक मोठी मदत करेल.

**- सुनील लिमये,** (भा.व.से.)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे



*'जब प्रेम के दीपक जलते हों*
*सपने जब सच में बदलते हों,*
*मन में हो मधुरता भावों की*
*जब लहके फसले चावों की,*
*उत्साह की आभा होती है*
*उस रोज दिवाली होती है ।'*

**माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी लिहिलेल्या या ओळी, मुंबईतील सह्याद्री राज्य अतिथिगृहात राज्याच्या कान्याकोपऱ्यांतून आलेल्या शेतकऱ्याने यंदाच्या दिवाळीत प्रत्यक्ष अनुभवल्या. निमित्त होते, देशाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि प्रामाणिक म्हणून नावाजल्या गेलेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना -२०१७ च्या पहिल्या टप्प्यात प्रातिनिधिक स्वरूपात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र वितरित करण्याच्या हृद्य समारंभाचे !**

# बळीराजा आनंदला...

राज्यातील सुमारे ८ लाख ४० हजार शेतकऱ्यांच्या आयुष्यात यंदाची नरकचतुर्दशीची पहाट एक वेगळीच उमेद आणि आशा घेऊन आली. एरवी अरबी समुद्राच्या लाटा झेलत रुबाबात उभी असलेली, राज्य अतिथींचे स्वागत करणारी सह्याद्री अतिथिगृहाची देखणी, गंभीर वास्तू एका ऐतिहासिक क्षणाची साक्षीदार होत होती. त्या प्रसन्न सकाळी या वास्तूत लगबग होती, ती राज्यभरातून आलेल्या, लाखोंच्या पोशिंद्या, कष्टाळू बळीराजाची. पार नंदुरबारच्या आदिवासी पाड्यातून ते अमरावती, सिंधुदुर्गपर्यंतचा शेतकरी, राज्याच्या प्रमुख पालकाच्या भूमिकेतून राज्यकारभार करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हस्ते सन्मान स्वीकारण्यासाठी उत्सुक व आनंदी चेहऱ्याने या ठिकाणी उपस्थित होता.

महसूल मंत्री चंद्रकांत पाटील, परिवहन मंत्री दिवाकर रावते, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार, सहकार मंत्री सुभाष देशमुख, मुख्य सचिव सुमित मल्लिक तसेच इतर मान्यवर या वेळी उपस्थित होते. सभागृहात शेतकऱ्यांना बसण्याची व्यवस्था थोडी मागच्या बाजूला आहे. हे लक्षात येताच चंद्रकांतदादा पाटील यांनी स्वत: शेतकरी बांधवांना पुढे येऊन बसण्याची विनंती करत उत्कृष्ट यजमानपदाची भूमिका निभावली.




**सह्याद्री अतिथिगृह येथे छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेतील कर्जमाफीसाठी पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहन मंत्री दिवाकर रावते, वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार.**

### कर्जमाफीचे धैर्य

मुख्यमंत्र्यांचे आगमन होताच या आपुलकीच्या सोहळ्याला सुरुवात झाली. आपल्या प्रास्ताविक भाषणात सहकार मंत्री श्री. देशमुख यांनी जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी राजाला स्वाभिमानाने उभे करण्याचा प्रयत्न कर्जमाफीच्या निर्णयातून घेण्यात आल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. परिवहन मंत्री श्री. रावते या वेळी म्हणाले, 'नैसर्गिक संकटाने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आधार वाटावा म्हणून कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. हा आनंदाचा क्षण असून देशातील सर्वात मोठी कर्जमाफी देण्याचे धैर्य राज्य शासनाने दाखवले आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे ज्याने दीड लाखापर्यंत कर्जमाफी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.'

### वीज पुरवठ्यासाठी १ हजार कोटी

वित्त मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, 'अर्थसंकल्पात शेती क्षेत्रासाठी तिपटीने वाढ करत ६३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. कृषी क्रांतीमध्ये महत्त्वाचा घटक असलेल्या वीज पुरवठ्यासाठी १ हजार ३९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. कर्जमाफी हा कृषी क्रांतीतील महत्त्वाचा टप्पा असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला आहे. शेवटचा शेतकरी कर्जमुक्त होण्याची वाटचाल सुरू असून त्याला शक्ती मिळावी, म्हणून शेतकरी बांधवांनी दीपावलीनिमित्त आशीर्वाद द्यावा.' सामाजिक न्याय विभागाचा एकही पैसा अन्यत्र वळवला गेला नाही, असे स्पष्ट करीत चांगल्या प्रश्नावर राजकारण न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

## दुष्काळमुक्ती

'आजचा दिवस इतिहासात सुवर्णाक्षराने नोंद करण्यासारखा आहे. शेतकरी बांधवाला सक्षम करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून राज्यातील अनेक गावातील दुष्काळ हटविण्यास मदत झाली आहे. अन्य राज्यांपेक्षा देशात महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे ज्याने शेतकरी बांधवांसाठी सरसकट कर्जमाफीचा निर्णय घेतला.' असे म्हणून महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.




## दिवस कर्तव्यपूर्तीचा

छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत मुख्यमंत्र्यांनी भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, 'आजचा दिवस हा महत्त्वाचा आणि कर्तव्यपूर्तीचा आहे. बळीराजावर आलेले संकट दूर करण्यासाठी कर्जमाफीचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नैसर्गिक संकटामुळे शेतीचा विकासदर उणे होता. उत्पादन घटले होते, यावर मात करण्यासाठी सुरुवातीची दोन वर्षे आम्ही शेतीत गुंतवणूक वाढवली. ही गुंतवणूक जवळपास तीन पटीने वाढवण्यात आली. त्यामुळे आज ज्या भागात काही उगवत नव्हते, तेथे फळबागांची लागवड झालेली आहे. आता शेतीचा विकास दर १२.५ टक्क्यांवर गेला असून त्याचे उत्पन्न ४० हजार कोटी रुपयांनी वाढले आहे. शेतीतील गुंतवणूक वाढल्यामुळे हे यश मिळू शकले.'

जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून २० लाख हेक्टर संरक्षित सिंचन निर्माण झाले आहे. शेतीच्या क्षेत्रात पुढील पाच वर्षे अशाच प्रकारे गुंतवणूक करत राहिलो तर उत्पादन दुप्पट होण्यास मदत होणार आहे. गेली अनेक वर्षे शेतकरी संस्थात्मक कर्जरचनेच्या बाहेर होते. त्यांना पुन्हा सावकाराकडे जावे लागू नये, यासाठी अशा शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्जरचनेत परत आणण्यात आले. कर्जमाफी करताना कर्जमुक्त शेतकरी या संकल्पनेच्या माध्यमातून, शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज परत करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे.' शेतीतील गुंतवणूक वाढवण्यावर भर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी स्पष्ट केले.

महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या कर्जमाफी संदर्भातील सुकाणू समितीचे अभिनंदन करीत मुख्यमंत्री म्हणाले, 'या समितीने चांगल्या पद्धतीने हे काम करून; शेतकऱ्यांशी चर्चा करीत त्यांच्या अडचणी दूर करून, कर्जमाफीसाठी प्रयत्न केले. वित्त, सहकार आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सहकार्यातून कर्जमाफी अंमलबजावणी करणे शक्य झाले. कर्जमाफीची रक्कम पात्र शेतकऱ्यांनाच मिळाली पाहिजे, यासाठी ऑनलाइन रजिस्ट्रेशनचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे एक कोटी शेतकऱ्यांचे केवळ दीड महिन्यात रजिस्ट्रेशन करण्यात आले.' कर्जमाफीची कार्यप्रणाली कशी असेल याबाबत सविस्तर सांगताना मुख्यमंत्री म्हणाले, 'या योजनेसाठी एक मुख्य खाते प्रत्येक बँकेत एक खाते उघडण्यात आले आहे. कर्जमाफीची रक्कम मुख्य खात्यातून बँकांच्या खात्यांमध्ये जमा होईल. त्यानंतर बँकांकडे दिलेल्या यादीनुसार त्यांनी पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करावी. पुढील चार दिवस दीपावलीनिमित्त सार्वजनिक सुटी असल्याने सोमवारपासून नियमितपणे रक्कम जमा होईल. तसा संदेश बँकांकडून शेतकऱ्यांना पाठवण्यात येईल. शेतकऱ्यांनी काळजी करू नये,' असा दिलासाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिला.

## प्रोत्साहन आणि प्रमाणपत्र

'ज्या शेतकरी बांधवांनी प्रतिकूल परिस्थितीतही कर्जाची परतफेड करीत रक्कम जमा केली त्यांना प्रोत्साहनपर रक्कम आणि प्रमाणपत्र देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. योजनेच्या अंमलबजाणीच्या पहिल्या टप्प्यात साडेआठ लाख खातेदार शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये ४००० कोटी रुपयांची रक्कम जमा करण्यात येत आहे. कर्जमाफीसाठीच्या ४ लाख ६२ हजार खातेदारांचे ३२०० कोटी रुपये असून; प्रोत्साहनपर रक्कम योजनेच्या ३ लाख ७८ हजार खातेदारांचे ८०० कोटी रुपये आहेत. १५ नोव्हेंबरपर्यंत ८५ टक्के काम पूर्ण करण्यात येणार आहे. ज्या अर्जामध्ये त्रुटी आढळल्या आहेत त्या दूर करण्यासाठी शेतकरी बांधवांना सांगण्यात येईल. त्यानंतर त्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल.

कर्जमाफीच्या निकषांत बसणारा शेवटचा शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत ही योजना सुरूच राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना दिला.

## शेतमालाला हमी भाव

'कर्जमाफी योजनेचा निर्णय घेण्यापूर्वी राजकीय पक्ष, संघटना, शेतकरी संघटना यांच्याशी चर्चा करण्यात आली. आपले सरकार पोर्टलवर अपलोड केलेली यादी ही ग्रामपंचायतनिहाय आहे. शेतीला शाश्वत करण्याबरोबर शेतमालाला हमी भाव मिळाला पाहिजे यासाठी शासन प्रयत्नशील आहे. राज्यभरात कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. या प्रत्येक केंद्रावर आधार क्रमांक आधारित नोंदणी करण्यात येणार असून, शेतकऱ्यांना त्यांचा माल विक्रीसाठी कधी आणायचा याबाबत कळविण्यात येणार आहे.'

होय हे माझं सरकार

कथा परिवर्तनाची

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ८ विभागातील कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शैला दिनेश कदम (कोल्हापूर), चंद्रकांत पाटील (वाडा), प्रमोद गमे (नागपूर) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्राच्या इतिहासात स्वच्छ आणि प्रामाणिक कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे नागपूर येथील शेतकरी श्री. गमे यांनी आभार मानले.

## पालकमंत्र्यांशी संवाद

राज्यस्तरीय सोहळ्याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्र्यांच्या हस्ते शेतकरी बांधवांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. राज्यस्तरीय सोहळ्यातून मुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून पालकमंत्र्यांशी संवाद साधला. सर्व पालकमंत्र्यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. दिवाळीच्या आनंददायी पर्वाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांच्या जीवनात हा आनंदाचा क्षण आणल्याबद्दल त्यांना शेतकरी वर्गाच्यावतीने धन्यवाद दिले. या वेळी मुख्यमंत्र्यांनी बुलडाणा येथे कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर, गोंदिया येथे सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, पालघर येथे आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, जालना येथे स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री बबनराव लोणीकर, लातूर येथे कामगार मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर, गडचिरोली येथे आदिवासी विकास राज्य मंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम, अमरावती येथे राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील, वाशीम येथे महसूल राज्यमंत्री संजय राठोड यांच्याशी संवाद साधला. त्याचबरोबर बीड, परभणी, अहमदनगर, धुळे, उस्मानाबाद, औरंगाबाद येथील जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आपले सरकार वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या यादीचे अनावरण करण्यात आले.

## आदरातिथ्य

एव्हाना दुपारचे अडीच वाजत आले होते. उपस्थित शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू तर मुख्यमंत्री, सर्व मंत्री व यंत्रणांच्या चेहऱ्यावर कर्तव्यपूर्तीचे समाधान होते. उपस्थित शेतकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. राज्याच्या कान्याकोपऱ्यांतून आलेल्या काही साध्या-भोळ्या शेतकऱ्यांनी जमिनीवरच ताट मांडून जेवणे पसंत केले. मुख्यमंत्री महोदय स्वत: सर्व शेतकऱ्यांची जातीने वास्तपुस्त करीत होते. एरव्ही प्रसंगी उपाशी राहून लोकांसाठी अन्नधान्य पिकवणाऱ्या त्या बळीराजाला मान देत पोटभर जेवायचा आग्रह मुख्यमंत्री स्वत: करीत होते.

अतिशय सकारात्मक ऊर्जा वातावरणात पसरली होती. हीच ऊर्जा घेऊन व बळीराजाला सुखी करण्याचा निश्चय करत एका ऐतिहासिक क्षणाची साक्षीदार होता आल्याचे समाधान घेऊन; ही दिवाळी अतिशय अनोख्या पद्धतीने साजरी झाली. शेवटी अटलबिहारी वाजपेयी यांच्याच कवितेचा आधार घेत म्हणावेसे वाटते-

***जब तन-मन-जीवन सज जाएं***
***सद्-भाव के बाजे बज जाएं,***
***महकाए ख़ुशबू ख़ुशियों की***
***मुस्काएं चंदनिया सुधियों की,***
***तृप्ति की आभा होती है***
***उस रोज़ 'दिवाली' होती है।***

**- मीनल जोगळेकर,**
वरिष्ठ सहायक संचालक



स्मरण


# येथे कर माझे जुळती...

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात १४ नोव्हेंबर रोजी पंडित जवाहरलाल नेहरू आणि १९ नोव्हेंबर रोजी इंदिरा गांधी यांची जयंती साजरी केली जाते, त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती...**

## जवाहरलाल नेहरू

पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान होते. त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ साली अलाहाबादमध्ये झाला. वयाच्या पंधराव्या वर्षी ते इंग्लंडला गेले. हॅरो येथे दोन वर्षे राहिल्यानंतर त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून नैसर्गिक विज्ञानात पदवी प्राप्त केली. १९१२ मध्ये एक प्रतिनिधी म्हणून ते बांकीपूर काँग्रेसला उपस्थित राहिले. १९१९ मध्ये अलाहाबादच्या होमरुल लिगचे सचिव बनले. १९१६ मध्ये ते पहिल्यांदा महात्मा गांधींना भेटले आणि खूप प्रेरित झाले. त्यांनी १९२० मध्ये उत्तर प्रदेशच्या प्रतापगड जिल्ह्यात पहिल्या किसान मोर्चाचे आयोजन केले. १९२०-२२ दरम्यान असहकार चळवळीच्या संदर्भात त्यांना दोन वेळा तुरुंगात जावे लागले.

सप्टेंबर १९२३ मध्ये नेहरू अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस बनले. १९२८ मध्ये लखनऊमध्ये सायमन कमिशनच्या विरोधात एका मिरवणुकीचे नेतृत्व केले. २९ ऑगस्ट १९२८ रोजी त्यांनी सर्वपक्षीय परिषदेत भाग घेतला आणि त्यांचे वडील मोतीलाल नेहरू यांच्या नावाने तयार करण्यात आलेल्या भारतीय घटनात्मक सुधारणेवरील नेहरू अहवालावर स्वाक्षरी करणाऱ्यांपैकी ते एक होते. त्याच वर्षी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना केली आणि त्याचे सरचिटणीसही झाले. १९२९ मध्ये पंडित नेहरू यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. १९३०-३५ दरम्यान मिठाचा सत्याग्रह आणि काँग्रेसच्या अन्य आंदोलनांमुळे त्यांना अनेकदा तुरुंगवास घडला. १४ फेब्रुवारी १९३५ रोजी अल्मोरा तुरुंगात त्यांनी स्वत:चे आत्मचरित्र पूर्ण केले.



३१ ऑक्टोबर १९४० रोजी भारतावर युद्धात सहभागी होण्यासाठी दवाब टाकल्याच्या विरोधात नेहरू यांनी केलेल्या वैयक्तिक सत्याग्रहामुळे त्यांना अटक झाली. ७ ऑगस्ट १९४२ रोजी पंडित नेहरू यांनी मुंबईत अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बैठकीत ऐतिहासिक भारत छोडोचा संकल्प सोडला.

८ ऑगस्ट १९४२ रोजी अन्य नेत्यांबरोबर त्यांनाही अटक झाली आणि अहमदनगर किल्ल्यावर त्यांची रवानगी करण्यात आली. ही त्यांची सर्वाधिक आणि शेवटची कोठडी होती. मार्च १९४६ मध्ये त्यांनी दक्षिण-पूर्व आशियाचा दौरा केला. ६ जुलै १९४६ रोजी चौथ्यांदा ते काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले आणि १९५१ ते १९५४ पर्यंत आणखी तीन वेळा ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांचा मृत्यू २७ मे १९६४ रोजी झाला.

## इंदिरा गांधी

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान. त्यांचा जन्म अलाहाबादच्या नेहरू कुटुंबात १९ नोव्हेंबर १९१७ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण अलाहाबाद येथे झाल्यानंतर पुढील शिक्षण त्यानी पुणे, मुंबई, रवींद्रनाथ टागोर यांचे शांतिनिकेतन, समरव्हील महाविद्यालय (ऑक्सफर्ड), स्वित्झर्लंड वगैरे ठिकाणी पूर्ण केले. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी चरखा संघ व लहान मुलामुलींची वानरसेना स्थापन करून महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीस मदत केली. ऑक्सफर्डमध्ये असताना त्यांनी व्ही. के. कृष्ण मेनन यांच्याबरोबर इंग्लंडमध्ये भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा पुरस्कार केला. फिरोझ गांधी यांच्याशी १९४२ मध्ये त्यांचा विवाह झाला. त्यांना राजीव व संजीव ही मुले झाली. १९५९-६० मध्ये त्यांची अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून निवड झाली. नेहरूजींच्या मृत्यूनंतर १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. त्या वेळी माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. त्यांनी भारतात प्रथम दिल्लीमध्ये दूरचित्रवाणीची सुरुवात केली. १९६५च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी संरक्षणाच्या निरनिराळ्या समित्यांवर त्यांनी काम केले. प्रत्यक्ष रणभूमीवर जाऊन जवानांची विचारपूस केली. त्यांना १९७२ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना देण्यात आला.



१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला संसदेत पुन्हा बहुमत मिळाले. त्यांची बहुमताने पंतप्रधान म्हणून निवड झाली. गरिबी हटावची घोषणा नवकाँग्रेसतर्फे देऊन इंदिराजींनी १९७१ मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका घेतल्या. काँग्रेसला तीन चतुर्थांश बहुमत मिळाले. त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. या अवधीत त्यांनी दहा मुद्द्यांच्या कार्यक्रमानुसार अनेक विधेयके मंजूर करून घेतली. १९७१ च्या सुरुवातीस पूर्व व पश्चिम पाकिस्तान यांत यादवी युद्धास प्रारंभ झाला. भारताला युद्धाव्यतिरिक्त पर्याय उरला नाही; इंदिराजींनी रशियाबरोबर मैत्रीचा करार केला. पाकिस्तानने ३ डिसेंबर १९७१ रोजी भारताविरुद्ध युद्धाची घोषणा करून आक्रमण केले. भारतीय फौजांनी १४ दिवसांचे युद्ध करून पाकिस्तानचा पराभव केला. भारताने स्वतंत्र बांगला देशाला प्रथम मान्यता दिली. १९७२ च्या राज्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला पुन्हा भरघोस यश मिळाले. त्यांचा मृत्यू ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी झाला.

(संदर्भ : www.pmindia.gov/मराठी विश्वकोश)

**संकलन: गजानन पाटील**

# जलयुक्त शिवार अभियानाकरिता ‘लोगो बनवा’ स्पर्धा

जिंका **१०,०००/-** रुपये रोख

महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ पर्यंत महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या उद्देशाने ‘जलयुक्त शिवार अभियान’ या महत्त्वपूर्ण योजनेची दिनांक ५ डिसेंबर २०१४ रोजी घोषणा केली. विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करून जमिनीतील आर्द्रता संरक्षित करणे हा या अभियानाचा उद्देश आहे.


शासनाच्या या प्रमुख कार्यक्रमासाठी, ‘लोगो बनवा’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागाच्या माध्यमातून नागरिकांना जलयुक्त शिवार अभियानासाठी लोगो तयार करण्याच्या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**स्पर्धेचा कालावधी: १ ते ३० नोव्हेंबर २०१७**

विजयी स्पर्धकास १०,००० रुपये रकमेचे रोख बक्षीस दिले जाईल. हा लोगो ‘जलयुक्त शिवार अभियाना’चा अधिकृत लोगो म्हणून वापरला जाईल.

**स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आजच भेट द्या:**

www.maharashtra.mygov.in






**किंमत रु. ३००/-**

## महाराष्ट्र विषयी

अधिकृत
वस्तुनिष्ठ
एकत्रित माहितीचा
वार्षिक संदर्भग्रंथ

## महाराष्ट्र वार्षिकी २०१६-२०१७

**सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध**

**समृद्ध महाराष्ट्राचा आरसा**

Visit - www.mahanews.gov.in | Follow Us : /MahaDGIPR | Like Us : /MahaDGIPR | Subscribe Us : /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th November 2017
Date of Publication : 10th of every Month




प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

*If undelivered, please return to:*

प्रेषक / **From**

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह